
# शब्द रुची

४३

जून २०१८
मूल्य १० रुपये
पृष्ठे ५२










# पुस्तकप्रकाशन क्षणचित्रे



डॉ. प्रेमानंद रामाणी यांच्या 'केसबुक' या इंग्रजी पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.



विलास माने लिखित 'कत्ती' पुस्तकप्रकाशनसमयी रामराजे अत्राम, सुदेश हिंगलासपूरकर, फ.म. शहाजिंदे, प्रा. नागोराव कुंभार, भगवान इंगळे, डॉ. जे.एम. वाघमारे, लक्ष्मण माने, लेखक विलास माने, श्रीपाल सबनीस, आमदार माणिकराव जाधव, प्रा. मधुकर सलगरे, श्रीशैल्य बिराजदार



नमिता कीर लिखित 'गझलगाथा' या पुस्तकप्रकाशनसमयी लेखिका नमिता कीर, अरुणोदय भाटकर, अशोक नायगावकर, मधुकर भावे आणि रमेश कीर



संगीता अरबुने लिखित 'मनीमानसी' पुस्तकप्रकाशनसमयी सुदेश हिंगलासपूरकर, धनश्री धारप, गायिका योजना शिवानंद, लेखिका संगीता अरबुने आणि योगिता मोरे

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म
जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

**जून २०१८, वर्ष सहावे**
**अंक दुसरा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **डॉ. वीणा सानेकर**
मुखपृष्ठ : **सतीश भावसार**
आतील वारली शैलीतील रेखाटने : **ईशा सानेकर**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी २५० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
☎ २४२१६०५० / २४३०६६२४
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

**ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

४३ ग्रंथाली

## अनुक्रम

**बालविश्व**
- चिंची चेटकिणीचं चैतन्यमयी चेटूक
  **राधिका कुंटे** / ६
- मुलांनी अनुभवावे असे काही
  **मनिषा नित्सुरे-जोशी** / ९

**नवे पुरुषभान : नव्या जगासाठी नवा विचार**
- रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ / ११

**कनातीमागची पायरव**
- तमाशातील मुस्लीम कलावंतांची इबादत
  **श्यामल गरुड** / १७

**स्मरणस्वर**
- शुक्रतारा चमचमतो आहे!
  **कुमार नवाथे** / २१
- सुंदर सावळा घवघवीत!
  **डॉ. प्रज्ञा दया पवार** / २४
- विजय तेंडुलकरांचे 'कावळ्यांची शाळा'
  **डॉ. अनघा मांडवकर** / २७

**चित्ररंग**
- 'न्यूड' चित्रपटाच्या निमित्ताने... चित्रपटाबद्दल नाही!
  **रघुवीर कुल** / ३२

**कविता**
- **कैलास दौंड** / ३५

**परिसंवाद**
- **प्रसारमाध्यमे व लोकशाहीचे भवितव्य** / ३६

**प्रतिभेचे चांदणे**
- गुस्ताव फ्लोबर्टची मादाम बोव्हेरी
  **धनंजय गांगल** / ३८

- **८०व्या वाढदिवसानिमित्त आयोजित सन्मान सोहळ्यातील डॉ. पी.एस. रामाणी यांचे भाषण** / ४१
- **मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या वतीने घेण्यात आलेल्या बैठकीतील चर्चा** / ४४
- पुस्तकप्रकाशन वृत्तांत / ४६
- ग्रंथाली ग्रंथपाने – **चांगदेव काळे** / ४७

## संपादकीय...

श्रीलाल शुक्ल यांच्या 'राग दरबारी' या हिंदी कादंबरीला प्रकाशित होऊन पन्नास वर्षं झाली. १९७० मध्ये या कादंबरीला 'साहित्य अकादमी'चा पुरस्कार मिळाला आणि १९८६ मध्ये मालिकेच्या रूपात ती दूरदर्शनच्या राष्ट्रीय वाहिनीवरून प्रक्षेपित झाली. शिवपालगंज या गावात घडणाऱ्या कथेच्या माध्यमातून भारतीय समाजातील मूल्यहीनतेवर ही कादंबरी भाष्य करते. आजवर या कादंबरीची जवळपास दोन लाखांच्या घरात विक्री झाली आहे. शिवपालगंज हे या कादंबरीतले गाव १९६५च्या आसपासचे आहे. थोडं मोठं गाव. तहसील कार्यालय, दुकाने, पोलिस ठाणे, महाविद्यालय असे सगळे इथे आहे. येथील महाविद्यालयाचे चालक-मालक वैद्यजी ब्राह्मण आहेत. सत्ताधाऱ्यांशी त्यांनी चांगल्या प्रकारे हातमिळवणी केलेली आहे. ग्रामपंचायत, ग्रामसभा अशा गावातल्या सत्तास्थानांवर त्यांची चांगलीच पकड आहे. वैद्यजींचा भाचा रंगनाथ, एम.ए. पूर्ण केल्यावर संशोधनाकडे वळला आहे. तो हवापालटाकरता शिवपालगंजमध्ये येतो. त्याला जाणवते, ''शिवपालगंज म हाभारतासारखं आहे, जे इथे आहे ते भारतात सर्वत्र आहे व जे इथे नाही ते कुठेही नाही. आम्ही भारतीय एक आहोत आणि आमची बुद्धी एकसारखीच आहे.''

ग्रामीण समाजातील शिक्षण, न्याय, राजकारण अशा क्षेत्रांमधली भ्रष्टता-अनैतिकता 'रागदरबारी'तून पदोपदी प्रत्ययाला येते. उदाहरणार्थ, जिल्हा शिक्षण निरीक्षक इथल्या छंगामल कॉलेजात येतात तो प्रसंग, श्रीलाल शुक्ल यांनी ज्या उपरोधिक शैलीत उभा केला आहे, तो मुळातूनच वाचण्यासारखा आहे.

मराठी अनुवादातूनही श्रीलाल शुक्ल यांच्या शैलीचा अंदाज येतो. एक छोटा परिच्छेद पाहू : जिल्हा निरीक्षकांनी मुलांना सांगितलं की ती देशाचं भविष्य आहेत. शिक्षकांना सांगितलं की ते देशाच्या भविष्याचे निर्माते आहेत. मुलं आणि शिक्षकांना हे आधीच ठाऊक होतं. निरीक्षक म्हणाले की आमची शिक्षणपद्धती वाईट आहे. मुलांना यांनी सांगितलं की शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र परिवर्तनाची गरज आहे. त्यांनी गांधी-विनोबांचे दाखले दिले. शिक्षणक्षेत्रातील मागच्या शताब्दीतील एक असामान्य घटना ही आहे की आम्हाला हे लवकर समजलं की आमची शिक्षणपद्धती वाईट आहे, या त्यांच्या म्हणण्याला नंतर सर्वांनी पाठिंबा दिला.

शिवपालगंजपासून पाच कोस दूरच्या खेड्यात राहणारा 'लंगड' हे या कादंबरीतले एक पात्र. त्याची बायको जिवंत नाही नि मुले त्याच्याकरता मेल्यातच जमा आहेत. शेतासंबंधातली त्याची एक केस सुरू आहे व त्याला एका जुन्या निकालाची प्रत हवी आहे, जिच्याकरता तो तहसील कार्यालयात वारंवार जातो आहे. घर, दार, जमीन, बैल सारे देवाच्या भरवशावर टाकून तो शेवटी शिवपालगंजमध्येच येऊन राहतो. दरम्यान त्याला गावी जावे लागते. तिथे आजारी पडल्याने मध्यंतरी तो सतरा-अठरा दिवस शिवपालगंजमध्ये नसतो तेव्हा तहसील कार्यालयातल्या नोटीस बोर्डावर त्याच्याकरता सूचना लागते नि कुणीही संपर्क न साधल्याने त्याला हवी असलेली निकालाची प्रत फाडूनही टाकली जाते. अशावेळी रंगनाथ त्याला जे सांगतो, ते शब्द या देशातील न्यायव्यवस्थेसंबंधात भेदक विधान करतात. तो म्हणतो, ''कायदेकानून माहीत असले म्हणून काही उपयोग नाही. मुद्दा हाच आहे की तू जनता आहेस आणि जनता इतकी सहज जिंकत नाही.''

वास्तवाचे एकेक पापुद्रे जेव्हा उकलत जातात आणि रोकडं वास्तव जेव्हा अंगावर येतं तेव्हा माणूस अनेकदा त्याच्यापासून पळू इच्छितो. ''पळ, पळ, पळ. वास्तव तुझा पाठलाग करते आहे.'' ही जाणीव रंगनाथला होते तेव्हाचं 'पलायनसंगीत' वाचकाच्या डोक्याला झिणझिण्या आणतं.

उच्च वर्गात जसजशा फसवणूक, धोका, भ्रष्टाचार आणि वंशवाद या गोष्टी आपली मुळं मजबूत करत जात आहेत तसतशी 'राग दरबारी' ही कादंबरी अधिकाधिक समकालीन होते आहे, असं लेखक श्रीलाल शुक्ल यांनी 'राग दरबारी'विषयी म्हटलं आहे, ते उचितच आहे.

१९ मे २०१८ हा विजय तेंडुलकर यांचा दहावा स्मृतिदिन. आपल्यातलं जे नकारात्मक आहे ते दडपून टाकण्याकडे माणसांचा कल असतो; ते याकरता की आपल्यातली वाईट बाजू कुणाला दिसू नये. आपलं उजळ रूप जगाला दाखवायचं आणि वाईट रूप लपवायचं असा खेळ माणूस कौशल्याने खेळत असतो. नाटककार मकरंद साठे आणि विजय तेंडुलकर यांचा संवाद नुकताच एका छोट्या फिल्ममधून पाहिला. माणसा-माणसातलं राजकारण, एकमेकांवर कुरघोडी करणे, पांढरपेशा वर्गातली भयंकर हिंसा आणि विकृती, माणसाची स्खलनशीलता आणि त्याचे राक्षस होणे अशा विविध मुद्यांचा ऊहापोह तेंडुलकरांनी केला. १९४७ ते ६५ पर्यंत आपण सामाजिक विकासाचा विचार करत होतो पण हळूहळू त्याचे महत्त्व कमी होऊन व्यक्तिगत विकास हे ध्येय झाले. सगळ्या व्यवस्था स्वार्थकेंद्रित कशा होतील हे पाहण्याकडे कल वाढला. समाज ही स्पर्धा व असूयेवर आधारित व्यवस्था बनली. यातूनच प्रगतीसोबत हिंसाही वाढली. या वास्तवावर तेंडुलकर मोकळेपणाने या फिल्ममध्ये बोलले आहेत. लेखक या नात्याने त्यांची भूमिका स्पष्ट करणारे त्यांचे एक वाक्य मला खूप आवडले. ''व्यक्तिगत आयुष्याच्या पलीकडचा मोठा परीघ माझ्यावर आदळत होता, तो मी आत घेतला.'' लेखकाच्या अस्तित्वाचे वेगळेपण या वाक्यातून नेमके स्पष्ट होते. व्यक्तिगत आयुष्यापलीकडे रोजच आपल्यावरही खूप काही आदळत

असते पण ते आत घ्यायचेच नाही असा जणू आपण निर्धारच केला आहे. शाळेत शिकतानाचा शाई शोषून घेणारा टिपकागद आठवतो? आपण टिपकागदासारखं सभोवतालातलं शोषून घ्यायला लागलो की त्रास होतो. अंगाला काही लावूनच घ्यायचं नाही हे जास्त सोपं!

किरण नगरकरांची एक छोटेखानी मुलाखत काही दिवसांपूर्वी वाचली. ते म्हणतात, ''जशी माणसाची शेपूट गळून पडली तशी मध्यमवर्गाची जीभही गळून पडली आहे.'' 'वी नीड यू सोसायटी' या संस्थेच्या 'प्रबोधन पुरस्कार' कार्यक्रमात कुमार केतकर यांनीही नुकताच मध्यमवर्गाच्या असंवेदनशील होत जाण्याचा स्पष्ट निर्देश केला.

आदमी मरने के बाद कुछ नहीं सोचता।
आदमी मरने के बाद कुछ नहीं बोलता।
कुछ नहीं सोचने और कुछ नहीं बोलनेपर
आदमी मर जाता है।

हिंदीतील एका प्रसिद्ध कवीच्या ओळी आठवल्या.

माणसाचं विचार न करणं आणि न बोलता सगळं पाहात बसणं हे भयंकर आहे, पण त्यापेक्षा भयावह आहे एका संपूर्ण समाजाचं मरण! अशावेळेला जिथे-जिथे धुगधुगी दिसते तिथे ते-ते धरून ठेवायलाच हवं.


..................

आयुष्याचा डाव सोडून काळाच्या पडद्याआड गेलेल्या अरुण दाते यांचे आत्मकथन वाचत होते. आत्महत्येच्या टोकावर उभ्या असलेल्या, खचून गेलेल्या एका व्यक्तीने दातेंना एकदा पत्र लिहिलं. मृत्यूला कवटाळण्याच्या क्षणी 'या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे' या गीताचे सूर त्याच्या कानावर पडले आणि तो मागे फिरला. परत जीवनाकडे! दाते यांच्या सुरांची ही संजीवनी!

आदिवासी संस्कृतीतले आदिबंध जपून ठेवणारे जिवंत जिव्या सोमा मशे नुकतेच अनंताच्या प्रवासाला निघून गेले. त्यांनी अजरामर केलेली वारली चित्रशैली या अंकाच्या सजावटीकरता योजली आहे. ही त्यांना भावांजली ठरावी.

**– डॉ. वीणा सानेकर**
सी-१२, सुयोग सोसायटी,
संत ज्ञानेश्वर मार्ग, मुलुंड (पूर्व), मुंबई-४०० ०८१
भ्रमणध्वनी : ९८१९३५८४५६
veenasanekar2018@gmail.com

॥ग्रंथाली॥



## आषाढी

**भक्तिसंगीताची रौप्यमहोत्सवी वारी**

**योजना शिवानंद**

**मूल्य ३५० रुपये**
**सवलतीत २०० रुपये**

गायिका श्रीमती योजना शिवानंद यांनी योजना प्रतिष्ठानतर्फे १९९२ ते २०१६ या २५ वर्षात आषाढी एकादशीच्या निमित्तानं भक्तिसंगीताच्या २७ मैफिली यशस्वीपणे सादर करून या उपक्रमाचा रौप्यमहोत्सव यशस्वीरीत्या पूर्ण केला. त्यातून एक मोठा भक्तिप्रकल्प, त्यामागच्या विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि व्यक्तिगत संदर्भांचा एक व्यापक पटच आपल्यासमोर उभा राहतो. योजनाच्या अथक धडपडीचा हा आलेख.

## भाषाविचार



**डॉ. दीपक पवार**

**मूल्य १८० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**

आपल्या भाषा लोप पावायला नको असतील तर सर्वांत पहिलं म्हणजे त्यांचं लोप पावणं काय असेल आणि त्याचे परिणाम काय होतील, याचं भान असायला हवं. आपली भाषा मरू न देणं हा आपल्या जीवनधारणेचा भाग कसा होईल यावर विचार आणि कृती व्हायला हवी. अशी कृती किंवा असं बंड ज्या भाषेत रोजच्या रोज घडतं त्याच भाषा जगतात आणि इतर भाषा मात्र धोरणलकव्याने गलितगात्र होऊन जातात. धोरणलकवा हे भाषेच्या मृत्यूकडे तत्परतेनं टाकलेलं पहिलं पाऊल आहे असं म्हणायला हरकत नाही.

# चिंची चेटकिणीचं चैतन्यमयी चेटूक

**राधिका कुंटे**

**मुलांना फुलवणारे, त्यांचा ताण दूर करणारे, त्यांच्या अभिव्यक्तीला खत-पाणी घालणारे बालनाट्य आजच्या काळात तर मुलांकरता अधिकच गरजेचे आहे. चिन्मय मांडलेकर दिग्दर्शित रत्नाकर मतकरी यांचे 'अलबत्या गलबत्या' परत रंगमंचावर आले आहे. या नाटकाचा वेगवेगळ्या कोनांतून आढावा घेणारे दोन लेख प्रकाशित करीत आहोत.**

**ज्ये**ष्ठ साहित्यिक रत्नाकर मतकरी यांचं 'अलबत्या गलबत्या' हे बालनाट्य अवघ्या महिनाभरापूर्वी रंगमंचावर सादर झालं. आणि ते आलं, ते सादर झालं आणि त्यानं जिंकलं... या नेमक्या आणि मोजक्या शब्दांत या नाटकाची गोळाबेरीज करता येईल. खरं तर 'झी मराठी' या वाहिनीनं बालनाट्य प्रस्तुत करणं आणि 'अद्वैत थिएटर्स'नं या बालनाट्याची निर्मिती करणं ही गोष्ट सध्याच्या सांस्कृतिक घडामोडींमध्ये लक्षणीय नि म्हणूनच दखल घेण्याजोगी वाटते. कारण मराठी बालरंगभूमीवर मुलांसाठी मोठ्या सुट्टीत तीन-चार बालनाट्यांचे एकत्र प्रयोग सादर करायचे हीच कल्पना गेल्या काही वर्षांत रुढ झाली होती. म्हणून मग ही नाटकं म्हणजेच बालनाट्य असा समज रुढ होऊ पाहात होता, पण 'अलबत्या गलबत्या'मुळं या समजाला छेद जाईल, हे नक्की.

रत्नाकर मतकरी आणि सुधाताई करमकर यांच्या भरभक्कम आधारावर एकेकाळी मराठी बालरंगभूमीनं कित्येक सोनेरी नाटकांतले क्षण अनुभवले. त्यातले बहुसंख्य गाजलेही. मतकरी यांनी त्यांच्या 'बालनाट्य' या संस्थेचं बोधचिन्ह तयार केलं होतं. त्यात 'पंख उभारून उडू पाहणारी चिमणी' हे मुलांच्या कल्पनाशक्तीचं प्रतीक होतं. 'माझे रंगप्रयोग' या पुस्तकात रत्नाकर मतकरी यांनी बालरंगभूमीविषयी एक मोठं प्रकरण लिहिलं आहे. जिज्ञासूंनी ते मुळातून वाचावं. ते म्हणतात की, ''नाटकांची केवळ नावं वाचून, त्यांचा आशय समजून न घेता आपल्याकडचे तथाकथित बुद्धिवंत पऱ्या, राक्षस, चेटक्या यांच्यातून बाहेर पडणार तरी कधी? मुलांसाठी वास्तववादी विषय घेणार कधी? अशी चिंता करताना दिसतात. यांतून त्यांना दाखवायचे असते की, मुलांना भाबड्या, कल्पनेच्या अद्भूत जगातून बाहेर काढून वास्तवात आणण्याचा आग्रह धरणारे आपण बुद्धिमान आणि जे परीकथेमध्ये रमतात, ते सुमार बुद्धीचे लोक. या बुद्धिवादी लोकांच्या, वर दिलेल्या प्रश्नाकडं एरवी दुर्लक्ष केलं असतं, परंतु तो पुन्हापुन्हा विचारला जातो आणि 'बुद्धिवंतां'नी विचारल्यामुळं बहुसंख्यांना त्यात तथ्य आहे, असं वाटतं. म्हणून या विचारात किती गफलती आहेत ते पाहू या.

१. बालरंगभूमीनं यातून बाहेर पडावं, त्यात प्रवेश करावा, असे म्हणण्याइतका आपल्याकडं बालरंगभूमीचा प्रसार आहेच कुठं? २. विषयाचा नीट अभ्यास न करता 'परीकथा' म्हणजे निव्वळ 'पऱ्यांची गोष्ट' असं म्हणणं सुबुद्धपणाचं नाही. ३. पऱ्या, चेटक्या आणि राक्षसांकडं पाहण्याची एक तिरकस दृष्टी असू शकते. ४. ज्या परीकथांमध्ये केवळ पऱ्या असतात, नाहीतर राक्षस, असे 'बुद्धिवंतां'ना वाटते, त्या मुलांना नीट पाहायला शिकवणाऱ्या एक प्रकारच्या नीतिकथा असतात. त्यात चांगले काय, वाईट काय हे सांगितलेले असते. ५. तेव्हा 'बुद्धिवंतां'नी बालसाहित्याविषयी-बालरंगभूमीविषयी बोलण्याआधी जागतिक बालवाङ्मयाचा अभ्यास करावा, ही त्यांना एक विनंती. ६. 'बुद्धिवंतां'ना करण्यासारखी आणखी एक गोष्ट म्हणजे आपलं लोकसाहित्य, लोककला, वेद-पुराणं इत्यादींचा अभ्यास करून त्यातून मुलांसाठी- विशेषतः मुलांच्या नाटकांसाठी सामग्री गोळा करावी. अर्थात मतकरी यांनी हा प्रत्येक मुद्दा सोदाहरण स्पष्ट केला आहे, जो जागेअभावी इथं विस्तृतपणं देणं शक्य नाही.

'माझे रंगप्रयोग' मध्ये त्यांनी 'अलबत्या गलबत्या' विषयीही लिहिलं आहे. त्यानुसार 'अलबत्या गलबत्या'चे १९७२मध्ये प्रयोग होण्याआधी त्याचं नाव 'राजकन्या आणि जादूची आगपेटी' हे होतं. ते बदलून मुलांना उच्चारायला छान वाटेल, असं तालबद्ध, मराठी वाक्प्रचारातलं नाव शोधलं गेलं - 'अलबत्या गलबत्या'. नाटकाची सुरुवात, त्याच्या नेपथ्याविषयीचा सखोल विचार आणि तो प्रत्यक्षात येणं, पात्रयोजना आदींविषयीही त्यांनी लिहिलं आहे. त्या काळी त्यांच्या चमूनं सादर केलेले प्रयोग अतिशय गाजले, नावाजले गेले. सगळ्यात भारी ठरली होती ज्येष्ठ अभिनेते दिलीप प्रभावळकर यांची चेटकीण.

अलीकडंच एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत मतकरी





यांनी सांगितलं होतं की, ''नाटक मुलांपर्यंत पोहचायला हवं असं माझं नेहमी मत असतं. आम्ही आमची नाटकं शाळांच्या हॉलमध्ये, व्हरांड्यात, छोट्या सभागृहांत, अगदी हॉस्पिटलच्या वॉर्डातसुद्धा केलेली आहेत. एकदा एका डेड एन्ड असणाऱ्या रस्त्यावर ट्रकची फळकुटं पाडून आम्ही स्टेज तयार केलं आणि प्रयोग सादर केला. त्याला आम्ही 'आनंदयात्रा' असं नाव दिलं. एक तर आमच्या नाटकांचा दर्जा हा अत्यंत प्रोफेशनल, व्यावसायिक स्तराचा होता. सगळे रंगकर्मी हे अव्वल दर्जाचे असायचे. विजया मेहता, कमलाकर सारंग, अनंत भावे, सुरेश खरे, राजा बापट ही सगळी मंडळी अत्यंत सिन्सियरली आमच्या बालनाट्यांमध्ये भाग घ्यायची. 'राक्षसराज झिंदाबाद' या नाटकात 'चष्मासूर' नावाचा उंच, काडीपहलवान राक्षस दाखवायचा होता. त्यासाठी पहिल्यांदा दिलीप प्रभावळकर आमच्यात आला आणि त्यानंतर मग 'अलबत्या गलबत्या'मध्ये त्याने 'चेटकीण' केली. मला तिथं तोच हवा होता, कारण या चेटकिणीवर तुम्ही ती विक्षिप्त म्हातारी आहे म्हणून हसायचं नाहीय. ते तिच्या वियर्डनेसला, आचरटपणाला आणि विचित्र कारस्थानं करून तिची जी फजिती होते त्याला हसायचंय, हे दिलीपनं बरोब्बर हेरलं.''

१९७३मध्ये 'अलबत्या गलबत्या' पुस्तक रुपात प्रसिद्ध झालं. त्यात बालनाट्याच्या निमित्तानं 'प्रौढांसाठी' या शीर्षकाची खुद्द मतकरी यांनीच प्रस्तावना लिहिली आहे. मतकरी लिहितात की, हॅन्स अँडरसन या जगत्‌विख्यात परीकथालेखकाची 'दी टिंडर बॉक्स' ही जगप्रसिद्ध परीकथा. उत्कृष्ट परीकथेची सारी वैशिष्ट्ये या कथेत आहेत. गरीब परंतु सालस व्यक्तीला अनेक संकटांना तोंड द्यावं लागून शेवटी यश लाभणं आणि दुर्जनांचा शेवटी पराजय होणं हे कुठल्याही परीकथेचे प्रमुख कथासूत्र याही कथेत आहे. शिवाय अद्‌भूतरम्यता आणि उत्कंठा वाढवणारे प्रसंग या कथेत ठासून भरलेले आहेत. म्हणून मी त्या कथेवर 'राजकन्या आणि जादूची आगपेटी' हे नाटक आधारले. त्यात बरेच फेरबदल करून 'अलबत्या गलबत्या' तयार झाले. परीकथेमधील दुर्जनांचा नाश– सज्जनांचा विजय हा अंतिम न्याय प्रत्यक्षात खोटा ठरतो असे वरवर दिसते. तेव्हा मुलांना या स्वप्नरंजनात का गुंतवावे, असा एक टीकेचा सूर असतो. खरेतर प्रत्यक्ष जीवन कितीही कोते असले तरीही आदर्शाची किंमत कमी ठरत नाही; आणि मुलांनी आदर्शावर श्रद्धा ठेवायला शिकणं यात काहीच वावगं नाही. त्यांच्या मनात श्रद्धा असली तर ती आजच्या समाजाला कोतेपण दूर करण्याचा आज ना उद्या प्रयत्न करतील. अशी आशा तरी करायला जागा आहे. शिवाय जीवन परीकथेसारखं नसतं असं म्हणणारेही जीवनावर जे वेगळं रुप लादतात, ते तरी तितकंसं खरं कुठं असतं? कारण वरवर जरी आपण दुर्जन मजा करताना आणि सज्जन देशोधडीला लागताना पाहतो, तरी मजा करणारा दुर्जन हा मनातून अस्वस्थ, घाबरलेला, गांजलेलाही असू शकतो. याउलट आपत्तीतही मानसिक समाधान न ढळलेले लोक आपण पाहतोच. तेव्हा अंतिम विजय कोणाचा हे वेगळंच ठरवावं लागतं. जीवनाचा अर्थ हा कुठल्याच सोप्या मोजमापांनी लागत नसतो. परीकथा तो अर्थ लावण्याचाही प्रयत्न करत नाही. त्या जीवनाकडं पाहण्याची एक निरोगी आणि सौंदर्यपूर्ण दृष्टीच काय ती देत असतात आणि या दृष्टीची गरज मुलांना नसते असं कोण म्हणेल? 'टिंडर बॉक्स'वर नाटक काढताना ते नाट्यपूर्ण करण्यासाठी अनेक बदल करणं आवश्यक ठरलं. मुळात आगपेटी गुहेबाहेर आल्यानंतर चेटकीचं पात्र कथेतूनच जातं. इथं ती सतत अलबत्याशी वैर करते. आगपेटी ठिकठिकाणी जो प्रवास करते तोही मूळ कथेत नाही. असे अनेक बदल जागोजागी करताना मला 'टिंडर बॉक्स'वर आधारलेल्या विविध इंग्रजी नाट्यकृतींची मदत झाली, हे नमूद केलं पाहिजे.''

चिन्मय मांडलेकर दिग्दर्शित 'अलबत्या गलबत्या'मध्ये 'चिंची चेटकिणी'च्या भूमिकेत प्रसिद्ध अभिनेते वैभव मांगले असून त्यांच्या अभिनयाचं नाणं खणखणीत वाजतं. त्यांना 'अलबत्या' झालेल्या सनी मुणगेकर आणि इतर कलाकारांची तितकीच जोरकस साथ मिळाली आहे. मात्र सध्या सादर होणाऱ्या नाट्यकृतीत काही मोजकेच आणि आवश्यक ते बदल करण्यात आले आहेत. त्यात मुख्य लक्षात येते ती भाषा. मुळात मतकरींच्या लेखणीतून उतरलेल्या नाटकाची भाषा फार अवघड नव्हती. मात्र हे नाटक पाहायला बहुतांशी मराठी घरातली मात्र इंग्रजी माध्यमांतील आणि प्रसंगी अमराठी मुलंदेखील पालकांसह येतील हे लक्षात घेतलं गेलं.



आजच्या अत्याधुनिक काळातले, तंत्रयुगातले संदर्भ वापरले गेले. उदाहरणार्थ – चेटकीण नकाशा वाचताना मंत्र म्हणावा तशी पुटपुटते की, 'पाराच्या पश्चिमेला वाटेच्या वायव्येला...' ते पुटपुटणं पुरं झाल्यावर पश्चिम आणि वायव्य दिशेचा उलगडा लगेच केला जातो. शिवाय मोबाईलची रेंज किंवा सेल्फी घेणं, व्हॉट्स अप करू का, युती होणं या समकालीन गोष्टींचे उल्लेख सहजगत्या होतात. इंग्रजी आणि हिंदी भाषेचा वापर केला जातो. झक्कास पॉझेस घेतले जातात. ''किती ग बाई मी हुशार, किती ग बाई मी हुशार!''या पालुपदाचा वेळोवेळी केलेला वापर आणि संवादांची तालकाव्यासारखी गुंफण प्रेक्षकांना प्रयोगात गुंतवून ठेवते. 'वेताळवाणी'च्या प्रसंगातला थ्रीडी इफेक्ट, सूचक नेपथ्य, तांत्रिक करामती आणि रंगभूषा या सगळ्या या नाटकाच्या जमेच्या बाजू आहेत. मूळ नाटकातील राणी, पहारेकरी आदी पात्रांची योजना या नाटकात केलेली नाही. मात्र त्यामुळं संहितेला कोणताही धक्का लागलेला नाही. दिग्दर्शन आणि शीर्षकगीत चिन्मय मांडलेकर, संगीत मयुरेश माडगांवकर, गायक अवधूत गुप्ते यांनी गायलेलं 'अलबत्या गलबत्या' हे गीत यांनी या नाटकाला 'चार चांद' लागले आहेत. चिंची चेटकिणीचं चैतन्यमयी चेटूक नक्कीच अनुभवावं असं आहे.

(संदर्भ साभार – 'माझे रंगप्रयोग' – रत्नाकर मतकरी, राजहंस प्रकाशन. 'अलबत्या गलबत्या' – रत्नाकर मतकरी, पॉप्युलर प्रकाशन आणि माहीम सार्वजनिक वाचनालय)

**– राधिका कुंटे**
भ्रमणध्वनी : ९८२००८९३७६
kunte.radhika@gmail.com

ग्रंथाली




**आग्रहाचे निमंत्रण**
**प्रकाशन समारंभ**
## आरवली ते अरावली
**प्रकाश काशिराम अंबुरे**
शब्दांकन : **वैभव वझे**
ग्रंथाली प्रकाशन, मुंबई
**१४ जून २०१८ / रविवार**
सायंकाळी ५.३० वाजता
– प्रमुख उपस्थिती –
अध्यक्ष – **वाय.एम. देवस्थळी**
प्रमुख पाहुणे – **अल्मित्रा पटेल**
**संवाद : विनायक कुळकर्णी**
सहयोग मंदिर, पहिला मजला, सहयोग मंदिर पथ,
घंटाळी, नौपाडा, ठाणे ४००६०२



**आग्रहाचे निमंत्रण**
**प्रकाशन समारंभ**
## कविताच ... माझी कबर
**संजय चौधरी**
ग्रंथाली प्रकाशन, मुंबई
**२४ जून २०१८ / रविवार**
सायंकाळी ५ वाजता
– प्रमुख उपस्थिती –
**कवी वसंत आबाजी डहाके, डॉ. प्रभा गणोरकर,**
**श्री. सुभाष अवचट, श्री. विनायकदादा पाटील,**
**कवि अरुण शेवते, श्री. सुदेश हिंगलासपूरकर आणि**
**मराठीचे आघाडीचे सर्व कविमित्र व काव्यरसिक**
मु शं औरंगाबादकर सभागृह,
सार्वजनिक वाचनालय, नाशिक.

# मुलांनी अनुभवावे असे काही...

**मनिषा नित्सुरे-जोशी**

**सध्या मराठी रंगभूमीवर 'अलबत्या गलबत्या' या बालनाट्याने धुमाकूळ घातला आहे. इतर मोठ्या नाटकांना बाजूला सारत आपली जागा निर्माण केली आहे. एप्रिल-मे महिन्यात दरवर्षी काही बालनाट्य रंगभूमीवर येतात आणि जातात पण या नाटकाने मात्र जादूची कांडी फिरवावी आणि दुनिया बदलावी तशी किमया केली. असं काय वैशिष्ट्य आहे या नाटकाचं?**

**बा**लनाट्य म्हणजे लहान मुलांनी लहान मुलांसाठी केलेलं नाटक हा भ्रम दूर करत मे महिन्यात 'अलबत्या गलबत्या' हे धमाल विनोदी बालनाट्य झी मराठी आणि अद्वैत थिएटर्सने रंगभूमीवर आणलं आणि खरोखरंच एक धम्माल उडवून दिली. 'झी मराठी'सारखं सशक्त माध्यम या नाटकाच्या पाठीशी असल्यामुळे नाटकाची प्रसिद्धी मोठ्या प्रमाणात होऊ शकली आणि ती सर्वदूरही पसरली. आजकाल बालनाट्य चालत नाहीत ही बोंब या नाटकाने खोटी ठरवली आणि पहिल्या प्रयोगापासून प्रेक्षकांची तुडुंब गर्दी खेचली. पूर्वप्रसिद्धी चांगली झाल्यामुळे नाटकासाठी अनुकूल वातावरण आधीच निर्माण झालेलं होतं पण त्याला पहिल्या काही प्रयोगातच मौखिक प्रसिद्धीची (माउथ टू माउथ पब्लिसिटी) जोड मिळाली आणि मग नाटकाची घोडदौड अधिक वेगानं सुरू झाली. जिथे बालनाटकांचा आठवड्याला एखाद-दुसरा प्रयोग व्हायचा तिथे या नाटकाने दिवसाला दोन-तीन-चार प्रयोगांचा विक्रम रचला आणि त्या सगळ्या प्रयोगांना प्रेक्षकांनीही धो-धो प्रतिसाद दिला. तिकिट विक्रीची तारीख जाहीर झाल्यावर लवकर जाऊन तिकीट काढलं नाही तर तिकिटं मिळत नाहीत असं या नाटकाच्या बाबतीत ऐकू येऊ लागलं.

नेमकं असं काय आहे या नाटकात की ज्यामुळे या नाटकाचं नाव एका रात्रीत ज्याच्या त्याच्या तोंडी झालं आणि मुलांना हे नाटक आवर्जून दाखवायलाच पाहिजे असं पालकांनाही वाटू लागलं? तसं पाहिलं तर जेव्हा कोणतंही एखादं नाटक उभं राहतं तेव्हा त्यामागे अनेक गोष्टी असतात आणि त्या सगळ्या जुळून आल्या की नाटक चांगलं झालं आहे असं आपण सर्वसाधारणपणे म्हणतो, पण इथे प्रश्न होता तो वातावरण निर्माण करण्याचा आणि मुळात नाटक या कलाकृतीशी फारसा परिचय नसलेल्या आजच्या मुलांना दोन तास हसवत ठेवण्याचा. म्हटलं तर तसं हे कठीण काम, पण या नाटकाने ते आव्हान पेललं. या नाटकाची अनेक बलस्थानं आहेत. चांगली निर्माती संस्था पाठीशी असल्यामुळे नाटकाच्या निर्मितीमूल्यात कुठेही तडजोड केलेली नाही हे नाटक पाहताना प्रकर्षाने जाणवतं. नाटकाचं नेपथ्य असो, संगीत असो किंवा इतर तांत्रिक बाजू असो - या प्रत्येक बाबतीत नाटक एखाद्या मोठ्या व्यावसायिक नाटकाच्या तोडीसतोड आहे. एरवी बालनाटकांच्या बाबतीत तडजोड केली जाते. एकूणच त्याचा जीव लहान आहे, त्याचा आवाका फार मोठा नाही असा विचार करून ते तडजोडीतून उभं केलं जातं, कारण मुळातच बालनाट्याकडे गंभीरपणे पाहण्याची सवय आता राहिलेली नाही. पण 'अलबत्या गलबत्या'ने ही पद्धतच बदलून टाकली आहे आणि 'बालनाट्यालाही तितक्याच गंभीरपणे घ्या' हा संदेश दिला आहे. अर्थात निर्मितीसंस्था जर आर्थिकदृष्ट्या सशक्त असेल तर तांत्रिकदृष्ट्या नाटक भक्कमपणे उभं करणं तसं तुलनेनं सोपं जातं. तेच ह्या नाटकाच्या बाबतीतही झालंय. पण केवळ तांत्रिक बाजूच नाही तर त्याचं दिग्दर्शन, पुनर्लेखन, अभिनय (जिथे पैसा नाही तर बुद्धीचा कस लागतो) या बाबतीतही नाटक उजवं आहे. चिंची चेटकीण या नाटकाचा कणा आहे हे ओळखून दिग्दर्शक, वेशभूषाकार, रंगभूषाकार यांनी तिला तशीच उभी केली आहे तर वैभव मांगले याने ती भूमिका तितक्याच जबाबदारीने पार पाडली आहे. सतत पाठीत वाकून चालावं लागत असल्यामुळे वैभवच्या पाठीचा कणा मोडत असेल पण नाटकाचा कणा त्याने ताठ ठेवला आहे. त्याबरोबरीने अलबत्या-गलबत्या, मांजरी, राजा, प्रधान, सेवक, उंदीर, राजकन्या, खानावळ चालवणारे पोटभरे या सगळ्यांची कामं चांगली झाली आहेत. नाटकाची सुरुवात गाणं आणि नृत्याने होत असल्यामुळे चुळबुळ करणारा छोटा प्रेक्षक खुश होऊन जातो. मुलांसाठी नाटक निर्माण करायचं म्हटल्यावर त्यात केवळ पोपटपंची असून चालत नाही तर अस्थिर असणारी मुलं शांत बसून नाटक बघतील यासाठी खास युक्ती योजावी लागते. ते काम या नाटकात गाणी आणि नृत्याने केलंय. कलाकारांच्या विनोदी वाक्यांबरोबरच त्यांच्या मजेशीर आंगिक हालचालींनी सुद्धा मजा

आणली आहे. प्रेक्षकांमध्ये बसलेली मुलं किती एन्जॉय करतात यावर बालनाट्याचं यश अवलंबून असतं. हे नाटक मुलं नाटकभर एन्जॉय करतात.

मुळात हे नाटक तसं खूप जुनं म्हणजे जवळपास चाळीस वर्षांपूर्वीचं आहे. पण आज नव्याने सादर करताना ते आत्ताच्या काळाशी जोडलं गेलं आहे हे विशेष. जेव्हा एखादी जुनी कलाकृती काही वर्षांचा काळ लोटल्यानंतर पुन्हा प्रेक्षकांसमोर येते तेव्हा त्यात प्रेक्षक आत्ताचा संदर्भ शोधत असतो. कारण मधल्या काळात आजूबाजूचे संदर्भ बरेच बदललेले असतात. या नाटकाच्या बाबतीतही जाणीवपूर्वक काही संदर्भ नव्याने जोडण्यात आहे आहेत आणि म्हणूनच मुलांना ते आजचं नाटक वाटतं. मुलांशी ते पटकन जोडलं जातं. चाळीस वर्षांपूर्वी मोबाईल फोन, व्हिडीओ गेम्स नव्हते पण या नाटकात त्याचा उल्लेख येतो आणि त्या वाक्यावर प्रेक्षागृहात बसलेली लहान मुलंही हसतात. उंदीर चेटकिणीच्या हातातून सुटतो तेव्हा 'अगंबाई, रेंजच्या बाहेर गेला वाटतं' या वाक्याला मुलंच काय पण पालकही खो-खो हसतात. नाटकाचं नेपथ्य फारच सुरेख असून त्यात रेडियमचा केलेला वापर स्थळ-काळाचा भास जिवंत करणारा आहे. चेटकिणीचा मेकप सुध्दा कुठेही कृत्रिम वाटत नाही.




दिग्दर्शक चिन्मय मांडलेकर यांनी मुलांच्या भावनाविश्वाचा आणि त्यांच्या आजच्या जगण्याचा अचूक वेध घेऊन हे नाटक बसवलं असल्यामुळे ते बोअर होत नाही. मुलांना हसवणं तसं सोपं काम नाही. पण हे नाटक पाहताना मुलं हसतात, टाळ्या वाजवतात आणि ही कृती ती पुन्हा पुन्हा करतात हे विशेष. 'कित्ती गं बाई मी हुशार' या चेटकिणीच्या वाक्यावर टाळ्या आल्या नाहीत तरच नवल. या वाक्यावर टाळ्या वाजवल्याशिवाय मुलं थांबत नाहीत आणि टाळ्या घेतल्याशिवाय वैभव मांगले पुढे जात नाही, हा गंमतीचा भाग झाला पण यामुळे चेटकीण साकारणारा वैभव आणि प्रेक्षकात बसलेली मुलं यांच्यातील अंतर एका झटक्यात कमी होऊन जातं. मुलांच्या ज्या उत्स्फूर्त आणि निरागस प्रतिक्रिया नाटकादरम्यान वेळोवेळी येतात व त्यावर मजेशीर टिप्पणी करत नाटक पुढे जातं. नाटकात काही ट्रिक्स वापरण्यात आल्या आहेत. मग जादूचा एखादा छोटासा प्रयोग असेल किंवा प्रेक्षागृहाच्या भिंतींवर अवतरणारी वेताळाची प्रतिमा असेल, हे काही नवीन प्रकार या नाटकात पाहायला मिळतात. दिग्दर्शक, नेपथ्यकार आणि प्रकाशयोजनाकार यांनी प्रत्येक दृश्य साकारताना, 'काहीतरी वेगळं करून पाहू' असा विचार केलेला दिसतो. हाच विचार वैभवनेही केलेला दिसतो व त्यातून तो अनेक गंमती-जमती करतो. यातूनच मूळ नाटकात नसलेल्या पण इथे मुलाचं मनोरंजन करणाऱ्या अशा क्लुप्त्या लढवलेल्या दिसतात.

एकेकाळी ऐन भरात असलेली पण कालांतराने काही कारणांमुळे बंद पडलेली बालनाट्यांची चळवळ या निमित्ताने पुनरुज्जीवित होईल अशी अशा करायला हरकत नाही कारण बालनाट्य नेमकी कुठे कमी पडत होती हे या नाटकाने दाखवून दिलं आहे. आजही बालनाट्य करणारी मंडळी आहेत पण त्यांना कधी पैशांची कमतरता भासते तर कधी चांगल्या कथेची. अर्थात बालनाट्य बसवण्यामागे त्यांचे प्रयत्न जसे असतात तशीच लहान मुलांची मेहनतही असते. पण सगळीच नाटकं चालत नाहीत हेही खरं आहे. 'अलबत्या गलबत्या' नाटकाला जसं चांगलं अधिष्ठान लाभलं तसच ते इतर बालनाट्यानाही लाभलं तर पुन्हा चांगली नाटकं येतील. शनिवार-रविवार व सुट्टीच्या दिवशी या नाटकांचे प्रयोग लावले तर नक्की चालतील अशी आशा सध्यातरी निर्माण झाली आहे. केवळ आर्थिक पाठबळ चांगलं मिळालं की नाटकं चालतील असं नाही तर ती कथा, त्यातील कलाकार आणि दिग्दर्शनही तितकंच प्रगल्भ असावं लागेल. मुळात बालनाट्य या विषयाकडे टाइमपास म्हणून न पाहता एक सशक्त कलाकृती निर्माण करण्याच्या भावनेने पाहिलं जावं आणि यात मोठ्या कलाकारांचाही सक्रीय सहभाग असावा अशी जी अपेक्षा आता व्यक्त होतं आहे ती रास्तच आहे.

कम्प्युटर्स, मोबाईल, टॅब, स्मार्ट बोर्ड अशा विविध स्क्रीन्सच्या विळख्यात सापडलेल्या आजच्या मुलांना लाइव्ह कलाकृतीचा अनुभव देणं गरजेचं आहे आणि त्यादृष्टीने अशी चांगली बालनाट्य रंगभूमीवर यायला हवीत. काही महिन्यांपूर्वी आलेल्या 'फास्टर फेणे' या चित्रपटानेही अशीच किमया केली होती. फास्टर फेणे हाही तसा जुन्या काळातलाच पण त्या कथेचा धागा पकडून त्याची मांडणी आजच्या काळाला अनुसरून केल्यामुळे फास्टर फेणे ताजा वाटला, नवा वाटला आणि आजच्या काळातला वाटला. 'अलबत्या-गलबत्या'च्या बाबतीतही हाच नवेपणा आणि ताजेपणा अनुभवायला मिळतो आणि म्हणूनच आज हे नाटक रंगभूमी गाजवतं आहे. मुलांच्या मनावर स्वार होत काही तास त्यांना टीव्ही, मोबाईलपासून दूर नेत एका लाइव्ह कलाकृतीचा आनंद देत आहे, जी आज काळाची गरज आहे.


**- मनीषा नित्सुरे-जोशी**

manisha.nitsure@gmail.com

# नवे पुरुषभान : नव्या जगासाठी नवा विचार

**रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ**

**का. स. वाणी प्रगत अध्ययन संस्था (कासवा), धुळे व मेन अगेन्स्ट व्हायलन्स अँड अॅब्युज (मावा), मुंबई ह्या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने एक बहुविद्याशाखीय परिषद आयोजित करण्यात आली. छाया दातार, विजया चौहान, रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ आणि वंदना महाजन ह्यांच्या पुढाकारातून साकार झालेल्या ह्या परिषदेचा विषय होता– 'सांस्कृतिक बदल व नवे पुरुषभान'. शीर्षकापासून वेगळेपण असणाऱ्या ह्या परिषदेने मराठी विचारविश्वाला नेमके काय योगदान दिले, त्याचा हा थोडक्यात आढावा.**

**नव्या जगात कोसळणारे जुने वैचारिक इमले**

गेल्या शतकभरात जग झपाट्याने बदलले आहे. विज्ञान-तंत्रज्ञान, तसेच सामाजिक-राजकीय रचना ह्यांतील मूलभूत बदलांमुळे विचारसरणीचा आधार असणाऱ्या भौतिक रचनांची पुनर्मांडणी होऊ लागली आहे. शोषणासोबतच सृजनाच्या असंख्य संभावना जागविणारे नवे विश्व, नवे मानवी मानस आकार घेत आहे, ज्याचा अदमास जुन्या फुटपट्ट्या वापरून घेणे अशक्य झाले आहे. स्त्री-पुरुष सत्ता-संबंध, पर्यायाने स्त्री-पुरुष नाते वेगाने बदलते आहे. नव्या वैज्ञानिक संशोधनामुळे स्त्री-पुरुष अस्मितेचे द्वैतच धोक्यात आले आहे. लिंगभाव किंवा लैंगिक स्व-ओळख ही काळ्या फत्तरावरील ठाशीव रेघ नसून एका विशाल गतिशील पटावरील हलता बिंदू आहे, हे सत्य विज्ञानाने समोर आणले आहे. एकूणच, जगातील द्वैताधारित मांडण्या कालबाह्य ठरत आहेत, कारण सर्व रचना झपाट्याने बदलत आहेत, ठाशीवतेकडून व्यामिश्रतेकडे जात आहेत. स्त्रीवादी चळवळीचा भर ओसरला असला तरी स्त्री-पुरुष-अन्य लिंगी ह्यांच्या नात्यातील मूलभूत पेच अजून कायम आहेत. स्त्रीवाद स्त्रियांनी काय करावे हे सांगतो, परंतु पुरुषांनी स्वतःला का व कसे बदलावे हे सांगत नाही. पुरुषाला शोषकाच्या भूमिकेतून बाहेर पडण्यास साह्य करत नाही. त्यामुळे स्त्रीवादाला समांतर, स्त्री व पुरुष दोघांनाही अधिक निरामय संबंधांकडे नेणाऱ्या एका नव्या विचाराची गरज समाजाला जाणवते आहे. जगभरात अनेक व्यक्ती-संघटना ह्या दृष्टीने काम करीत आहेत. ह्या पार्श्वभूमीतून ह्या परिषदेची कल्पना जन्माला आली.

कोणताही नवा विचार रुजण्यासाठी आधी तो स्पष्ट स्वरूपात मांडता येणे आवश्यक आहे. त्याची पाळेमुळे राजकीय-सांस्कृतिक पर्यावरणात खोलवर रुजलेली असावी, पण त्याला स्थानिकतेसोबतच वैश्विक परिमाणही हवे. शिवाय तो अस्तित्वात येण्यासाठी त्याला भक्कम भौतिक पायादेखील हवा. 'नवा पुरुष' ह्या संकल्पनेच्या बाबतीत परिषदेत वरील मुद्द्यांवर पहिल्यांदाच महत्त्वाची वैचारिक मांडणी करण्यात आली.

**'नवा पुरुष' कोण?**

इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यावर असा पुरुष नक्कीच होता, जो रूढ सामाजिक संकेत, परंपरा, बंधने नाकारून स्त्रीशी निरामय नाते निर्माण करण्यासाठी धडपडत होता. तो स्त्रीवर होणाऱ्या हिंसेचा, अत्याचारांचा प्रतिकार करीत त्याविषयी समाजाला जाब विचारणारा वीरपुरुष असेल, किंवा स्त्रीला ज्याबद्दल आपुलकी, जिव्हाळा वाटतो, ज्याच्या संगतीत तिला निःशंक, सुरक्षित वाटते असा तिचा सखा, मित्र असेल. स्त्री-पुरुष समतेच्या आजच्या काळातील फुटपट्ट्यांनी कालच्या काळातील पुरुषाला मोजता येणार नाही, पण त्याच्याविषयी काही सार्वकालिक निकष मात्र निश्चितच ठरवता येतील. उदा.;

१. पुरुषसत्तेने घालून दिलेले, स्त्री-पुरुष विषमतेला पुष्टी देणारे त्या त्या काळाचे रूढ सामाजिक संकेत, परंपरा, बंधने ह्यांचा विचार व कृतीच्या पातळीवर विरोध करणे

२. स्त्रीला भोगदासी किंवा मालमत्ता न समजता तिला मानव समजून तिच्याशी तसा व्यवहार करणे

३. स्त्रीच्या अडचणींचा पुरुष म्हणून फायदा न उचलता आपुलकी, स्नेह किंवा प्रेमाच्या भावनेने तिच्या पाठीशी उभे राहणे

४. स्त्रीवर होणाऱ्या हिंसेचा विरोध करीत अत्याचाऱ्यांना जाब विचारणे

म्हणजेच समाजप्रबोधनाचे, परिवर्तनाचे कार्य करणारा जसा 'नवा पुरुष' आहे, तसाच व्यक्तिगत पातळीवर (अर्थात आपला पुरुषी अहंकार सोडून, तसेच जातीय-धार्मिक अस्मिता न बाळगता) कोणा स्त्रीच्या मागे भक्कमपणे उभा राहणारा सामान्य पुरुष हादेखील त्या काळातील 'नवा पुरुष'च असेल.



नवे पुरुषभान उद्घाटन : 'आमची श्रीवाणी' नियतकालिकाच्या विशेषांकाचे प्रकाशन. विचारपीठावर डावीकडून : डॉ. वंदना महाजन, विद्या बाळ, डॉ. दिलीप पांढरपट्टे (जिल्हधिकारी, धुळे), डॉ. पी. बी. पाटील (माजी कुलगुरू, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ), रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ आणि डॉ. शोभा शिंदे (सचिव, का. स. वाणी संस्था)

**'नव्या पुरुषा'ची सांस्कृतिक परंपरा**

महाराष्ट्राचे लाडके आराध्यदैवत विठोबा हा एक आगळा-वेगळा देव आहे. तो निःशस्त्र आहे. त्याने आपले हात आशीर्वादासाठीही उंचावलेले नाहीत, तर कमरेवर ठेवलेले आहेत. तो कोणाच्या नवसाला पावत नाही. एकूणच बलवान, वरद (म्हणजेच कर्तबगार), रिपुदमनकारी पुरुषाच्या प्रतिमेत तो चुकूनही बसत नाही. तो कुटुंबवत्सल, लेकुरवाळा आहे. त्याचे भक्त हीच त्याची लेकरे. त्यांनी तर त्याला अगदी मुठीत ठेवले आहे. कोणी त्याला एका जागेवर विटेवर निमूट उभे राहायला सांगतो, तर कोणी पाणी भरायला, जात्यावर दळायला त्याची मदत मागते. एकूण काय, तर मायाळू, प्रेमाने वश होणारी अशी ही 'विठूमाऊली' आहे. 'स्त्री-गुणांनी' परिपूर्ण 'नव्या पुरुषा'ची दैवी आवृत्ती! विठूच्या लेकरांनी हीच परंपरा पुढे चालवली. मुक्ता, जनाबाई बंडखोर, तर ज्ञानोबा, नामदेव, एकनाथ लोण्याहून मऊ, प्रेमाने काठोकाठ भरलेले, सर्वांशी समतेने व्यवहार करणारे.

अनेक शतके विषमताधारित धर्म व जातीव्यवस्थेच्या बंधनात अडकलेल्या समाजात असे 'नवे पुरुष' अपवादस्वरूपच राहिले. पण ही बंधने ज्यांना काचत होती, त्या स्त्रियांना नक्कीच अशा 'नव्या पुरुषा'ची आस लागून राहिली होती. त्यांच्या आसपास समाजातदेखील असे पुरुष तुरळक संख्येने का होईना, वावरत होते हे निश्चित. एरवी 'मानलेल्या भावा'शी असणाऱ्या स्त्रियांच्या अनोख्या भावबंधाची मनोहारी रूपे आपल्याला लोकसाहित्यात, विशेषतः लोकगीतात इतक्या विपुलतेने आढळली नसती. मराठी लोकगीतात द्रौपदीचा सखा-मार्गदर्शक कृष्ण जसा ठायी-ठायी दिसतो, तसाच साध्याभोळ्या बायकांच्या हाकेला धावून येणारा (नात्याचा ना गोत्याचा) मानलेला भाऊही प्रत्यही भेटतो.

आधुनिक काळात म. फुलेंनी आपल्या विचार व कार्यातून जात-धर्माच्या पल्याड जाऊन स्त्रीच्या पाठीमागे उभा राहणाऱ्या 'नव्या पुरुषा'चा वस्तुपाठच उभा केला. गांधीविचारात करुणा, प्रेम व अहिंसा ह्या मूल्यांना मध्यवर्ती स्थान असल्यामुळे त्यांच्या वैचारिक परंपरेत साने गुरुजी, एस्. एम्. जोशी ह्यांच्यासारखे मातृहृदयी पुरुषही निर्माण झाले. त्याच परंपरेचा विकास करीत दादा धर्माधिकारींनी स्त्री-पुरुष सहजीवनाची संकल्पना मांडून स्त्री व पुरुष दोघांनाही शोषक व्यवस्थेपासून कशी मुक्ती मिळविता येईल ह्याचे सविस्तर विवेचन केले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी आपले विचार व सर्व जातीवर्गातील स्त्रियांच्या उन्नयनासाठी केलेले कार्य ह्यांतून एक पुरुष, स्त्री-पुरुष समतेसाठी काय करू सकतो ह्याचा आदर्श घालून दिला. ह्या समृद्ध वारशासोबतच धोंडो केशव कर्वे, रघुनाथ धोंडो कर्वे, विठ्ठल रामजी शिंदे, आगरकर, साने गुरुजी, विनोबा, दादा धर्माधिकारी, कॉ. शरद पाटील, आ. ह. साळुंखे अशा कितीतरी पुरुषांनी महाराष्ट्राच्या मनोभूमीत स्त्री-पुरुष समतेच्या विचारांची मशागत जाणीवपूर्वक केली आहे. मराठी मानस ह्या सर्व पुरोगामी परंपरामधून घडले आहे.

**'नव्या पुरुषा'ची प्रासंगिकता**

भारतातील (व जगभरातील) स्त्रीचळवळ एका टप्प्यावर आल्यावर थबकली, ह्यामागे अनेकविध कारणे आहेत. पण ह्या चळवळीने उंबरठ्याच्या आतील स्त्रियांना बाहेरचे विशाल जग दाखवले व ते व्यापण्याची प्रेरणा दिली, पण उंबरठ्याबाहेर वावरणाऱ्या पुरुषांची मुक्ती उंबरठ्याच्या आत गेल्याने होऊ शकेल हे मात्र सांगितले नाही; स्त्री-पुरुष समतेच्या लढ्यात सामील होण्यासाठी पुरुषांना सोबत घेतले नाही, हेदेखील त्यांपैकी एक कारण असू शकेल, ही मांडणी स्त्रीमुक्तीच्या समर्थकांपैकी काहींना सयुक्तिक वाटू लागली आहे. एकाच समाजाचे दोन अभिन्न घटक असणाऱ्या स्त्री व पुरुष ह्या दोघांनाही सोबत घेतल्याशिवाय समाज बदलू शकणार नाही. स्त्रियांची समस्या ही मुळात स्त्री, पुरुष व अन्य लिंगी ह्यांच्या निरामय सहजीवनाची समस्या आहे. म्हणून पुरुषांना लिंगभाव समतेकडे नेणे हेच स्त्रीमुक्ती चळवळीचे पुढचे पाऊल असायला हवे, हा विचार आता हळू हळू देशात व जगभर पसरू लागला आहे. 'व्हाईट रिबन मुव्हमेंट', 'मेन अगेन्स्ट सेक्सिझम' ह्यांसारख्या संघटना अनेक देशांतून कार्यरत आहेत. हे सर्व वास्तव कवेत घेऊन 'नवा पुरुष'च्या निमित्ताने स्त्रीवादाला पूरक, समांतर अशा 'मानुषवादाची' संकल्पना मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न ह्या परिषदेत करण्यात आला.

**स्त्रीदास्यअंताचा विचार कुठे हरवला?**

ह्या परिषदेत मराठी साहित्य, स्त्रीवाद, पुरुषत्व व लिंगभाव ह्यांवर काम करणारे कार्यकर्ते व अभ्यासक, सामाजिक शास्त्रांचे अभ्यासक, पत्रकार, माध्यमकर्मी, कलावंत व अन्य संवेदनशील नागरिक एकत्र आले. त्यांनी एकीकडे समाज, साहित्य, माध्यमे

ह्यांत 'नवा पुरुष' कुठे दिसतो ह्याचा डोळसपणे, संवेदनशीलतेने मागोवा घेतला, तर दुसरीकडे तो ठळकपणे दिसत नसल्यास असे का घडते ह्याची परखड समीक्षाही केली. उदा.; परिषदेतील एका स्वतंत्र सत्रात गांधी, फुले, आंबेडकर ह्यांचे नाव घेणाऱ्या विचारप्रवाहांमधून स्त्रीदास्यमुक्तीचा विचार कसा हरपला ह्याबद्दल त्या-त्या चळवळीत सक्रीय असणाऱ्या कार्यकर्त्यांनी आत्ममूल्यांकन केले.

बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या आयुष्यात स्त्री-पुरुष समतेच्या बाबतीत काही महत्त्वपूर्ण व तगडे वैचारिक व कृतिशील हस्तक्षेप केले. परंतु, त्यांचा तो वारसा पुढे चालविण्यात नंतरचे राजकीय नेतृत्व संपूर्णपणे अयशस्वी ठरले. त्यांनी त्या दिशेने कोणतेही प्रामाणिक प्रयत्नच केले नाहीत. क्षुद्र राजकीय महत्वाकांक्षा, अहंभाव, विवेकभ्रष्टता ह्यांमुळे वावटळीत सापडलेली आंबेडकरी चळवळ जात-वर्गीय लढ्याचेच भान हरपून बसली आहे. तिच्याकडून पुरुषमुक्तीच्या भानाची अपेक्षा करणे, हे जरा अतीच झाले, असे सडेतोड प्रतिपादन चळवळीतील कृतिशील कार्यकर्ते **सुरेश सावंत** ह्यांनी केले.

गांधीवादी चळवळ, विशेषतः तिच्यातील स्त्री-पुरुष सहजीवनाचा आशय लुप्त होण्यामागे जीवनाच्या सर्व क्षेत्रात अहिंसेची झालेली पिछेहाट, घरातील कामात हातभार लावण्यास पुरुषांनी दिलेला नकार आणि समतेचे मूल्य रुजविणाऱ्या शिक्षणाचा अभाव ही महत्त्वाची कारणे आहेत, असे **श्याम पाखरे** यांनी नमूद केले. गांधीजींच्या अहिंसेतील शौर्य व हिंमत पुढच्या पिढीपर्यंत पोहोचलीच नाही; तिने अहिंसेला स्त्रैण मानले आणि 'हिंसक अँग्री यंग मॅन'ला आदर्श मानले. स्त्री-चळवळही देहात्मकतेपलीकडे जाऊ शकली नाही. पर्यायाने, स्त्रीत्व व पुरुषत्व ह्यांच्या मर्यादा ओलांडण्याचा गांधींचा विचार प्रत्यक्षात येऊ शकला नाही, असे निरीक्षण त्यांनी नोंदविले. **रेखा ठाकूर** यांनी असे मांडले की ज्योतिबा व सावित्रीबाईंचा वैचारिक वारसा बाबासाहेबांनी समर्थपणे पुढे चालविला. आजही फुले-आंबेडकरवादी बौद्ध-मातंग चळवळ सावित्रीच्या कन्यांना वाचवता वाचवता सोबत रमाई-कन्यांनाही घेत आहे. सावित्रीच्या लेकींचे मागासलेपण व सत्ताहीनता ही ब्राह्मो-क्षत्रिय युतीच्या राजकारणाची देन आहे, त्यामुळे दुटप्पी ब्राह्मण व क्षत्रिय पुरोगामी हेच सावित्रीच्या लेकींपुढचे आव्हान आहे, असे त्यांनी विशद केले. एकूण कारणे वेगवेगळी असली तरी परिवर्तनाच्या ह्या तिन्ही प्रवाहातील स्त्रियांना बळ देणारा विचार आता क्षीण झाला आहे, त्यामुळे ह्या चळवळींच्या आचार-विचाराची पुनर्मांडणी करण्याची गरजच ह्या चर्चेतून अधोरेखित झाली.

स्त्री-चळवळ आणि पुरुषांचा सहभाग ह्या संदर्भात बोलताना **छाया दातार** ह्यांनी असे मत व्यक्त केले की, आमच्या चळवळीच्या पहिल्या टप्प्यात सोबत असणारे पुरुष बदलले होते, पण परिवर्तनाच्या प्रक्रियेत ह्या पुरुषांना सामील करून घेण्यात स्त्री-चळवळीला काहीसा वेळच लागला. गर्भलिंगपरीक्षा व बलात्कारासारखे मुद्दे असोत, की कलेच्या माध्यमातून नवे पुरुषभान जागविणे असो, संवेदनशील पुरुषांनी नेहमीच आम्हाला साथ दिली. आमच्या कौटुंबिक व व्यक्तिगत आयुष्यातही असे अनेक 'नवे पुरुष' आम्हाला भेटले. पण त्याबरोबरच विद्यापीठ, चळवळी ह्यांत आपल्या स्थानाचा, पुरोगामित्वाच्या प्रतिमेचा फायदा घेऊन स्त्रियांचे शोषण करणारे पुरुषही आम्ही पाहिलेत. पुरुषांच्या सहभागाविषयीचे प्रश्न स्त्री-चळवळ विचारायला लागली आहे. पण त्यासोबतच आपण सर्वांनी स्वतःला वारंवार तपासून आपल्यातले पुरुषसत्तेच्या प्रभावाचे अवशेष काढून टाकण्याची नितांत गरज आहे असेही त्यांनी सांगितले.

### पुरुषभानाचे भौतिक आधार

नरभानाचा निचरा केल्याशिवाय पुरुषभानापर्यंत पोहचता येत नाही, म्हणून भारतीय संदर्भात पुरुषभानाचा विचार करताना प्रामुख्याने सांस्कृतिक भानाचाच विचार केला जातो. परंतु, त्याचबरोबर त्याच्या भौतिक - सामाजिक व आर्थिक - आधाराचा विचार करणेही तेवढेच आवश्यक आहे. ह्या संदर्भात मांडले गेलेले दोन्ही शोधनिबंध- **देवकुमार अहिरे** ह्यांचे जातिपितृसंस्थेविषयीचे विवेचन आणि संजीव चांदोरकर ह्यांनी जागतिकीकरणानंतरच्या अर्थव्यवस्थेचा स्त्री-पुरुष नात्यावर झालेल्या परिणामांचा घेतलेला आढावा - एक नवा विचारव्यूह उभे करणारे होते. 'जातीसंस्थेचा विचार 'ब्राह्मणी कावा' आणि 'दलितांचे शोषण' ह्यांच्यापलीकडे जाऊन करायला हवा, येथून अहिरेंच्या मांडणीला सुरुवात होते. जातीच्या संदर्भात 'गांधी-आंबेडकर' आणि 'शहर-खेडे' वादाची पुनर्तपासणी व्हायला हवी, असा आग्रहही ते धरतात. त्याचबरोबर पितृसंस्थेचे एकसाची चिरेबंद स्वरूप नाकारून बहुविध पितृसंस्थांच्या अभ्यासाचा आग्रह धरतानाही, जातीनिहाय पितृसंस्थेचा विचार करण्यातले धोकेही ते स्पष्टपणे मांडतात.

**संजीव चांदोरकर** आपल्या विवेचनात नवभांडवली व्यवस्थेची एकेक वैशिष्ट्ये नोंदवत त्यांचा स्त्री-पुरुष नात्यावर कसा परिणाम होऊ शकेल ह्याचा विचार करण्यास बाध्य केले. लोककल्याणकारी राज्य अस्तंगत झाल्यामुळे लोकांच्या जीवनावश्यक गरजा भागविण्याच्या जबाबदारीतून राज्याने अंग काढून घेतले आहे. प्रत्येक संकल्पनेचे वस्तूकरण करणाऱ्या ह्या व्यवस्थेत स्त्री-पुरुष नाते ही देखील क्रयवस्तू बनते, व त्यातून 'वापरा व फेकून द्या' संस्कृतीला बळ मिळते असे ते म्हणाले.

### 'नवे स्त्री-पुरुष' व जुनी-नवी माध्यमे

निर्भयाच्या खुन्यांवर प्रसिद्धीचा झोत ओतणारी माध्यमे तिला अखेरपर्यंत साथ देणाऱ्या तिच्या मित्राबद्दल तसेच अशा मैत्रिणींची पाठराखण करताना मृत्युमुखी पडलेल्या मुंबईतील संतोष विचीवारा, किनन आणि रुबेनसारख्या तरुणांबद्दल मूक का राहिली ह्याची चर्चाही ह्या विचारपीठावरून करण्यात आली. त्या निमित्ताने अभिव्यक्तीच्या विविध माध्यमातून 'नवा पुरुष' कितपत दिसतो,



**नवे पुरुषभान चर्चासत्र : बोलताना डॉ वंदना महाजन, डावीकडून – कवयित्री नीरजा, डॉ. छाया दातार व प्रा. संजीव चांदोरकर**

आकळतो ह्याचा अभ्यासपूर्ण आढावा अनेक वक्त्यांनी घेतला. कवयित्री **नीरजा** ह्यांनी आपल्या निबंधातून मराठी पुरुष कवींच्या कवितेत दिसणारी स्त्री आणि स्त्रियांच्या कवितेत दिसणारा पुरुष ह्यांची ऐतिहासिक समीक्षा केली. एकोणीसशे साठपूर्वी काही पुरोगामी कवींचा अपवाद सोडला तर पुरुष कवींच्या काव्यातील स्त्रीचे चित्रण बरेचसे सांकेतिक स्वरूपाचे होते. साठोत्तरी कालखंडात विविध बाजाची कविता लिहिली गेली, तरी पुरुषांनी स्त्रीचे चित्रण प्रामुख्याने आई, प्रेयसी आणि क्वचित मुलगी ह्याच रूपांतून केलेले दिसते. एकूण स्त्री, तिचे सामाजिक स्थान, तिचे शोषण, त्यातील पुरुषाचा सहभाग ह्याबद्दल ते व्यक्त होताना फारसे दिसत नाहीत. साठोत्तरी कविता लिहिणारे महानगरी कवी असोत, की जागतिकीकरणानंतरच्या जगात स्वतःचे स्थान शोधणारे उत्तर–आधुनिक जाणिवेचे आत्ममग्न कवी असोत, स्त्रिया, त्यांचे दुःख, त्यांच्यातील सर्जनशीलतेचा झरा ह्यांपर्यंत पोहचण्याची प्रेरणाच पुरुष कवींमध्ये दिसत नाही. अर्थात मातीशी नाळ जुळलेले काही कवी मात्र आपल्या आजी–आई–बहिणीच्या दुःखाला समजून घेत, कधी उपरोधाने तर कधी आत्मटीका करीत तिच्याशी स्वतःला जोडण्याचा प्रामाणिक प्रयत्न करताना दिसतात. स्त्रियांना आपल्या शोषणाचे भान पूर्वीपासून असले, तरी सत्तरीनंतरच्या आत्मभान आलेल्या स्त्रियांच्या काव्याचा स्वर साहजिकच तीव्र आहे, परंतु तेव्हापासून आतापर्यंत त्यांना आपल्या भोवतालच्या पुरुषांचा दृष्टिकोन फारसा बदललेला दिसत नसल्यामुळे त्या प्रामुख्याने 'जुन्या' पुरुषभानाबद्दलच बोलताना आपल्याला दिसतात. मुक्तीच्या किनाऱ्याकडे जाताना पुरुषाची साथ हवी असे त्यांना वाटते. निदान आपला मुलगा किंवा मित्र ह्यात आपली साथ देईल का अशी शंकेचा किनार लाभलेली आशा त्यांना वाटते आणि ती त्यांच्या कवितेतून व्यक्त होताना दिसते.

ललित कलांच्या संदर्भात विचार करताना जाणवते की भारतीय परंपरेतील शूद्रांची कला आधुनिक काळात ब्राह्मणांनी पळवली व 'शुद्ध' करून घेतली. त्यामुळे दूरदर्शनचे भारतात आगमन झाले, तेव्हा कलेवर पुरुषसत्ता आणि वर्णवर्चस्वाचा स्पष्ट प्रभाव होता. उदारीकरणानंतर कला ही बाजारपेठेला पूर्णपणे शरण गेली. टीव्हीच्या प्रेक्षकाचे सरासरी मानसिक वय ६–८ वर्षे आहे असे मानून सर्व वयोगटांसाठी 'चांदोबा' दर्जाचे कार्यक्रम बेतले गेले. आज टीव्हीवर पुनरुज्जीवनवादाला ऊत आला आहे. १६व्या शतकातील मानसिकता दर्शविणारे पोशाखी व तद्दन खोटे कार्यक्रम दाखविले जात आहेत. त्यांतील व्यक्तित्वे बाजारात विरघळलेली असतात, त्यामुळे त्यांच्यात पुरुषभान शोधण्याचा प्रश्नच येत नाही, असे प्रतिपादन **संजय पवार** ह्यांनी केले.

चित्रपटातील व्यक्तिरेखा समाजातील वास्तवाचे प्रतिबिंब असल्या, तरी त्या ह्या प्रतिमा ठाशीव करण्याचे कार्य करीत असतात, असे नमूद करून **सतीश मनवर** यांनी पूर्वीच्या काळाच्या तुलनेत आजच्या सिनेमात पुरुषी नसणाऱ्या पुरुषांच्या प्रतिमा अधिक स्पष्टपणे रेखाटल्या जातात, असे निरीक्षण नोंदवले. निरपेक्ष सहकारी, स्त्रीवर प्रेम न लादणारा प्रियकर, तिच्या ध्येयपूर्तीत साह्य करणारा साथीदार अशी नव्या पुरुषाची अनेक रूपे आजच्या सिनेमात कशी दिसतात, हे त्यांनी अनेक उदाहरणांनी विशद केले. रडणाऱ्या पुरुषाला हिणवणारा समाज आजच्या चित्रपटातून कमी दिसतो. स्त्रियांना धडाडीचा, खुल्या विचारांचा, तिचे मन जाणून घेणारा पुरुष आवडतो हे स्त्री दिग्दर्शिकांच्या सिनेमांमधून येते. संकटात सापडलेल्या मुलीला मदत करणारी, वाचवणारी व्यक्ती ही पुरुष न दिसता एक व्यक्ती म्हणून दिसते. मात्र पुरुषाची होणारी आर्थिक, सामाजिक व अभिव्यक्तीविषयक, अशी तिहेरी कोंडी मात्र ह्या चित्रपटांतून समर्थपणे व्यक्त होताना दिसत नाही, असेही ते नोंदवितात.

'नव्या' माध्यमांविषयी भाष्य करताना **श्रीरंजन आवटे** काही महत्त्वाच्या गोष्टींकडे आपले लक्ष वेधतात. छापील माध्यमांच्या तुलनेत इलेक्ट्रॉनिक व सामाजिक माध्यमे ही अगदी अलीकडची. छापील माध्यमात क्वचितच जाणवणारे स्त्रीचे अस्तित्व इलेक्ट्रॉनिक व सामाजिक माध्यमातून मात्र ठळकपणे जाणवते, कारण दरम्यानच्या काळात स्त्रीने समाजात आपल्या कर्तृत्वाची मुद्रा ठाशीवपणे उमटवलेली होती. परंतु जागतिकीकरणाच्या काळातील सांस्कृतिक वर्चस्वाच्या लढाईत पारंपारिक व आधुनिक स्त्रीच्या चुकीच्या प्रतिमा गडद करण्यातच बाजारकेंद्री इलेक्ट्रॉनिक माध्यमांनी धन्यता मानली. त्या तुलनेत सामाजिक माध्यमातून एकच बृहद्कथन रूढ करणे शक्य नाही, कारण त्याचे स्वरूपच तसे घडण्यास अनुकूल नाही. ह्या माध्यमांतून आतापर्यंत दबलेले अनेक समाजघटक व्यक्त होऊ लागले आहेत. स्त्रिया ह्यातून मुख्यतः लेखनातून व्यक्त होताना दिसतात. परंतु ह्या माध्यमांतून कसलाही मूल्याधार नसणाऱ्या, प्रेम म्हणजे सेक्स, तेही पॉर्न अशा निव्वळ उपभोगवादी संकल्पना रूढ होण्याचा मोठा धोका आहे. अशा वेळी स्त्री–पुरुष नात्याला नर–मादी भेदापलीकडे न्यावयाचे असल्यास आपल्याला आधी नव्या माध्यमांची परिभाषा आत्मसात करावी लागेल व त्यातूनच नवा आशय निर्माण करता येईल, असेही त्यांनी सुचविले.

**'नवा पुरुष' कसा घडतो ?**

मुलगा म्हणून जन्मलेल्या व्यक्तीला पुरुष असल्याची जाणीव

व स्व-ओळख देण्याचे कार्य सामाजिकीकरणाची प्रक्रिया करीत असते. पितृसत्ताक समाजरचना ह्यासोबतच सांस्कृतिकीकरणाच्या माध्यमातून हिंसा व अत्याचार ही जिची व्यवच्छेदक लक्षणे आहेत, अशा वर्चस्ववादी मर्दानगीचे संस्कार मुलग्यांवर करते. मर्दानगीची रचना, वैश्विक ते स्थानिक पातळीवरील अनेक घटक, उदा. आंतरराष्ट्रीय बाजार, जात, धर्म, माध्यमे - मिळून करीत असतात. नवे पुरुषभान जागवताना मर्दानगीचे हे जुने साचे मोडकळीत काढायला हवे अशी मांडणी शोभा शिंदे यांनी केली.

आंतरराष्ट्रीय पातळीवर पुरुषांच्या सहभागाचा मुद्दा चर्चिला जाण्यापूर्वीच महाराष्ट्रात त्या कार्याचा आरंभ झाला होता, असे नमूद करून **मिलिंद चव्हाण** यांनी महाराष्ट्रातील 'पुरुष उवाच', 'मावा', 'तथापि', 'कोरो', 'नारी समता मंच', 'मासूम' इ. संस्थांच्या, तसेच समतेसाठी पुरुष आणि पितृसत्तेविरुद्ध पुरुष ह्या गटांच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेतला. आजच्या नकारात्मक वातावरणातही ह्या गटांनी पुरुषांची संवेदनशीलता वाढविण्यासाठी विविध माध्यमांतून केलेल्या प्रयत्नांमुळे पुरुषांच्या वैयक्तिक व सामूहिक पातळीवरील विचार व वर्तनात निश्चितच सकारात्मक बदल होतो, हा चव्हाणांचा निष्कर्ष नक्कीच दिलासा देऊन गेला. त्यासोबतच त्यांनी ह्या कामातून निर्माण होणारे नवे पेच, चकवे, तसेच राजकीय भान नसल्यास पुरुषभानास पडणाऱ्या मर्यादा ह्यांची चर्चा केल्यामुळे अजून किती मोठा पल्ला गाठावयाचा आहे, ह्याचेही भान जागे होण्यास त्यांच्या कथनाची मदत झाली.

ह्या परिषदेचा समारोप करताना जळगावच्या जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी **कौस्तुभ दिवेगावकर** ह्यांनी केलेले भाषण नव्या पुरुषभानाविषयीच्या आशा पल्लवित करणारे होते. आजचे आपले सामाजिक वास्तव जात-धर्माने बंदिस्त केलेले, व्यक्तिस्वातंत्र्य संकुचित करणारे व निवडीचे स्वातंत्र्य गमावलेले आहे, असे नमूद करून महानगरे, शहरे आणि खेडी ह्यांतील माणसे आपले अस्तित्व व औचित्य गमावून बसली आहेत आणि नव्या तंत्रज्ञानाच्या माऱ्यापुढे आपण सारे भंजाळलेले डाटा युनिट्स झाले आहोत अशी व्यथा त्यांनी मांडली.

परिषदेत सादर झालेल्या निबंधांइतकीच त्यांवर झालेली चर्चाही उद्‌बोधक होती. नव्या जाणिवेचे प्रसिद्ध लेखक दिनानाथ मनोहर ह्यांच्या अनिल सपकाळ ह्यांनी घेतलेल्या मुलाखतीतून, कार्यकर्ता-लेखक कसा घडतो हे समजण्यास मदत झाली. त्यांच्या लिखाणात दिसणारे नवे पुरुषभान कोठून आले? ह्या प्रश्नाच्या उत्तरात, ''मी काहीही जाणीवपूर्वक केलेले नाही. माझ्या लिखाणात स्त्रीपात्रे स्वाभाविकरीत्याच केंद्रस्थानी येतात. पुरुषपात्रे दुय्यमरीत्या, स्त्रियांच्या संबंधात म्हणून येतात. आदिवासींसोबत राहिल्याने स्त्री-पुरुष नात्याकडे मला अधिक मोकळेपणाने पाहता आले'', असे त्यांनी सांगितले. शिवाय चांगल्या लेखकाने आपले लिखाण पुन्हा-पुन्हा वाचून त्यातून आपले नेणिवेतील संस्कार दिसतात का हे तपासून पाहिले पाहिजे, असेही मार्मिक विधान त्यांनी केले. आपल्या भवतालाच्या संस्कारातून आकाराला येणारी मानसिकता

## या परिषदेतील गणेश देवी यांच्या बीजभाषणातील अंश

पृथ्वीवरच्या जीवशृंखलेत, फक्त माणसाने विस्तृत समाज उभे केले. ह्या प्रक्रियेत जमिनीची मालकी आणि स्त्रीची मालकी जणू काही समानच आहे हे मानणारी अर्थ-व्यवस्था आणि कुटुंबरचना निर्माण केली; इथपर्यंत की ज्यांची जमीन आता त्यांच्या हातातून निघून गेली आहे, ते जणू काही स्त्रीलाच जमिनीप्रमाणे वापरून तिच्यातून उत्पादन होऊ शकते असे मानू लागले आहेत. ह्या साऱ्या ऐतिहासिक क्रमिक घटनांतून पुरुष स्त्रीकडे 'वापरण्याची वस्तू' ह्या नजरेने पाहू लागला. हा दृष्टिकोन 'पुरुषी नजरेच्या' धाकात असलेल्या समाजातील स्त्रियाही स्वतःहून स्वीकारू लागल्या. आपण वापरण्यासाठी लायक बनावे म्हणून आपल्या शरीराला सजविण्यासाठी 'आकर्षणाच्या बाजारात' ठेवू लागल्या. ह्यात 'स्त्रीत्व'ही हरवले आणि 'पुरुषत्व'ही.

सध्या, थोड्या-फार फरकाने, वेगवेगळ्या संस्कृतीतील, देशांतील, समाजांतील आपण सारेच ना पुरुषत्व जाणतो, ना स्त्रीत्व. स्वतःला संवेदनशील मानणारे पुरुष आणि स्वतःला स्त्री-हक्कांच्या पुरस्कर्त्या मानणाऱ्या स्त्रिया यांचाही यात समावेश होतो. हे सारे, आपणच विकसविलेल्या कॅपिटॅलिस्टिक अर्थ-रचनेमुळे, निर्माण केलेल्या उत्पादनपद्धतींमुळे, घडवलेल्या सौंदर्यशास्त्रांमुळे, उभ्या केलेल्या राज्य-व्यवस्थेमुळे आणि स्वीकारलेल्या समाजघडणीमुळे! आता हे सारे बदलायचे असेल तर संभाव्य बदलांच्या पलीकडे पोहचावे लागणार. माणसाच्या कृतीमुळे पृथ्वी नाशाच्या उंबरठ्यावर जाऊन पोहचली आहे व सुदैवाने, तिच्याकडून आपल्याला जोरदार रिमाइंडर्स येऊ लागली आहेत. त्या रिमाइंडर्समुळे मानवी समाजाची नव्या प्रकारची घडी बसवणे, उत्पादनाची नवी व्याख्या आणि त्याच्या नव्या पद्धती निर्माण करणे, मानव प्राण्याविषयी, मानवेतर प्राण्यांना विचारात घेऊन, पुन्हा एकदा व्याख्या करणे निकडीचे बनले आहे.

ह्या मन्वंतराच्या काळात स्त्रीत्वाच्या निकट पुरुषत्वाला नेऊन पोहचवणे शक्य बनू शकते. त्यासाठी 'व्यक्तित्व' ('स्त्रीत्व' + 'पुरुषत्व') संकल्पना केंद्रात आणून, तिला मूलभूत मानून, स्त्री आणि पुरुष यांचा एकमेकांवर आधारित समाज कल्पिला पाहिजे. पुरुषप्रधान समाजाच्या मगरमिठीतून मानवाला सोडवण्याचा हा मार्ग असेल. अर्थातच, आपल्या मर्यादित स्थळ-काळाच्या परिप्रेक्ष्यात ते आव्हानही मोठे आहे. केवळ उत्क्रांतीच्या सुप्त प्रक्रियेकडे बोट दाखवून, अथवा केवळ पृथ्वीकडून येणाऱ्या रिमाइंडर्सचा आधार घेऊन हे विचार-बदल होणार नाहीत. त्यासाठी नव्या संवादाची जरुरी असेल.

टाळून, सभोवतालच्या सीमारेषांना ओलांडून लेखकाला बाहेर पडता यायला हवे, हे त्यांच्या विवेचनाचे मध्यवर्ती सूत्र होते. दोन दिवस सर्व सत्रांत सक्रियरीत्या सहभागी होऊन अखेरीस परिषदेचा समारोप करताना **विद्या बाळ** ह्यांनी सर्व चर्चासत्राचा आढावा घेतला. 'फुलेंच्या काळातही बलात्कार होत होते, म्हणूनच त्यांना बालहत्या प्रतिबंधक गृह काढावे लागले. तेव्हा बलात्कार हे बव्हंशी कुटुंबांतर्गत होत असत, आता त्यांची व्याप्ती वाढली आहे,' अशी महत्वाची निरीक्षणे त्यांनी नोंदवली. अखेरीस स्त्रिया व पुरुष दोघांनाही आपल्या मनावरील जळमटे झटकून नवे स्त्रीभान व पुरुषभान जागवावे लागेल व नव्या स्त्री-पुरुष नात्याची पायाभरणी करावी लागेल, असे आवाहन त्यांनी केले.

दोन दिवसांच्या ह्या परिषदेत अनेक पायाभूत विषयांना हात घालता आला. त्यांतील गुंतागुंत काही प्रमाणात समजून घेता आली. ह्या परिषदेच्या एक आयोजक **वंदना महाजन** ह्यांनी ह्या सर्व चर्चे ला आंतरजालावरील मी 'टू कॅम्पेन' व सारा सरकारने प्रकाशित केलेली स्त्रियांचा लैंगिक छळ करणाऱ्या पुरुषांची यादी ह्या संदर्भांशी जोडले. ह्या घटनांमागील जातवास्तव आणि पुरुषी वर्चस्व ह्यांची अधिक खुलेपणाने चर्चा झाली पाहिजे. निरामय पुरुषभानाच्या दिशेने जाताना विचार व व्यवहार ह्या दोन्ही पातळ्यांवर आपल्याला अजून केवढा मोठा पल्ला गाठायचा आहे हे सत्य त्यांनी त्यातून अधोरेखित केले. विमर्शाची ही प्रक्रिया पुढे चालली तर कार्यकर्ते व अभ्यासक ह्यांना परस्परांची साथ लाभेल व त्यातून समाजात 'नवा पुरुष' निर्माण व दृश्यमान होण्याची प्रक्रिया गतिमान होऊ शकेल. कदाचित अशा सामूहिक प्रक्रियेतूनच स्त्री-पुरुष समतेचा दलदलीत अडकलेला गाडा पुन्हा गतिमान होऊ शकेल.

**– रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ**
भ्रमणध्वनी : ९८३३३४६५३४
ravindrarp@gmail.com

टीप : ह्या परिषदेत सादर करण्यात आलेले सर्व शोधनिबंध 'आपली श्रीवाणी' ह्या त्रैमासिकाच्या जाने-मार्च २०१८ च्या विशेषांकात समाविष्ट करण्यात आले आहेत. अंकाची मृदू प्रत (soft copy) हवी असल्यास संपादकांना खालील ईमेल पत्त्यावर संपर्क करावा –

dr.vandanamahajan@gmail.com

## विजय तेंडुलकर हे मराठीतील एकमेव आधुनिक नाटककार



विजय तेंडुलकरांच्या दहाव्या स्मृतिदिनानिमित्ताने 'पॉप्युलर प्रकाशन' आणि 'आविष्कार' यांच्या संयुक्त विद्यमाने एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात विजय तेंडुलकर यांची सर्व स्वतंत्र नाटके आणि एकांकिका यांच्या समग्र संचाचे प्रकाशन ज्येष्ठ पत्रकार आणि विचारवंत कुमार केतकर यांच्या हस्ते करण्यात आले. आपल्या भाषणात ते म्हणाले, ''तेंडुलकरांच्या नाटकांतले वास्तव आज आपण अनुभवतो आहोत. म्हणूनच आजचा प्रेक्षक, वाचक हा त्या नाटकांशी सहजपणे जोडला जातो. त्यामधल्या वास्तवाच्या दर्शनाने अंतर्मुख होतो. ती नाटके त्याला आपली, आपल्या काळाची वाटतात. तेंडुलकरांच्या नाटकांचे हेच मोठे यश आहे. मराठी रंगभूमीवर अशाप्रकारचे काळाच्या पुढचे वास्तव मांडणारा दुसरा एकही नाटककार नाही. तेंडुलकर हे मराठीतील एकमेव आधुनिक नाटककार आहेत हे त्यामुळेच.''

तत्कालीन सामाजिक परिस्थितीचा वेध घेणारी ही नाटके त्यावेळी स्फोटक ठरली असली तरी भविष्यकाळाच्या परिस्थितीचे ते विदारक चित्रण होते. आणि म्हणूनच तेंडुलकरांची नाटके ही कालबाह्य न ठरता आजचे वास्तव चित्र साकारणारी आहेत हे केतकरांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात तेंडुलकरांच्या नाट्यलेखनाची झलक दाखवणाऱ्या 'तें'च्या नाटकांतील स्वगते – या आविष्कारनिर्मित कार्यक्रमात विजय तेंडुलकरांच्या गाजलेल्या नाटकातील काही भागांचे अभिवाचन मानसी कुलकर्णी, सुशील इनामदार, सुनील जोशी, चिन्मयी सुमीत, दीपक राजाध्यक्ष या कलाकारांनी केले. या बहारदार कार्यक्रमाचे दिग्दर्शन विश्वास सोहोनी यांनी केले होते. तेंडुलकरांची सर्व स्वतंत्र नाटके संचाच्या स्वरूपात नाट्यरसिकांसाठी उपलब्ध झाली आहेत. पॉप्युलर प्रकाशनातर्फे प्रकाशित झालेल्या ह्या तेहतीस पुस्तकांच्या संचाची मूळ किंमत रु. ४५००/- असून रसिक वाचकांसाठी हा संच रु. ३२५०/- या विशेष सवलतीत उपलब्ध आहे. या संचाची ही सवलत दि. ३० जून २०१८ पर्यंतच आहे.



## कनातीमागची पायरव

# तमाशातील मुस्लीम कलावंतांची इबादत

**श्यामल गरूड**

> **'तमाशा' या लोककला प्रकारास मुस्लीम कलावंतांनी फार मोठे योगदान दिले आहे. सध्या या कलावंतांची शेवटची पिढी तमाशात काम करते आहे. या कलावंतांची नोंद महाराष्ट्राच्या लोककलेच्या इतिहासात व्हायलाच हवी.**

महाराष्ट्रातला अस्सल रांगडा तमाशा फुलवायला गावगाड्यातील अठरा पगड जातीतल्या लोकांनी जसे हातभार लावलेत. तसेच त्याच मातीतल्या मुस्लीम कलावंतांचेही योगदान या लोककलेला लाभलेले आहे, हे विसरून चालणार नाही. अल्लाशिवाय दुसरे पूजनीय काहीच न मानणारे, कुराण या एकमेव पवित्र ग्रंथालाच स्वीकारणारे, एकाच दस्तरखानवर आपल्या जैविक व धार्मिक भावंडांसोबत जेवणारे हे अल्लाचे नेक बंदे जेव्हा तमाशा बोर्डावर येतात तेव्हा त्यांचा नूर बघण्यासारखा असतो. जणू त्या परवरदिगारने आपली ही लेकरं तमाशा बोर्डावर अलगद खेळायला सोडलीत. ही कलावंत गणात गणपतीला पूजतात, गौळणीत श्रीकृष्णाचे चरित्र स्वमुखाने आळवीत खट्याळ श्रीकृष्ण होऊन गौळणींच्या खोड्या काढतात. वगनाट्यात कधी कर्ण होऊन कवच कुंडलं काढून देताना तेवढेच व्याकूळ होतात. कधी अर्जुन होऊन कर्तव्य पार करतात. कधी रयतेच्या राजाच्या चिलखतात शिरतात तर कधी ज्ञानदेव – तुकाराम – चोखामेळाच्या अभंगात अवघे न्हाऊन निघतात. कुठल्याही पात्रात शिरताना आपले अंतःस्थ धर्मसोहळे ते बोर्डावर चढण्यापूर्वीच उतरवून ठेवतात. अस्खलित मराठी व ग्रामीण रांगडा ठसका हा प्रत्येक मुस्लीम कलावंतांचा जणू दागिनाच.

महाराष्ट्रातल्या गिन्याचुन्या राहिलेल्या अनेक मुस्लीम कलावंतांना 'कनातीच्या मागे' हे सदर सुरू असताना त्या त्या गावी जाऊन मला भेटता आले. तमाशात सध्या मुस्लीमांमधली शेवटची पिढी काम करीत आहे. अलीकडच्या सांस्कृतिक पर्यावरणाचा तो भाग आहे. अर्थात फाळणीनंतर कडू जहर बऱ्यापैकी पसरले होते. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात विशेषतः महाराष्ट्रातल्या परिवर्तनवादी चळवळींमुळे बऱ्यापैकी येथे सलोखा निर्माण झाला होता, पण या देशात मंडलचा वाद चिघळविण्यात आला व त्याला जोडून कमंडलची रणनीती आखण्यात आली व येथूनच सांस्कृतिक राजकारणाचे चक्र फिरले. पुढे बाबरी मशिदीचा ढाचा पाडणे, मग त्याला प्रत्युत्तर मुंबईतले साखळी बॉम्बस्फोट असतील किंवा त्याला पुन्हा चोख उत्तर म्हणजे मुंबईतली दंगल! या साऱ्या सुनियोजित राजकीय घटना असल्या तरी या देशातल्या सामान्य माणसांवर त्याचा खोल परिणाम झालेला आहेच. मुस्लिमांना काफिर ठरविण्याची किंवा त्यांच्या देशप्रेमावर शंका घेण्याची रणनीती व्यवस्थित पसरविण्यात आली. राजकारणी यशस्वी ठरले आणि त्याचमुळे बाबरी पतनानंतर तमाशात एकही नवा मुस्लीम कलावंत आला नसावा. आज तमाशात बोटावर मोजण्याइतकीच कलावंतांची शेवटची पिढी काम करते आहे. ज्यांनी आयुष्यभर नमाजासोबतच तमाशातील गणापासून भैरवीपर्यंतची सारीच कामे इमाने–इतबारे पार पाडलीत, गावगाड्यातल्या जत्रे–यात्रेतला कुंकू, गुलाल, अबीर, बुक्का माथाभर ल्यायला. तमाशाचा संदल खांदाभर नाचवला. त्या परवरदिगारच्या नेक बंद्यांची लोककला इतिहासात नोंद होणे गरजेचे वाटले. त्यातूनच या सदराच्या निमित्ताने महाराष्ट्रभर फिरत असतानाच एक दिवस पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील बेल्हेगाव गाठले.

बेल्हेगाव येथे गुढीपाडव्याला दावल शहा मल्लिक बाबांच्या उरुसाचा माहौल तमाशाने द्विगुणित होतो, तर दुसऱ्या बाजूस श्रावण महिन्यातल्या प्रत्येक पाच मंगळवारी मुक्ताआईच्या यात्रेला देवळासमोर आजही तमाशा केला जातो. अशा या बेल्हेगावात जाऊन मला मुस्लीम कलावंतांचा इतिहास जाणून घेता आला. याच गावचे बशीरभाई बेल्हेकर, ज्यांच्या दोन पिढ्यांनी तमाशाही लोककला आपल्या अंगाखांद्यावर मिरवली, त्या बशीरभाईंना भेटता आले. बेल्हेगाव म्हणजे मुस्लीम तमाशा कलावंतांची पंढरी! १९२० च्या दरम्यान याच गावात विष्णुबुवा बेल्हेकरसह अहमदभाई बेल्हेकर तमाशा मंडळ काढले गेले. आजही बेल्हेगावात मुक्ताईच्या यात्रेत मुस्लीम बांधवांचा मोठा सहभाग असतो.

बेल्हेगावात मुस्लीम कलावंतांची सुरुवातच बशीरभाईंचे काका अहमदभाई बेल्हेकरांमुळे सुरू झाली. त्यानंतर बघता–बघता गावातले अनेक कलावंत पुढे आले. अहमदभाईंनंतर बाबुभाई बेल्हेकर (ढोलकी), माशूमभाई बेल्हेकर (ढोलकी) ते बशीरभाई

बेल्हेकर (हलगी-ढोलकी-ताशा) बुढणभाई बेल्हेकरांपर्यंतची मोठी परंपरा आहे. हे सारे कलावंत एकाच भावकीतले आहेत. बशीरभाईंसारखा कडक ताशा वाजवणारा अख्ख्या पंचक्रोशीत सापडणार नाही. बशीरभाई प्रत्यक्ष तमाशात जरी काम करीत नसले तरी अनेक तमाशा फडांच्या निर्मितीसाठी ते आर्थिक पाठबळ देतात. आजही महाराष्ट्रातले अनेक (उदा. अलीकडेच अंजली राजे यांचा तमाशा फड असेल) छोटे-मोठे अनेक तमाशे फड बेल्हेगावच्या आसऱ्याखाली उभे राहतात व यांना पाठबळ देणाऱ्यांमध्ये बशीरभाई हे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. बशीरभाईंचा गाई - म्हशी - बैल विक्रीचा मोठा व्यापार आहे. बशीरभाईमुळे बेल्हेगावातला सांस्कृतिक सलोखा जवळून बघता आला.

तमाशात मुस्लीम कलावंतांची सुरुवात पठ्ठे बापूरावांचे समकालीन छोटूखान (सातारा) यांच्यापासून झाली. त्यांचा स्वतःचा तमाशा फड होता. त्यानंतर अहमदभाई शंकर इस्लामपूरकर तमाशा मंडळ पुढे आले. अहमदभाई हे स्वतः कवी होते. त्याकाळी त्यांची एक छक्कड प्रचंड लोकप्रिय झाली होती. ती छक्कड ऐकण्यासाठी गावागावातील माणसं मैलोमैल प्रवास करीत, बैलगाड्या जुंपून तमाशा बघायला यायची. ती छक्कड होती.

माणिक चौकातून जात असताना गोष्ट एक घडली,
हिरव्या रंगातल्या माडीवर एक नार दृष्टीस पडली.
साडी जरतारी, चोळी अंजेरी, दंडामध्ये कसलेली...

या नंतरच्या काळात तमाशासृष्टीला गुलाबराव बोरकरांसारखा एक उत्तम सोंगाड्या लाभला. ज्यांच्या उल्लेखाशिवाय तमाशा सृष्टीतला सोंगाड्याचा इतिहास पूर्णच होऊ शकत नाही. त्यानंतर मोमीन कवठेकरांसारखा सकस गीतकार असेल. त्यांची गाणी पन्नास वर्षांपेक्षा अधिक काळ आजही तमाशावर अधिराज्य गाजवीत आहेत. तमाशाच्या सुवर्णकाळातली ही नावे आहेत. याच काळात फकीरभाई केसनकर (ता. हवेली, जि. पुणे) या सोंगाड्याचाही बोलबाला होता. शब्बीरभाई शाहकर यांच्या व्हिलन रोलने (पार्टीकाम) हवा केली होती. त्याचबरोबर त्यांनी वगनाट्यही लिहिले होते. 'साधू मठातील सैतान', 'कसे घडले वासनाकांड' तत्कालीन सत्यघटनेवर आधारित ही दोन्ही वगनाट्ये तुफान गर्दी खेचत होती. अहमदभाई घोडेगावकर (ता. नेवासा, जि. अहमदनगर) हेही व्हिलनचे उत्तम काम करायचे. तमाशातल्या सुवर्णकाळातली ही कलावंतांची मांदियाळी ! यानंतरचा अलीकडचा काळ गाजवला तो मुन्ना पठाण जवळेकर, बुढणभाई बेल्हेकर, मुबारकभाई बोरगावकर, मुन्नाभाई जुन्नरकर, हुसेनभाई सावळजकर, साहिल पुणेकर, अब्दुल मुंडे नारायणगावकर, गफूरभाई पुणेकर, शेखलाल पटेल धावरवाडीकर या कलावंतांनी. यात दोन नावांचा विशेष उल्लेख करावा लागेल, जे चैत्रातला झाडाखालचा तमाशा मोठ्या नेटाने आजही चालवत आहेत. त्यात पहिले नाव हसनशेख पाटेवाडीकर व अमन तांबे पुणेकर यांची नावे महत्त्वाची आहेत.

इंग्रजांच्या काळात नवाब साहेबांनी तमाशाला राजाश्रय दिला. त्यानंतर बेल्हे गावातला पहिला तमाशा नवाबजींच्या हवेलीवरच व्हायचा, त्यानंतर तो जत्रे-यात्रेत खेळ करण्यासाठी बाहेर पडायचा. नवाबसाहेबांच्या इंतकाल नंतरही बेल्हेगावच्या लोकांनी तमाशा कलावंतांना हातभार लावण्याची प्रथा सुरूच ठेवली. १९७३ साली जेव्हा अहमदभाई बेल्हेकरांची तमाशाची गाडी जळली होती व त्यात एका वायरमनचा भाजून करुण अंत झाला होता, तेव्हा बेल्हे गावातल्या फळविक्री सोसायटीने अहमदभाईंना गाडी घेऊन दिली व पुन्हा तमाशा करायला लावला. बेल्हेकरांनी तमाशाची वहिवाट मोडू दिली नाही. हा सिलसिला बशीरभाईंच्या रूपाने आजही सुरूच आहे. बशीरभाईंचे चुलत बंधू बुढणभाई बेल्हेकर बेपारी यांचाही याठिकाणी आदराने उल्लेख करावा लागेल.


बुढणभाई म्हणजे तमाशासृष्टीतला, वगनाट्यातला जानामाना चेहरा. बेल्हे गावातली ढोल-ताशाची गावकी ज्यांच्या घराण्याला लाभलेली आहे. अहमद सज्जन बेपारी, बनू मिया-बेपारी, बाबुभाई बेपारी यांनीही घराण्याला मिळालेली गावकी सांभाळली, परंतु बुढणभाईंचे मन रमले ते तमाशातच. तमाशा क्षेत्रातला उत्कृष्ट देखणा नट म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांनी वठवलेल्या शिवाजी व संभाजीने अनेकांना झुकून मुजरा करायला लावला. आजही बुढणभाई जेव्हा शिवाजीच्या वेशात तयार होतात तेव्हा त्यांच्या पुढ्यात कुठलाच कलावंत अघळ-पघळ वागत नाही. त्याचबरोबर त्यांचा गाजलेला सिद्दी जौहर, विक्रमादित्य, कर्ण अशा असंख्य ऐतिहासिक, पौराणिक भूमिका आजही तमाशा रसिकांना भुरळ पाडतात. बुढणभाईंनी वगनाट्यही लिहिली आहेत. 'नवसाला


बशीरभाई बेल्हेकर


गुलाबराव बोरगावकर


बुढणभाई बेल्हेकर


बी.के. मोमीन


मुबारकभाई बोरगावकर


हुसेनभाई शेख पाटेवाडीकर

पावली काळूबाई', 'सांभाळ तुझ्या सौभाग्याला', 'शपथ तुला कुलाची' ही वगनाट्ये तमाशात गाजली. रघुवीर खेडकरांच्या तमाशात असताना बुढणभाई भेटले होते. ते म्हणाले, ''कला माझी जात व कलाकार माझा धर्म, बाकी सब झूठ...'' बुढणभाईंच्या प्रत्येक शब्दात प्रामाणिकता होती. हिंदू - मुस्लिमांमधली सनातनी तेढ कुठेही नव्हती किंवा लेखमालेच्या दरम्यान महाराष्ट्रभर माझ्यासोबत फिरणारे हसनशेख पाटेवाडीकर असतील, जे प्रत्येक बुजुर्ग कलावंतांना भेटताना सहज पाया लागत होते. कित्येक तमाशा कलावंतांच्या घरात हसनमामा आला म्हणून तितकेच आदरातिथ्य होताना मी बघत होते. गावगाड्यातली अल्पशिक्षित, अनेकदा निरक्षर असलेली ही कलावंत मंडळी माझ्यापुढे एक वेगळीच निखळ-स्वच्छ दुनिया उभी करीत होती.

तमाशातील मुस्लीम कलावंतांच्या भेटीदरम्यान गीतकार मोमीन कवठेकर यांची भेट विशेष यादगार राहिली. त्याचे कारणही तसेच विशेष होते. लेखमालेच्या दरम्यान एक लेख 'संगीतरत्न दत्ता महाडिक' हा प्रसिद्ध झाला व मला एका वयोवृद्ध कलावंतांचा फोन आला. त्यांच्या बोलण्यात प्रचंड दुखरा सूर होता. मॅडम दत्ता महाडिक हा मोमीन कवठेकरांपासून वेगळा करून कसा लिहिला, माझे प्रत्येक गीत 'मोमीन म्हणे दत्ता' या वाक्याशिवाय पूर्णच होत नाही. मग ते काही वेळ संथ लयीत बोलतच राहिले. मला माझी चूक लक्षात आली. 'मोमीन शिवाय दत्ता' अन 'दत्ता शिवाय मोमीन' अधुरा आहे. पण दत्ता महाडिकच्या माहिती गोळा करताना हे कसे लक्षात आले नाही याचे आश्चर्य वाटले. कदाचित तमाशातील गीतकाराला वेगळा चेहराच नसतो हे अज्ञान माझ्या अंगावर आले होते. आता प्रायश्चित्त घेण्याची वेळ आली होती. मोमीन कवठेकर पंच्याहत्तरी ओलांडलेले. नुकतेच एका दीर्घ आजारातून उठले होते. पण त्यांनी यमाईचे कवठे गावापासून नारायणगावाला येण्याची तयारी दर्शवली. खरं तर मला नारायणगाव गाठणे म्हणजे मुंबई ते पुणे व पुण्यावरून दोन-तीन तासाचा प्रवास करून नारायणगाव गाठणे, ही परिक्रमा करायची होती. त्यात तमाशा पंढरी नारायणगावाला पहिल्यांदा निघाले होते. त्या गावातले कलावंत परिचित पण सर्व तमाशाच्या दौऱ्यांवर गेलेले, पण एका कलावंताने फोनवरून नारायणगावातल्या बऱ्या हॉटेलात सोय करून दिली. छोट्या गावात एकटी स्त्री हॉटेलात उतरते व सांगते की मोमीन कवठेकर आले तर त्यांना वर पाठवा. मॅनेजर व काम करणाऱ्या पोराच्या सूचक नजरा एकमेकांना भेदून माझ्यापर्यंत पोहोचतात. एक अस्वस्थता दाटून आली, पण कवठेकर येईस्तोवर पर्याय नव्हता. एक तासाने मोमीन कवठेकर काठी टेकत हॉटेलात दाखल झाले अन् मी मॅनेजरकडे टोकदार बघत मोमीनकाकांना हाताला पकडून रूमवर घेऊन आले. त्यांना दोन उशा लावून, दुखावलेला पाय सरळ करून निवांत बसवले. त्या पाच मिनिटात त्यांनी एका कापडी पिशवीतून मुरमुरे शेवाचा भत्ता काढून देत माझ्या हातावर खाऊ ठेवला. अन् एका क्षणात कापऱ्या आवाजात म्हणाले, ''खरं तर मला एका स्त्रीला भेटण्याचं दडपणच आलं होतं, पण तुमाला बघून वाटलं, मला जर मुलगी असती तर तुमच्याच वयाची असती.'' काही वर्षांपूर्वीच बापाचं छत्र हरवलेल्या माझ्यासारख्या कुठल्याही माहेरवाशिणीला हा क्षण सांभाळणे तसे कठीणच होते, पण लगेच विषयांतर करत गाडी रुळावर आली अन् बघता-बघता मोमीनकाकांच्या गीतांचा खजाना माझ्यापुढे उलगडत गेला.

बी. के. मोमीन उर्फ बशीरभाई कमरुद्दीन मोमीन यांनी वयाच्या अकराव्या वर्षीच पहिले गीत लिहिले. 'हे कवठे गाव आमचे आहे येमाईचे, चला रे चला रे दर्शना' आई चांदबी अवती-भोवतीच्या गावात बांगड्या विकायची. वडील कमरुद्दीन घोड्यांच्या व्यापारात व मोठा भाऊ अब्बाला मदतीला. छोटा ममीन गावातल्या कलावंतांमध्ये रमायचा. मोठा भाऊही कलाकार, गावातल्या तमाशात आयत्या वेळी कलावंत अडला किंवा नसला तर तो उभा व्हायचा. पण घरात खाणारी बरीच तोंडं, सात बहिणी, चार भाऊ मग त्याला अब्बाजानला मदत करणे क्रमप्राप्त, पण त्याने बशीरला (मोमीन) पूर्ण सूट दिलेली.

शाळेत असतानाच बालशाहिराकडून गावातले गोंधळी - भराडी - वाघे त्याच्याकडून गाणी लिहून घेत. एकीकडे घरची गरिबी तर दुसऱ्या बाजूस शाळा सात - आठ कोस दूर. रोजच्या पायपिटीला वैतागलेल्या मोमीनने नववीतच शाळेला शेवटचा सलाम केला व पुढे मग पूर्णवेळ लेखनातच रमला. यमाईच्या कवठे गावात गंगारामबुवा कवठेकरांचा मोठा तमाशा फड होता. कालांतराने तरुण मोमीनला तमाशासाठी लिहिण्याची इच्छा झाली. गंगारामबुवांच्या तमाशासाठी त्यांनी गण - गौळण ते वगनाट्यापर्यंत लिहून दिले व त्यात स्वतः औरंगजेबाची भूमिका केली. या पहिल्याच तमाशात मोमीन यांची लोकगीते ग्रामीण भागात तुफान लोकप्रिय झाली व याच काळात त्यांच्या लेखनाला बहर आला. उदा. 'बाईनं दावला इंगा', 'तांबडं फुटलं रक्ताचं', 'इश्काने घेतला बळी' ही वगनाट्ये तमाशात गाजू लागली. 'भंगले स्वप्न महाराष्ट्र' हे त्यांचं वगनाट्य हौशी कलावंतांनी पार गोव्यापर्यंत नेलं. त्याचबरोबर 'वेडात मराठे वीर दौडले सात' हेही वगनाट्य खूप लोकप्रिय झाले. तमाशाक्षेत्रात बी. के. मोमीन हे नाव गाजू लागले होते. परंतु पुढे त्यांना खऱ्या अर्थाने प्रसिद्धी मिळाली ती त्यांच्या गीतांमुळे. 'चालली जवानी तुझी वाया, मला का लावलं झुराया' हे बबनराव हाडशीकर यांनी गायलेलं गीत असेल किंवा या गीताचे लोकांमधले वेड बघून संगीतरत्न दत्ता महाडिकांनाही मोमीन यांची भुरळ पडली. या गीतानंतरच तमाशाक्षेत्रात एक सुरेल गोड जोडी एकत्र आली व इथूनच दत्ता महाडिकांचा सुरेल गळा व बी. के. मोमीन यांची लेखणी हातात हात घालून महाराष्ट्रभर दुमदुमू लागली.

दत्ता महाडिकांवर प्रेम करणाऱ्यांच्या किश्शांचा खजाना आजही गावगाड्यात चघळला जातो. महाडिकांच्या प्रेमापोटी लोक मैलोन्मैल पायी चालत तमाशा बघायला व त्यांचं गाणं ऐकायला यायचे. पहाटेचं तांबडं फुटेस्तोवर महाडिकांच्या जादुई

आवाजाने तृप्त व्हायचे. पुढे मोमीन व दत्ता महाडिक हे समीकरणच झाले. त्यातूनच 'लंगडं मारतंय उडून तंगडं', 'सारं हायब्रीड झालं', 'हे असच चालायचं', 'बडे मजेसे म्यारेज किया, मेरे गलेमें घोंगडं आया', 'लय जोरात पिकला जोंधळा', 'फ्याशनचं फ्याड लागतंय ग्वाड', 'घरात टी.व्ही. मिक्सर हवा', 'मोमीन ठेवी कुलर पाण्याला, दत्ता मोल नसे नाण्याला', 'मोमीन म्हणे दत्ता, आली बायांच्या हाती सत्ता' या गीतांनी तमाशाच्या सुवर्णकाळात प्रचंड धमाल केली होती. त्याचबरोबर जनजागृतीचेही काम त्यांनी ग्रामीण भागात केले. उदा. 'दारू सुटली, चालना भेटली', 'सोयऱ्याला धडा शिकवा', 'मनाला आळा एडस् टाळा', 'हुंड्यापायी घडलं सारं'.

मोमीन कवठेकरांचे पोवाडेही गाजले. त्याचबरोबर एकेकाळी दत्ता महाडिक, काळू - बाळू यासारख्या मोठ्या तमाशातील सोंगाड्याना ते विनोदी कोट्याही पुरवायचे. गण - गवळण - लावण्या - भावगीते - भक्तिगीते - कलगीतुरा - बडबड गीते असतील. 'कलावंताच्या आठवणी' हे पुस्तक असेल किंवा 'प्रेमस्वरूप आई' हा कवितासंग्रह, 'एकशे एक लावण्या', 'भंगले स्वप्न महाराष्ट्राचे' ही पुस्तकं असतील. चार हजाराहून अधिक गीतसंपदा लिहिणारा हा शाहीर प्रसिद्धीझोतात तसा कधी आलाच नाही. तमाशासृष्टीचा महानायक रघुवीर खेडकर म्हणतो, ''मागील तीस - चाळीस वर्षांपासून आपली तमाशासृष्टी ही बी. के. मोमीन या शाहिराच्या गीतांवर चालली आहे.'' अशा या अवलिया मोमीन कवठेकरांना भेटण्यासाठी नारायणगाव गाठल्याचा क्षीण आता काही क्षणातच संपलेला होता. निरोपाला संध्याकाळची मावळतीची उन्हं पाठीवर घेत मोमीन काका शांतपणे काठी टेकवत कवठे यमाईच्या ओढीने निघाले. या अवलियाच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघताना वाटले, भविष्यात हा शाहीर जेव्हा केव्हा यमाईच्या मातीत चिरनिद्रेत निजेल तेव्हा तो केवळ परवरदिगारच्या मांडीवरच निजणार नाही तर यमाई देखील या लेकराला आपल्या पदराच्या सावलीखाली ठेवेल. कारण आयुष्यभर त्याच्या सर्जनाच्या पारंब्या तिच्या भुईत रुजल्या होत्या.

तमाशासृष्टीत सोंगाडयांची मोठी परंपरा आहे. कधीकाळी मुघल सैनिकांनी आपला मुक्काम महाराष्ट्रात सुकर होण्यासाठी तरण्या पोरांना काहीतरी कला सादर करण्यासाठी प्रेरित केले. पोरं नाचू - गाऊ लागली. कोट्या करीत सोंगाडपण करू लागली. अर्थात पुढे तमाशाला आकार येत त्याला पेशवाईत राजाश्रय मिळाला, पण सोंगाड्याची परंपरा इथून सुरु झाल्याचे सांगितले जाते. सुरुवातीला गोविंदा, तुळ्या, पुढे दगडोबा साळी शिरोलीकर, विठ्ठल कवठेकर, छोटूखान पोपट नगरकर, लुमा कोडोलीकर, काशिनाथ नारायणगावकर, विश्वासराव नांदवळकर, दादोबा इंदुरीकर, दत्ता महाडिक, गुलाबराव बोरगावकर ते काळू - बाळू, हिरामण बडे (नगरकर), रघुवीर खेडकर ते आजचा रवी बडे (नगरकर) पर्यंतची मोठी परंपरा आहे. या परंपरेत गुलाबराव बोरगावकरांचा मोठा वाटा आहे. दादोबा व काळू - बाळू यांच्यावर बऱ्यापैकी प्रकाशझोत पडला. परंतु गुलाबरावांना गावगाड्यातल्या रसिकांशिवाय फारशी दाद व प्रसिद्धी मिळाली नाही. १९६० नंतरच्या तमाशात गुलाबराव हे नाव चलनी नाणे होते. त्यांच्या स्टेजवरच्या एन्ट्रीलाच टाळ्यांचा कडकडाट व्हायचा. विनोदसम्राट ही रसिकांकडून मिळालेली मानाची पदवी त्यांच्या शिरपेचात मानाने डोलायची. पण ऐन उमेदीत गुलाबराव अवघ्या पन्नाशीच्या आसपास असतानाच तमाशाच्या दौऱ्यादरम्यान नियतीने त्यांच्यावर घाला घातला. त्यांचे पुत्र मुबारक व दुसरे पुत्र पापाभाई माझे जवळचे स्नेही आहेत. गुलाबरावांच्या किश्शांची शिदोरी तमाशा वर्तुळात आजही सरत नाही. गुलाबरावांचे किस्से ऐकल्यावर मला नेहमीच वाटत गेले की, या अवलिया सोंगाड्याला ज्या बोरगावच्या भूमीने आपल्या अंगाखांद्यावर वाढवले व शेवटी आपल्या कुशीत घेतले तेव्हा या सोंगाड्याला चिरनिद्रेत सोडून जेव्हा त्याचे आप्त-रसिक 'चाळीस कदम' मागे फिरले असतील, 'मुनकर-नकीर' या फरिश्त्यांनी जेव्हा कबरीआंत गुलाबरावांच्या आयुष्याची गोळाबेरीज करून सवाल-जवाब केले असतील तेव्हा या सोंगाड्याने त्यांनाही हसवून-हसवून गुंगवत ठेवले असेल. तो परवरदिगारही बोरगावच्या दिशेने पाठवलेल्या आपल्या 'मुनकर-नकीर' फरिश्त्यांच्या जोडीची आजही वाट बघत बसला असेल! हा कल्पनाविलास असला तरी इतके गारुड गुलाबरावांचे त्या पंचक्रोशीत होते. आणखीनही अनेक मुस्लीम कलावंतांच्या इबादतीला स्मरून त्यांच्या मजारींवर शब्दसुमनांच्या चादरी चढविता येतील. इथे नोंदवलेली नावे ही केवळ प्रातिनिधिक आहेत.

तमाशा या लोककला प्रकारात गावगाड्यातील इतर कलावंतांसोबत आपल्या मातीतल्या या मुस्लीम कलावंतांनीही मोलाची साथ दिलेली आहे, हे विसरून चालणार नाही. परंतु सांस्कृतिक राजकारण्यांनी हिंदू - मुस्लिमांमध्ये पेटवलेल्या तीव्र भावनांच्या पटलावर मुस्लीम कलावंतांची तमाशा पंढरीतली पाक दिलाने केलेली खरी सेवा कला इतिहासात प्रामाणिकपणे नोंदविणे, ही काळाची गरज आहे, असे मनोमन वाटले.

मराठी कलावंतांच्या खांद्याला खांदा लावून अवघा रंग मेळवून तमाशा पंढरीचा अबीर - बुक्का ज्यांनी आयुष्यभर माथाभर ल्यायला, त्या अल्लाच्या नेक बंद्यांसाठी अनुल्लेखाचं बोट मोडून सहस्र हातांनी त्यांना कवेत घेत कलासक्त सहोदरी नाळेतून त्यांच्यावर लिहिलेच पाहिजे. पुरोगामी रचित्यांच्या भूमीत हीच त्यांच्यासाठी रमजानच्या महिन्यातली खरी इबादत...!!!

**- श्यामल गरुड**

shyamalmangesh@gmail.com

# शुक्रतारा चमचमतो आहे!

## कुमार नवाथे

**भावगीताच्या विश्वातला एक तलम-मुलायम आवाज म्हणजे अरुण दाते! त्यांच्या एका मित्राने जागवलेल्या आठवणींचा हा भावस्पर्शी कोलाज.**



**अ**रुण दाते खूप वेळा भेटायचे, घरी भेटायचे, हॉटेलात भेटायचे, पार्टीत भेटायचे नि नेहमी रेडिओवरही त्यांच्या वेगळ्याच आवाजामध्ये! मराठी भावगीतांचा तो काळ होता, नव्हे सुवर्णकाळच होता. पाडगावकर, वसंत बापट, शांताबाई यांना असे काही शब्दभांडार सापडायचे, की वाट बघत बसलेल्या देव, खळे, हृदयनाथ मंगेशकरांना त्यांच्या संगीत साजांना हाकारायला मुक्तद्वार उघडले जायचे. अशा काही रचना बनायच्या की त्या पेलणाऱ्यालाही आव्हानकारक व्हायच्या, त्याच्या साऱ्या संगीत रियाझाच्या कसोटी पाहाणाऱ्या ठरायच्या. ही परीक्षाच एवढी अग्निपरीक्षा की त्यातून तावून-सुलाखून बाहेर पडलेले ते शब्द ती बारकाव्यांची तालसुरांची किमया आणि गायक-गायिकेचा त्याला न्याय देणारा आवाज... पुढील अनेक-अनेक दशके रसिक मनावर अधिराज्य करत राहायचा.

श्रीनिवास खळेंना अरुण दातेंचा आवाज उर्दू गजलेतूनच असाच सापडला. इंदौरवासी रामूभैय्या हे त्यावेळचे एक संगीतातले मोठे प्रस्थ होते. आपला वारसा आपल्या मुलांनी पुढे चालवावा अशी इच्छा पालकांची जरी असली तरी मुलांनाही त्यांच्या आवडीनिवडी असतातच की! इंदौरमधील हिंदी उर्दू मिश्र वातावरणात वाढलेल्या अरुण दातेंनी उर्दू भाषेवर आणि त्यातील गझलेवर - गझल सादरीकरणावर हुकमत मिळविली होती आणि हाच आवाज, हीच लय खळेंनी संगीतबद्ध केलेल्या 'शुक्रतारा'साठी अगदी अचूक योग्य वाटली, किंबहुना दुसरा कुठलाच आवाज खळेंना रूचतच नव्हता ही सारी कथा, त्याकरिताचे प्रयत्न इ.इ. आता सर्वपरिचित आहे.

महत्त्वाचे म्हणजे अत्यंत नामुष्कीने स्वीकारलेल्या मराठी भावगीत गायनाच्या पदार्पणातील या गाण्यानेच अरुण दातेंचं आयुष्य आमूलाग्र बदलून गेले.

अरुण दातेंना (त्याचं खरं नाव अरविंद) पण यशवंत देवांनी ध्यानीमनी नसताना बदलून टाकले. देवांनाही ए.आर. दाते म्हणजे हा ए नक्की कोण हे माहीत नव्हते. घरी आरू-आरू म्हणतात, म्हणजे अरुण असेल अशा तर्काने, आकाशवाणीवरून ए.आर. दातेंची 'शुक्रतारा' ध्वनिमुद्रिका लागण्याच्या काही मिनिटे आधी अरुण म्हणून सांगून टाकले आणि आकाशवाणी 'अरुण दाते' या नावाची झाली ती अंतापर्यंत त्यांना चिकटून राहिली.

अरुण दाते आधी ऐकून-ऐकून मनात घर करून होते. पुढे माझा मित्रपरिवार जसा वाढत वाढत गेला तसं त्या परिवारात ते भेटत राहिले. अनेक वेळा यशवंत देव, पाडगावकर, शशी-उषा मेहता, मोहनदास सुखटणकर, वसंत बापट यांच्याबरोबर अरुण दाते. दुरूनच भेटत राहिले. या दुराव्याचं कदाचित एक कारण म्हणजे ते नेहमी गंभीर दिसायचे. कमी बोलणारे असायचे. क्वचितच हसणारे असायचे. त्यांच्या नावाचा त्यावेळी दबदबा होता. त्यांचे कार्यक्रम भरपूर चालू असायचे. त्यांना एक 'सेलिब्रेटी' स्टेटस होतं. मला नेहमी अशा लोकांपासून दूर राहणंच पसंत असायचं. अशामुळे अशा 'तोंड'ओळखीत काही काळ लोटला, पण केव्हातरी तो अलगद उघडला गेला.

तुमची ओळख मलाच काय साऱ्या मराठी रसिकश्रोत्यांना आहे, मी माझी ओळख तुम्हाला करून देतो, असं म्हणून मी स्वत:बद्दल चार शब्द बोललो. बहुधा तिथेच माझी आणि अरुण दातेंची स्वरतार जुळली. कुठला तरी कुणाच्या घरचा तो कार्यक्रम होता. रात्री उशिरापर्यंत काव्यशास्त्रविनोदात, पाडगावकरांच्या बेफाम वात्रटिकेत, देव-दातेंच्या गाण्यात, शशी मेहताच्या अस्खलित कविता गायनात सारेच भारून गेलेले होते. निघताना अरुण दाते खांद्यावर हात ठेवत, त्यांच्या घराचा पत्ता असलेले कार्ड हाती देत म्हणाले, ''आज आपण भेटलो. उद्या पुन्हा भेटणार आहोत. तुम्ही सकाळी माझ्या घरी या. पुन्हा भेटू या. पुन्हा भेटूया. भेटतच राहूया.''

हा गंभीर वाटणारा माणूस खूपच बोलका होता तर! आजची संध्याकाळ छानच गेली होती, माझ्या दृष्टीने माझ्या श्रीमंतीत अरुण



अरुण दाते यांच्या एका वाढदिवशी...
लक्ष्मण देशपांडे
कुमार नवाथे
आणि
अरुण दाते

दाते यांच्या व्यक्तिगत नावाने अजून भर पडली होती.

वांद्रा पश्चिमेस थेट समुद्रकिनाऱ्यावर जॉगर्स पार्क समोर असलेल्या जागी, सात-आठ मजली इमारत शोधायला जराही वेळ लागला नाही, अगदी वरच्या मजल्यावर अरुण दाते (आता माझे ते अरुणभाई झाले होते.) राहत होते, अतिशय भव्य असे ते निवासस्थान खूप मोठा हॉल, बाजूला स्वयंपाकघर भोजनकक्ष प्रत्येकाच्या स्वतंत्र खोल्या. समुद्राची बाजू पूर्ण मोकळी. वसईपासून नरिमन पॉईंटपर्यंत सारा समुद्र आपल्या कवेत घेणारी.

मी सारं निवासस्थान पाहून आधीच अवाक् झालो होतो. एक मराठी गायक कलाकार एवढा श्रीमंत! साऱ्या संपत्तीत कुठेतरी विनयता पदोपदी दिसत होती. रामूभैयांच्या आईचा फोटो मागेच होता. पैशाची उधळण जराही कुठे नव्हती. मन प्रसन्न करणारी सुसंस्कृतता मनाला भावत होती. मीनाताई, अतुल, संगीत, सुना, किती प्रेमाने सर्वांनी स्वागत केलं. घर मोठं-घराचं घरपण मोठं! सांस्कृतिक श्रीमंती मोठी पण सेलिब्रेटीचं लेबल कुठंच दिसत नव्हतं.

माझी ती पहिली भेट आजही साऱ्या छोट्यामोठ्या गोष्टींसह सहीसही डोळ्यांसमोर उभी राहते. श्रीमंत मराठी माणसाच्या धक्क्यातून मी अजूनही बाहेर आलो नव्हतो. समुद्राकडे नुसता वेड्यासारखा पाहत उभा होतो आणि अचानक धडाधडा पाऊस कोसळायला लागला. तुफान वारे वाहू लागले. ते तांडव पाहणं नव्हतं, अनुभवणं होतं. अरुणभाई शेजारीच होते. त्यांचा सुद्धा हा आवडीचा क्षण असावा. तडक आत जाऊन आले आणि म्हणाले, ''कुमारभैया अब बिअर हो जाए.'' पुढचा कितीवेळ आम्ही बिअर सेवन करत होतो. मीनाताई काही-काही गरम आणून पुढे ठेवत होत्या. आम्ही बिअर सोबत समुद्र पित होतो.

अरुणभाईंची ही माझी पहिली भेट चिरकाल हृदयात कोरून न राहील तरच नवल. पुढे त्यांचा सारा कालपट मी त्रयस्थ नजरेने पाहत राहिलो होतो.

आमची भेट पावसाळ्यात हमखास त्यांच्या घरात व्हायची. पाऊस सुरू झाला की त्यांचा फोन यायचा, ''कुमारभैया बारिश शुरू हो गयी जल्दी आजा.'' एव्हाना त्यांच्या घरी एकट्याने जाण्याची वा कुणाला तरी घेऊन जायची मला बंदी नाहीय, अशी माझ्या मनाची कुठेतरी खूणगाठ बांधली गेली होती. त्यामुळे माझे मित्र-नातेवाईक कुणीही घेऊन मी त्यांच्या घरी धडकत असे (जणू माझाच फ्लॅट आहे, अशा आविर्भावात सर्वत्र फिरत असे. समुद्र पाहत पाहुणचार (लादलेला) स्वीकारत असे. पण काही काळाने काय झालं कोण जाणे, अरुणभाईंनी हा फ्लॅट विकायला काढल्याचं कळलं आणि माझ्या पोटात धस्स झालं. कितीतरी वेळा ''फ्लॅट विकण्याची खरंच जरुरी आहे का?'' असं मी त्यांना विचारलं. स्वत: विकत घ्यावा असाही विचार मनात आला, पण माझ्यासाठी सांगितलेली अगदी वाजवी किंमतही मला परवडणारी नव्हती. त्या श्रीमंतीला, त्या सुस्वरूप, सुसंस्कृत घराला कुणाची नजर लागली देवच जाणे. बांद्र्याच्या आलिशान घरातून अरुणभाई बाहेर पडले. मीनाताईंना छोट्यामोठ्या दुखापतींनी ग्रासले. त्यांनी साऱ्यांचा निरोप घेतला अगदी अलिकडे संगीतही हे जग सोडून गेला. काळ सरत होता.

अतुलकरता वांद्रा पश्चिमेस एक छानसा फ्लॅट अरुणभाईंनी घेतला तेव्हा गृहप्रवेश छानसा पाडगावकरांच्या उपस्थितीत साजरा झाला. पण माझं मन मनुष्यजीवनाचा काळप्रवास कसा अनाकलनीय असतो, कोण हे ठरवतो, कोण घडवतो याच विचारचक्रात अरुणभाईंचं सारं कालचक्र पाहताना विचार करत राहिले. ते काही काळ पुण्यात राहत होते तिथेही त्यांनी एक-दोन जागा बदलल्या होत्या. त्यांच्या घरी गेल्यावर मला नेहमी नेहमी त्यांचं पहिलं मोठं समुद्रकिनाऱ्याचं घर आठवायचं. दोन सुस्वरूप सुना आठवायच्या, मीनाताईंचा अगत्यशील स्वभाव आठवायचा आणि आता शांत झालेले अरुणभाई दिसायचे.

एकदा त्यांना लक्ष्मण देशपांडेंच्या 'वऱ्हाड निघालं लंडनला' घेऊन गेलो होतो. लक्ष्मणराव म्हणजे असाच मित्रलाभ! पुण्या-मुंबईत त्यांचा कार्यक्रम असला की फोन करायचे. 'बालगंधर्वला या पुढची सारी रांग मोकळी ठेवतो.' अरुणभाई आणि आम्ही अजून काही जण गेलो. लक्ष्मण देशपांडेंनी कार्यक्रमाच्या आधी अरुण दातेंचा सत्कार केला आणि मग नाटकभर हसून-हसून दमछाक आणि शेवटी अरुणभाईंच्या घरी, पुन्हा हास्यकल्लोळ! मला

कुठंतरी सतत जाणवत राहायचं, टोचत राहायचं, जरी अरुणभाई सगळं शांतचित्ताने घेत असतील. अतुल-स्नुषा अगदी त्यांच्याजवळ असतील तरी त्यांना स्वत:चा कालपट मागे वळून पाहताना काय वाटत असेल?

केव्हा तरी भेटणे-पुण्यास असलो तर क्लबला जाणे, एखादा संगीताचा कार्यक्रम, श्रीकांत पारगावकरांकडून तलत ऐकणे वा कुणाच्या घरी पार्टी... या साऱ्या ठिकाणी मला शेवटी-शेवटी अरुणभाई अलिप्त वाटत गेले. एकूणच जे काही घडून गेले होते, विशेषत: मुलाबद्दल माध्यमांनी दिलेली प्रसिद्धी, वर्तमानपत्रातून त्याबद्दल होणारा खल यामुळे या वयात त्यांनी हे सहन करणेकल्पनेबाहेरचे होते.

२७ जानेवारी २०१८ या दिवशी मी विलेपार्ल्यात एक कार्यक्रम आयोजित केला होता. मी ज्यांच्यामुळे घडलो, ज्यांच्याकडे बघत स्वत:ला सुधारत गेलो, ज्यांच्या लेखनाने-कविताने-नाट्याने उत्तुंग कर्तृत्वाने भारावलेलाच राहिलो, त्यांच्याप्रति मला कृतज्ञता व्यक्त करावयाची होती. त्यांच्या ऋणातच राहणं मला अधोरेखित करायचं होतं. त्यांना नमस्कार करून आशीर्वादाचा हात मस्तकी विराजमान करून घ्यायचा होता.

ब्याण्णव वर्षाचे यशवंत देव आले, मोहनदास आला. डॉ. श्रीखंडे, रामदास भटकळ, माझे स्नेही धनेश्वर, माझा लंडनचा मोठा भाऊ, वहिनी, मेहुणे... सारे-सारे आले. मी समाधान पावलो.

अरुणभाईंची तब्येत ठीक नाही, हे मला माहीत होते पण तरीही त्यांनी यावं अशी माझी मनोमन इच्छा होती. अतुलने मला बाबांबद्दल सांगितलं. माझाही नाईलाज झाला. मी घरी भेटायला येतो म्हणालो, पण ते माझ्या नशिबी नव्हते.

शेवटचे दर्शन मन चर्र करणारे होते. हा 'शुक्रतारा' आता लोप पावला होता. अरुणास्त झाला होता. मला त्यांचा मृतदेह पाहणे असह्य झाले. राजबिंडा श्रीमंत मनाचा, रामूभैयांची, कुमार गंधर्वांची आठवण सतत करून देणारा, साऱ्या जीवनाकडे, चढउताराकडे तेवढ्याच संयमित मनाने पाहणारा, आज दुसऱ्या 'अरुणोदया'कडे झेपावत होता. सारं-सारं मागे टाकून. मनात आलं अरुणभाई तुम्ही जाता आहात पण तो 'शुक्रतारा' आमच्या मनातून कधीच विरणार नाही. मग तुम्ही कुठेही असा... आम्ही एकच म्हणू...

शुक्रतारा मंद वारा.....

**– कुमार नवाथे**
भ्रमणध्वनी : ९८६९०१४४८६ / ९९६०४१७२६१
kumar.nawathe@gmail.com

## 'ग्रंथाली'च्या कार्यालयात एक सृजनशील चर्चा



ग्रंथाली नेहमीच साहित्य, समाज, संस्कृतीविषयीच्या घडामोडी नि चर्चांचे केंद्र राहिली आहे. बँकांची सुरुवात कशी झाली? जगात बँकांकडे कसे पाहिले जाते? ९/११च्या घटनेमागचे सत्य कोणते? टायटॅनिक का बुडाली? ट्रम्प कसे जिंकले? अशा जागतिक पटलावरील विविध घटनांचा शोध हा दीपक करंजीकर यांच्या कुतूहलाचा विषय आहे. या सर्व घटना सुट्या सुट्या आहेत की त्यांच्यामागे काही सूत्र आहे, या शोधातूनच दीपक करंजीकर यांचा लेखसंग्रह साकारतो आहे. त्यातील निवडक भागाचे वाचन आणि चर्चा अशी बैठक 'ग्रंथाली'च्या नवीन कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. या चर्चेत रंगनाथ पठारे, दीपक करंजीकर, दिनकर गांगल, सुदेश हिंगलासपूरकर, कुमार नवाथे, नीरजा, भगवान इंगळे, आशा इंगळे, अभिराम भडकमकर, किरण येले, अरुण शेवते, अरुण जोशी, चांगदेव काळे, डॉ. वीणा सानेकर, धनंजय गांगल, पद्मभूषण देशपांडे, धनश्री धारप, श्रीहर्ष फेणे, प्रल्हाद जाधव, प्रवीण शिंदे, बाळासाहेब लबडे इ. उपस्थित होते. येत्या 'ग्रंथाली' वाचकदिनाला हे पुस्तक प्रकाशित होत आहे. मराठीत हा विषय पुस्तकरुपाने येणे ही निश्चितच अधोरेखित करण्याजोगी गोष्ट आहे अशी प्रतिक्रिया उपस्थितांनी नोंदवली.



# सुंदर सावळा घवघवीत!

## डॉ. प्रज्ञा दया पवार



**आपल्या मातीतील चित्रशैलीचा वारसा जिवंत ठेवणारे नि तो जगात सर्वदूर पोहोचवणारे कलावंत जिव्या सोमा मशे आणि कवयित्री प्रज्ञा दया पवार यांची पहिली भेट मशेंना पद्मश्री पुरस्कार घोषित झाला, त्या आसपासची... वारली चित्रकला, तिच्या जतन, संवर्धनाची मशेंची असोशी नि ध्यास या सर्वासकट साकारलेली दोन कलावंतांची ती उत्कट भेट वाचकांच्या मनातही झिरपत राहील.**

''तुझ्या ओळखीतला एखादा वारली आर्टवाला आहे का? तुला नक्कीच माहीत असेल. इतक्या ठिकाणी सतत फिरत असतेस तू.''

''का ग बाई? तू एकदम ब्युटी पार्लरवरून वारलीवर कशी काय पोहचलीस?''

'अग, माझ्या पार्लरच्या सेकंड फ्लोअरवर दोन रूम्स आहेत. एक ब्लिचिंग, फेशियलसाठी आणि दुसरी बॉडी मसाजसाठी. त्या दोन्ही रूम्सच्या वॉल मला वारली आर्टने डेकोरेट करायच्या आहेत. तुला माहीत आहे ना, सध्या किती 'इन थिंग' आहे वारली आर्ट! माझ्या क्लाएंटस्‌ना खूप आवडेल बघ ही कन्सेप्ट. तू गेली अनेक वर्षं ठाण्यात राहतेस, आदिवासी पाड्यांवर गेली असशीलच तू कधी ना कधी. करशील ना माझं हे काम? नाही, करच!''


तर अशा रीतीने जिव्या सोमा मशे या वारली चित्रशैलीच्या प्रणेत्याला, तत्त्वचिंतकाला, भाष्यकाराला प्रत्यक्ष भेटण्यापूर्वीच मला महानगरातल्या अतिश्रीमंतांच्या दिवाणखान्यातून, थ्री स्टार, फाइव्ह स्टारच्या मोठमोठ्या दालनांमधून वारली आर्ट, तिची सेलेबिलिटी नीटच ज्ञात झाली होती. सध्या तर ती इतकी वस्तुवत झाली आहे, की मार्केटमध्ये कुठेही नजर टाका, ती अतिशय स्वस्तपणे कुणीही हाताळू लागल्याचं दिसतंय. वारली आर्ट शिकवणाऱ्या तज्ज्ञांचं तर अलीकडे भलतंच पेव फुटलंय.

मैत्रिणीची इच्छा मी तेव्हा पूर्ण करू शकले नाही; पण नंतर जेव्हा तिच्या पार्लरमध्ये माझं जाणं झालं तेव्हा तिनं सर्वात आधी मला तिच्या त्या रूम्स दाखवल्या, जिथे वारली आर्ट दिमाखाने विराजमान झाली होती. तिनं अभिमानानं सांगितलं, ठाण्यात वारली आर्टचे कोचिंग क्लास चालवणाऱ्या एका परांजपे नावाच्या बाईंनी त्यांचे कारागीर इथं पाठवून ते डिझाईन केलं होतं. त्या परांजपेबाई 'वनवासी'मध्ये काम करत असल्याची माहितीही तिने पुरवली.

वारली आर्ट आणि वारली चित्रकला यातला विरोधाभास तेव्हा ठळकपणे माझ्यासमोर दृश्यमान झाला. परांजपेच कशाला? आपटे, थापा, पटेल, शहा अशी आडनावं असलेल्या अनेकांनी सध्या वारली आर्टचा ताबा घेतला आहे आणि आपापली दुकानं थाटली आहेत.

मी जिव्या सोमा मशेंचं नाव ऐकलं होतं ते आमचे परममित्र सुधाकर यादव यांच्याकडून. मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्सचे ज्येष्ठ प्राध्यापक आणि अमूर्त चित्रशैलीत गेली अनेक वर्षं सातत्याने काम करणारे मनस्वी चित्रकार म्हणून सुधाकर यादव ख्यातकीर्त आहेत. सुधाकरकडून अनेकदा जिव्या सोमा मशेबद्दल मी ऐकलं होतंच. त्यांना प्रत्यक्ष भेटण्याची, त्यांचं काम पाहण्याची, त्यांच्याशी बोलण्याची खूप वर्षांपासूनची माझी अतीव इच्छा होती. इच्छा असणं आणि इच्छापूर्ती होणं या वेगवेगळ्या गोष्टी आहेत असाच अनुभव खरं तर अनेकदा येतो; पण यावेळी अनपेक्षितपणे इच्छापूर्ती झाली. दिवस होता होळीनंतरचा दुसरा म्हणजे धुळवडीचा. त्या दिवशी अचानक सुधाकरचं घरी येणं झालं आणि सहज बोलता बोलता मशेंचा विषय निघाला. दिल्लीला होणाऱ्या पद्म पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी मशेंसोबत जाणं सुधाकरने दुसऱ्या एका कार्यक्रमामुळे रद्द केलं होतं. त्याबद्दल बोलणं चाललेलं असताना 'आता जाऊया का त्यांच्याकडे?' असं मी विचारायचा अवकाश आणि सुधाकर म्हणाला, 'लगेच निघू या!' मग मी, सुधाकर आणि अभय भर उन्हात डहाणूला निघालो.

डहाणूजवळचं गंजाड गाव हे मशेचं गाव आणि गावातल्या त्यांच्या पाड्याचं नाव कलमीपाडा. अहमदाबाद हायवे सोडून आम्ही डहाणूच्या रस्त्याला लागलो. डहाणूच्या दहा किलोमीटर आधी गंजाड गावाचं वळण आलं. तिथून पुढे जाताना अगदी छोटा रस्ता लागला. सुधाकरने माहिती दिली की, हा रस्ता खास मशेंच्या सांगण्यावरून तयार झालेला आहे. त्यांना जेव्हा पहिल्यांदाच राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तेव्हा तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींनी विचारलं, ''आणखी काय अपेक्षा आहे तुमची?'' तेव्हा मशे म्हणाले,



विचारतात, माझ्या चित्रांमुळं तर असं काही होणार नाही ना? सुधाकर म्हणतो, ''पण तुझ्या चित्रात तर देवच नसतो ना!'' हे ऐकून मनापासून हसणाऱ्या मशेंचे डोळे मस्त लकाकून उठतात. त्यांनीच या चित्रशैलीला त्यांच्या समाजाचं, समूहाचं नाव प्रदान केलं – वारली चित्रकला! खरं तर हे नुसतं नाव नाहीय. ते एक तत्त्वज्ञान आहे. आदिवासींच्या शतकानुशतकाच्या जगण्यातून, त्यांच्या संस्कृतीतून, त्यांच्या समूहभानातून चालत आलेली जगण्याची चित्रमय ज्ञानात्मकता आहे. वारली चित्रकला म्हणजे केवळ आदिवासी जीवन रंगवणं नाही; तर चिन्हात्मकतेची एक शास्त्रशुद्ध तात्त्विक बैठक म्हणजे वारली चित्रकला, नव्हे चित्रलिपी. (खरं तर चित्र हा शब्द वारली भाषेत वापरतच नाही. 'चौक लिहिणं' ही त्यांची मूळ संज्ञा.)

''आमच्या पाड्यापर्यंत यायला साधा रस्तासुद्धा नाही. खूप हाल होतात पावसापाण्यात म्हाताऱ्याकोताऱ्यांचे, लहान-लहान मुलांचे. काही करणार असाल, तर माझ्या गावासाठी एक रस्ता बांधून द्या.'' मग इंदिराबाईंच्या आदेशानुसार एक रस्ता गावासाठी आणि तिथून पुढे एक छोटा रस्ता थेट मशेंच्या घरापर्यंत बांधला गेला. आपल्या कलेचं कौतुक पाड्यातल्या रस्त्याच्या रूपानं पदरात पाडून घेणं ही गोष्टच अतिशय बोलकी आहे, खरं तर वारली कलेच्या आंतरिक सामूहिकतेकडे निर्देश करणारी आहे.

मशेंचं भलंथोरलं घर बघून मी थक्कच झाले. एक नव्हे, तर शेजारीशेजारी चक्क तीन घरं! मागेपुढे मोठी मोकळी जागा. फाटकातून आत शिरल्याबरोबर समोर दिसणाऱ्या मोठ्या घरात राहतो मशेंचा मोठा मुलगा सदाशिव आणि त्याची बायको, मुलं. त्याच्याशेजारी आकारानं लहानखुरं असलेलं आधीचं घर, जे आता गुरांसाठीचा गोठा म्हणून वापरात आहे आणि त्याच्याशेजारी दुसरं आणखी मोठं घर जिथं जिव्या, त्यांची बायको, धाकटा मुलगा बाळू, त्याची बायको, मुलं राहतात. नातवाचं लग्न नजीक येऊन ठेपल्यानं दोन्ही मोठ्या घरांना नुकतीच गर्दगुलाबी रंगाची रंगरंगोटी केलेली. बाहेर व्हरांड्यात हाश् हुश् करत आम्ही स्थानापन्न होतोय न होतोय तोच मशे बाहेर आले. सुधाकरने ओळख करून दिली, ''माझे दोस्त आलेत खास तुम्हाला भेटायला. ही गाणीगोष्टी लिवते, शिकवते पोरांना कॉलेजात. हा पण लिवतो, मासिक चालवतो.'' मग त्यांच्या घरातल्या सगळ्यांचीच ओळखदेख होते. सुधाकरचं मशेंसोबत दिल्लीला जाणं रहित झाल्यानं काहीसे नाराज असलेले मशे विचारतात, ''तू का येत नाही? तू चल.'' यावर सुधाकर सांगतो, ''पुण्याला जायचंय मला, सांस्कृतिक दहशतवादावर बोलायला.'' मग सांस्कृतिक दहशतवाद म्हणजे काय, हुसेनच्या चित्रांचं काय झालं, त्यांना कसा देश सोडावा लागला, असं सगळं तपशिलात सुरू होतं. हे ऐकून मशे एकदम चाट पडतात. मग अचानक

वारली चित्रकलेची सुरुवात मोठी रंजक आहे. ठाणे जिल्ह्यातल्या आदिवासी पाड्यावरच्या लग्नसमारंभात सवाष्ण बायका आपापल्या घराच्या भिंतींवर चित्रं काढायच्या. तारप्याभोवती फेर धरून होणारा नाच, लग्नाचा चौक, लग्नाचा मांडव या चित्राकृती त्यात प्रामुख्यानं असायच्या. सवाष्णींनीच ही चित्रं काढायची अशी प्रथा होती. लहानग्या जिव्यानं त्याच्याही नकळत ही पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेली प्रथा मोडली. तो असं करू शकला, कारण तेव्हा तो लहान होता. सुरुवातीला त्याचं कौतुकच झालं, पण पुढे कौतुक संपलं, चित्रं काढण्यावरून त्याला बोलणी खावी लागली कारण त्या कोवळ्या वयातच जिव्या एक वेठबिगार मजूर म्हणून विकला गेला होता. चित्र काढणं लवकरच थांबलं असतं, पण नेमकं तेव्हाच केंद्र सरकारच्या सांस्कृतिक खात्याचे प्रतिनिधी भास्कर कुलकर्णी आदिवासींची कला शोधण्यासाठी म्हणून आदिवासी पाड्यावर पोहोचले. त्यांनी सवाष्ण बायांबरोबरच जिव्याला चित्रं काढताना पाहिलं आणि जिव्यासकट ते त्या बायांना दिल्लीला घेऊन गेले. दिल्लीच्या त्या शासकीय वातावरणात चित्र काढायला बायांनी सरळ नकार दिला; पण जिव्यानं मात्र झोकात चित्रं काढली. त्यात नेहमीचे विषय तर होतेच, पण आयुष्यात पहिल्यांदाच तो ज्या रेल्वेनं दिल्लीला पोहोचला होता त्या रेल्वेचंही त्यानं आपल्या स्वत:च्या पद्धतीनं चित्र काढलं. परंपरेशी जोडलेलं असणं आणि ती मोडून तिला पुढं नेणं ही अतिशय अवघड अशी गोष्ट जिव्यानं सहजी केली होती आणि तिथेच वारली चित्रकलेचा ओनामा घातला गेला. वारली चित्रकलेची ही आद्य कहाणी अद्‌भुतच म्हणायला हवी.

वारली चित्रकला आणि वारली आर्ट यांच्यातला फरक सांगताना मशे म्हणाले, ''माझ्या चित्रातल्या कहाणीला अर्थ असतो. नुसती शोभा नसते. झाडं, पानं, फुलं, बाया-पुरुष असं सुटं काही

नसतं.'' हे सांगतासांगताच ते आम्हाला आतल्या खोलीत घेऊन गेले. तिथं त्यांच्या मुलानं त्यांचं आठ बाय सहाचं एक चित्र पसरलं होतं. मशेंनी त्या चित्रातली पूर्ण कथा आम्हाला उलगडून सांगितली. एका आदिवासी मुलीच्या जन्मापासून ते तिच्या अख्ख्या आयुष्याचा पट त्या चित्रात त्यांनी साकारला होता. कथा सांगतानाचा त्यांचा उत्साह, त्यांची एकाग्रता सगळं-सगळं आम्ही उरी साठवत होतो.

मशेंच्या विलक्षण एकाग्रतेबद्दल सुधाकरने आम्हाला एक आठवण सांगितली. सुधाकरचं मशेंकडे बऱ्याचदा जाणं-येणं होत असतं. एकदा तो त्यांच्याकडे गेला तेव्हा मशेंचं एका चित्राचं काम चाललं होतं. त्यांनी सुधाकरकडे क्षणभर पाहिलं आणि पुन्हा ते चित्राच्या कामाला लागले. अर्धाएक तास उलटल्यावर ते उठले आणि त्यांच्या खोलीत जाऊन विश्रांतीसाठी खाटेवर आडवे झाले. पुन्हा काही वेळानं उठून बाहेर आले. सुधाकरबरोबर एकही शब्द न बोलता त्यांनी चित्राचं काम सुरू केलं. असे जवळपास तीन तास उलटले, पण एक शब्दही ते बोलेनात. सुधाकरची निघण्याची वेळ झाली. घरातल्या इतरांशी बोलून मग तो बाहेर पडला; पण नंतर त्यांच्या मुलाने खुलासा केला, की चित्र काढताना कुणाशीही न बोलता रात्रंदिवस ते झपाट्यानं पूर्ण करणं हाच एक ध्यास असतो. न जाणो आपलं मध्येच काही बरंवाईट झालं आणि ते चित्र तसंच अपूर्ण राहिलं तर...

एका विलक्षण जिगरीनं, अभ्यासानं, ध्यासानं एखाद्या तत्त्ववेत्त्याच्या तोडीचं काम गेली साठ-सत्तर वर्षं अव्याहतपणे जिव्या सोमा मशे करत आले आहेत. आदिवासी पाड्यावरची ही विलक्षण चित्रशैली आज संपूर्ण जगात पोहोचली आहे. परदेशातले अनेक लहानमोठे मानसन्मान त्यांच्या वाट्याला आले आहेत. आपल्याच देशात मात्र त्यांची काहीशी उपेक्षा झाली, असं खेदानं म्हणावं लागेल. १९७६ साली भारताचे राष्ट्रपती फक्रुद्दीन अली अहमद यांनी मशे यांना साडेतीन एकर जमीन देण्याची घोषणा केली; पण गेल्या ३४ वर्षांत सरकारी कार्यालयात अनेक खेटे घालून मशेंना आज फक्त दीड एकरच जमीन मिळाली आहे. मशेंचं स्वप्न आहे वारली कलेचं म्युझियम साकारण्याचं, शिवाय पाड्यावरच्या मुलामुलींसाठी वारली चित्रशाळा सुरू व्हावी, हाही महत्त्वाचा संकल्प आहे. आपल्यानंतर या कलेचं काय होणार याची साशंकता त्यांना सतावते आहे. साडेतीन एकर जागेचा ३४ वर्षांचा अनुभव लक्षात घेता म्युझियम साकार होण्यासाठी कितीएक पहाड खोदावे लागतील याची चिंता त्यांना ग्रासते आहे.

डहाणूहून परत येताना गंजाडनंतरच्या एका गावात आठ-दहा आदिवासी तरुण मुलांनी गाडीपुढे काठ्यालाठ्या आडव्या टाकून आम्हाला अडवलं. दारू पिऊन तर्र झालेल्या त्या टोळक्याला आमच्याकडून पैसे उकळायचे होते, होळीच्या नावाने. अस्सल अशा देशी वारली कलेच्या जिवंत अनुभवानंतर आलेला हा राष्ट्रीय होळी कलाकारीचा अनुभव काहीसा अस्वस्थ करून गेला; पण परतीच्या संपूर्ण प्रवासात आणि नंतरही एकच चेहरा माझ्यासमोर सतत तरळत राहिला, जिव्या सोमा मशेंचा... अगदी तुकारामांच्या शब्दात सांगायचं झाल्यास, सुंदर सावळा घवघवीत!

('टहलटिकोरी' या पुस्तकातून साभार. अक्षर प्रकाशन, डिसें.२०१५)

**- डॉ. प्रज्ञा दया पवार**
pradnyapawar@gmail.com

## अरुण साधू स्मरणार्थ फेलोशिप योजना

**सोमवार, १८ जूनला जाहीर होत आहे! स्थळ : नॅशनल फिल्म अर्काय्ू, भंडारकर रोड, पुणे. वेळ : सकाळी ११ वाजता.**

लेखक अरुण साधू यांच्या स्मरणार्थ तरुण पत्रकारास फेलोशिप देण्याची योजना तयार झाली आहे. ती पुणे विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या विभागामार्फत राबवली जाणार आहे. त्या योजनेची घोषणा कै. अरुण साधू यांच्या जन्मदिनानिमित्ताने १८ जूनला शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत केली जाईल. त्यावेळी अरुण साधू यांच्या 'झिपऱ्या' कादंबरीवर आधारित चित्रपटाचे प्रदर्शनही होईल. तुम्हाला विनंती अशी, की तुम्ही तुमची देणगी 'अरुण साधू स्मृती जतन निधी'मध्ये सत्वर जमा करावी. आत्तापर्यंत अठरा लक्ष रुपये जमा झाले आहेत. आपले उद्दिष्ट तीस लाख रुपये निधीचे आहे. त्यामुळे फेलोशिपची रक्कम मोठी होईल व मराठी पत्रकारांनाही काही महत्त्वाचे शोध संशोधन करणे शक्य होईल. देणगीचा चेक 'ग्रंथाली' या नावे अथवा रक्कम परस्पर बँक खात्यात जमा करता येईल. ८० जी कलमाखाली कर सवलत उपलब्ध आहे.

'ग्रंथाली'च्या बँक खात्याचा तपशील -

Bank Name : IDBI, Branch : Dadar (E), Mumbai - 400 014, IFSC Code : IBKL0000454,
Account Name : Granthali, Account No. : 0454651000000356

कळावे.

आपले - कुमार केतकर, दिनकर गांगल, सुदेश हिंगलासपूरकर, शेफाली साधू

संपर्क - ग्रंथाली - २४२१६०५०, दिनकर गांगल - ९८६७११८५१७

अरुण साधू स्मृतिजतन उपक्रम समिती :- **जब्बार पटेल, कुमार केतकर, सुदेश हिंगलासपूरकर, शेफाली साधू, यशवंतराव गडाख, विनायकराव पाटील, दिलीप माजगावकर, ॲड. कृष्णराव देशपांडे, मीना गोखले, सोनाली कुलकर्णी, सुवर्णा साधू, अर्जुन डांगळे, प्रज्ञा पवार, दिनकर गांगल**

# विजय तेंडुलकरांचे ‘कावळ्यांची शाळा’

डॉ. अनघा मांडवकर

**१९ मे २०१८ हा नाटककार तेंडुलकरांचा दहावा स्मृतिदिन! त्यांचे पहिले नाटक ‘गृहस्थ’, ज्याची संहिता आज उपलब्ध नाही. ‘कावळ्यांची शाळा’ हे ‘गृहस्थ’चे पुनर्लेखन. या नाटकाच्या विविध अंगांची चर्चा करणारा हा लेख.**

**इ. स.** १९५५ ते इ. स. १९८५ ह्या ‘मराठी प्रायोगिक रंगभूमीच्या सुवर्णकाळा’त भारतीय व जागतिक पातळीवर मराठी रंगभूमीची जी स्वतंत्र ओळख निर्माण झाली, तिचे खूप मोठे श्रेय हे विजय तेंडुलकर ह्यांच्या नाट्यलेखनास दिले जाते. मराठी नाट्यपरंपरेवर प्रभाव गाजवत आलेली प्रस्थापित मध्यमवर्गीय अभिजनांची मानसिकता, त्यांची नाट्यविषयक संकुचित सांकेतिक संकल्पना, त्यांच्या नाटकाकडून असलेल्या अपेक्षा ह्यांचे अनुसरण, अनुरंजन करायचे नाकारीत; तेंडुलकरांनी मराठी नाटकांतील आशय-विषयांत मूलगामी परिवर्तन घडविले. तेंडुलकर आपल्या नाटकांतून तसेच अन्य लेखनातून, विविध स्तरांतील विविध प्रकारची माणसे, त्यांची आयुष्ये, भावबंध, नातेसंबंध, वासना, भावना, रागलोभ, उदात्तता, अधमता, सामर्थ्य, हतबलता ह्यांचे चित्रण करीत आलेले दिसतात. हे करताना तेंडुलकरांनी माणसांमधील सुसंस्कृततेच्या मुखवट्याआड दडपल्या गेलेल्या आदिम प्रेरणांचा (हिंसा व लैंगिकता) वेध घेतलेला दिसतो. तोपर्यंतच्या नाट्यपरंपरेतील पौराणिक व ऐतिहासिक मराठी नाटकांतील असामान्य, भव्यदिव्य व्यक्तिरेखांच्या पार्श्वभूमीवर, तेंडुलकरांनी ‘सामान्य माणसांचे सामान्य जगणे’ मराठी नाटकांच्या आशयविश्वाच्या केंद्रस्थानी आणले. नाटकाचा विषय, कथानकरचना, पात्रचित्रण, संवादभाषा आदींमधील संकेत-निर्बंध, कृत्रिमता, प्रेक्षकानुनय झुगारून देत नाट्यानुभव, नाटकाची प्रकृती ह्यांनुसार ह्या घटकांची नवरचना करणे; आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, ह्या नव्या वळणाबाबत विरोध, टिंगल, वाद अशा प्रतिक्रिया उमटत असताना, स्वतःच्या भूमिकेवर ठाम राहून नाट्यकर्मींच्या पुढच्या पिढीकरिता दिशादर्शक ठरणे, हे तेंडुलकरांचे मराठी नाट्यपरंपरेतील योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. मराठी नाट्यपरंपरेतील ह्या युगप्रवर्तक नाटककाराच्या स्मृतींना उजाळा देताना, त्यांच्या ‘गृहस्थ’ (१९५५) ह्या पहिल्या नाटकाचा विचार करणे अगत्याचे वाटते. ‘गृहस्थ’ ह्या नाटकाची संहिता उपलब्ध नसल्यामुळे, तेंडुलकरांनी ‘कावळ्यांची शाळा’ (१९६३) ह्या नावाने केलेल्या त्याच्या पुनर्लिखित संहितेचा विचार करणे शक्य आहे.


**‘गृहस्थ’ ते ‘कावळ्यांची शाळा’:**

‘गृहस्थ’ हे विजय तेंडुलकर ह्यांचे पहिले नाटक १९५५ साली दामू केंकरे ह्यांनी ‘भारतीय विद्या भवन कलाकेंद्रा’तर्फे सादर केले होते. दोन प्रयोगांनंतर हे नाटक बंद पडले. ह्या नाटकाचा पहिला प्रयोग; तसेच ‘नाटक फसले’ ह्याविषयीच्या उद्वेगाने ‘आयुष्यात पुन्हा नाटक लिहायचे नाही’ असा तेंडुलकरांनी केलेला निर्धार; वडीलभावाच्या प्रोत्साहक सल्ल्यानुसार ह्या नाटकाचे त्यांनी केलेले पुनर्लेखन, ह्या सर्व गोष्टींविषयी तेंडुलकरांच्या ‘नाटक आणि मी’ ह्या लेखसंग्रहातील एका लेखात माहिती आलेली आहे. १९६३ साली ‘रंगायन’करिता तेंडुलकरांनी ह्या नाटकाचे पुनर्लेखन केले. मूळ चौकट, पहिला अंक ह्यांत बदल झाला नाही. पण दुसरा, तिसरा अंक व नाटकाचे शीर्षक ह्यांत बदल झाले. ‘कावळ्यांची शाळा’ ह्या नव्या नावाने विजया खोटे (विजया मेहता) ह्यांनी दिग्दर्शित केलेल्या ह्या नाटकाचा प्रयोग ‘रंगायन’, मुंबई ह्या संस्थेने दिनांक ५ डिसेंबर, १९६३ रोजी भारतीय विद्याभवन, मुंबई येथे रात्री साडेआठ वाजता सादर केला. ह्या नाटकाची संहिता पॉप्युलर प्रकाशन, मुंबई ह्यांनी प्रकाशित केली आहे (प्रथमावृत्ती- १९६४, दुसरी आवृत्ती - २००५; किं.- ९५ रु.). नाटक ९२ पृष्ठांचे आहे. मुखपृष्ठ व आतील चित्रे वसंत सरवटे ह्यांची असून, तेंडुलकरांनी हे नाटक त्यांच्या प्रयोगशील धडपडीत सहप्रवासी राहिलेल्या दामू केंकरे, अरविंद देशपांडे आदी एके काळच्या केवळ धडपडत्या नाटकवेड्या तरुणांना अर्पण केले आहे.

**‘कावळ्यांची शाळा’: आशयविशेष**

प्रत्यक्ष आयुष्यात तेंडुलकरांच्या एका मित्राच्या बाबतीत घडलेल्या गोष्टी हा ह्या नाटकाचा बीजस्रोत बनला, असे ह्या पुस्तकाच्या मलपृष्ठावर वाचावयास मिळते. पुण्यातील एका






वाड्यातल्या एका घरात राहणाऱ्या मंगेश भेंडे ह्या मध्यमवर्गीय 'रिसर्च-असिस्टंट'च्या घरी, त्याच्या निमंत्रणावरून 'बाळ्या डफळापूरकर' हा त्याचा जीवश्चकंठश्च मित्र तीन वर्षे काही ना काही कारणामुळे त्याला न सोडविता आलेल्या सीएच्या परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी पंधरा दिवसांची सुट्टी घेऊन राहायला येतो. मंगेशने त्याला अभ्यासाकरिता निवांतपणा, स्वतंत्रपणा व शांतता मिळावी, प्रोत्साहक वातावरण मिळावे, ह्यासाठी जय्यत तयारीही केलेली असते. त्याच्या पत्नीचे, शांताचेही त्याला सहकार्य असते. पण बाळ्या तेथे पोहोचल्यानंतर, मंगेशचे शेजारी, त्याचे दूरचे नातेवाईक, आणि बाळ्याशी वा मंगेशशी सुतराम संबंध नसलेले काही समाजघटक ह्यांच्या माध्यमातून बाळ्याच्या एकाग्रपणे अभ्यास करण्याच्या प्रयत्नांत अनंत चित्तथरारक अडचणींची मालिका सुरू होते. मुळात आत्मविश्वास हरवून बसलेला बाळ्या ह्या साऱ्या अडचणींच्या माऱ्यापुढे हतबल होत जातो, अधिकाधिक नाउमेद होत जातो.

प्रकृतिदृष्ट्या विचार करता, हे नाटक विनोदी आहे. ह्यातील नमुनेदार पात्रे, त्यांचे वागणेबोलणे, बाळ्या व मंगेशच्या कल्पना आणि प्रत्यक्षात कोसळणाऱ्या अडचणी ह्यांतील विरोधाभास दाखविणारे प्रसंग ह्यांतून हास्यस्फोटकता निर्माण होते. पण विनोदी असले, तरी हे नाटक सुखात्म प्रकृतीचे नाही, निखळ रंजनपर नाही. उलट, एक सामान्य मध्यमवर्गीय माणूस (बाळ्या, मंगेश); त्याची आयुष्यातील सामान्य उद्दिष्टे / स्वप्ने (बाळ्याचे उद्दिष्ट - सीएची परीक्षा उत्तीर्ण होऊन, चांगला (चारपाच हजार) पगार मिळवणे, लग्न करून 'रांकेला लागणे', मंगेशचे उद्दिष्ट - आपल्या मित्राला परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी, चांगला अभ्यास करण्यासाठी आपल्या घरात निवांतपणा, शांतता मिळवून देणे); ह्या उद्दिष्टांच्या पूर्तीत येणाऱ्या चमत्कारिक पण सामान्यांच्या आयुष्यात येऊ शकतात अशा सामान्य अडचणी (नातेवाईकांनी घरात ठिय्या मारून बसणे, शेजाऱ्यांच्या कुत्र्याचे, रेडिओचे आवाज, घराजवळच्या मैदानात एखादा धार्मिक समारोह); ह्या अडचणींपुढे ह्या माणसांचे नामोहरम, अगतिक होणे, ह्या साऱ्या चित्रणातून तेंडुलकर सामान्य मानवी जीवनातील करुणास्पदता, अगतिकता, अर्थशून्यता ठसवताहेत, असे वाटत राहते. शांतपणे, एकाग्रपणे अभ्यास करायला आलेल्या बाळ्याचे गर्दी व कलकलाट ह्यांच्या तडाख्यात सापडणे ह्या नाटकाच्या आशयविषयाशी 'कावळ्यांची शाळा' हे शीर्षक सुसंगत असून; नाटकाच्या दुसऱ्या अंकाच्या सुरुवातीस कोकिळाकाकूंच्या मॉंटेसरीतील पोरांचे ओरडणे व त्या पार्श्वभूमीवर 'कावळ्यांची शाळा भरे पिंपळावरती, चिमण्यांची पोरे बहू गोंगाट करीती' असे गाणे ऐकू येते अशी शीर्षकसंबंधित रंगसूचनाही आलेली दिसते.

**'कावळ्यांची शाळा': कथानकरचना**

हे नाटक तीन अंकांचे असून, तिन्ही अंक एकप्रवेशी आहेत. पहिला अंक ३७ पृष्ठांचा, दुसरा अंक ३५ पृष्ठांचा असून, तिसरा अंक तुलनेने लहान - २० पृष्ठांचा - आहे. नाटक पुण्यातील एका वाड्यातील मंगेश भेंडे ह्या मध्यमवर्गीय गृहस्थाच्या 'सतरा नंबरच्या बिऱ्हाडा'तील खोल्यांमध्ये घडते. नाटकातील घटनांचा कालावधी दोन-तीन दिवसांचा आहे.

पहिल्या अंकात मंगेशने 'बाळ्या' ह्या आपल्या मित्राच्या अभ्यासाकरिता खोली सजवणे; त्याच्या अभ्यासासंबंधी, परीक्षेतील व आयुष्यातील यशासंबंधी कल्पना रंगवणे; आपली पत्नी, चुलतचुलत भाऊ विश्वनाथ ह्यांना बाळ्याला निवांतपणा, शांतपणा मिळावा ह्यासाठी सूचना देणे; बाळ्याचे अनपेक्षितपणे एक दिवस आधीच पोहोचणे; स्वतःच्या खचलेपणाशी झगडत अभ्यासाला सुरुवात करणे, ह्या घटना घडतात. त्यातून नाटकातील मुख्य व्यक्तिरेखांविषयी परिचयही घडतो. त्याचवेळी काटदरेंचा रेडिओ, विश्वनाथचे वेडसरपण, तिडकेंचा कुत्रा आणि समोरच्या कोकिळाकाकूंनी सुरू केलेल्या किंडरगार्टनच्या वर्गातील मुलांचा गलका ह्यांतून बाळ्याच्या ध्येयपूर्तीसाठीच्या धडपडीआड येणाऱ्या अडचणींचा चंचुप्रवेश घडतो. ह्यातूनही मंगेश बाळ्याचे मनोधैर्य टिकवून धरायचा प्रयत्न करीत असताना, पहिल्या अंकाच्या शेवटी

'प्रदीर्घ डोअरबेल' व 'कानातले किडे पळावेत असा वाजणारा बिगुल' वाजतो. हा बिगुल नाटकातील पुढच्या अडचणींच्या मालिकेचे खणखणीत पूर्वसूचन करतो, आणि नेमके कोण आले, काय झाले, ह्याविषयी उत्कंठाही निर्माण करतो.

दुसऱ्या अंकात, आधीच्या अंकातील अडचणींबरोबर बिगुलवाले मामा, शकू, तिची आई, शकूला भेटायला येणारे भावकवी व चँपियन ॲथलीट रतनकुमार, बाळ्याला आपल्या मेव्हणीच्या स्थळाकरिता भेटू पाहणारे काटदरे ह्या साऱ्यांच्या गराड्यात सापडून, खच्ची, हतविश्वास होत गेलेला बाळ्या, आणि त्याला अभ्यास करायला मिळावा ह्यासाठी परोपरीने प्रयत्न करणारे शांता व मंगेश दिसतात. पहिल्या अंकाच्या तुलनेत अतिशय गतिमान घटनाप्रसंग असलेल्या ह्या अंकात एका टप्प्यावर, मंगेश पार वाट लावतो सगळ्यांची – सगळ्या आवाजांची असे म्हणून, बाळ्याला ह्या साऱ्या कलकलाटातून सोडवण्यासाठी सूत्रे हाती घेतो. पण त्याच वेळी, ह्या अंकाच्या शेवटी, मंगेशच्या चुलतमावस आत्या अरुंधतीबाई, त्यांचे सहकारी तोफखाने मास्तर आणि त्यांच्याबरोबर सहलीला आलेली शाळेतली चाळीस मुले थडकतात; आणि मंगेशच्या प्रयत्नांवर पुन्हा एकदा पाणी फिरते.

तिसऱ्या अंकात शांताच्या सहकार्याने स्वयंपाकघरात लपून अभ्यास करणारा बाळ्या, ती बाहेर गेल्यावर पुन्हा या साऱ्यांच्या कचाट्यात सापडतो. आधीच्या अडचणी ठाण मांडून असतानाच, नाटकाच्या शेवटी, मंगेशच्या घराजवळील मैदानावर दहा दिवस 'विश्वशांतीकरिता महायाग' होणार असल्याचे समजते. ह्या साऱ्या कोलाहलाने संयम सुटून बाळ्या खामोष असे उच्चस्वरात ओरडतो, क्षणभर सारे शांतही होतात. पण पुढच्याच क्षणी महायागाच्या गोंगाटी आवाजास सुरुवात होऊन, त्यात बाकीच्यांचा गलका मिसळून बाळ्याचा खामोष त्यात वाहून जातो; आणि 'बाळ्या व मंगेशच्या स्वप्नांचे, कल्पनांचे त्यांच्या परिस्थितीसमोर (जी कायम त्यांच्या हातापलीकडेच राहताना दिसते) हताश होणे' ह्या बिंदूवर नाटक संपते.

ह्या नाटकाच्या कथानकरचनेतील अवकाशयोजना विशेष लक्ष वेधून घेते. 'सुंदर सजविलेली स्वतंत्र अभ्यासाची खोली (पहिला अंक) ते बाहेरच्या खोलीतील एक कोपरा, टेबलाखालची जागा (दुसरा अंक) ते स्वयंपाकघर व त्याचा पोटमाळा (तिसरा अंक)' ही बाळ्याच्या अभ्यासाकरिता उपलब्ध जागेत झालेली परिवर्तने बोलकी आहेत.

ह्या नाटकातील प्रसंगरचनेतून, मंगेशने बाळ्याच्या अभ्यासाकरिता उपलब्ध वातावरणाविषयी रंगविलेल्या कल्पना व प्रत्यक्षात घडत जाणाऱ्या गोष्टी ह्यांमध्ये तेंडुलकरांनी दाखविलेल्या विरोधाभासाची गंमतही लक्षणीय आहे. ह्याची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे –

स्वर्गीय शांतता, निवांतपणा, स्वतंत्रपणा ही कल्पना
कलकलाट, गर्दी ही प्रत्यक्ष घटिते
विश्वनाथने नीट वागणे ही कल्पना तर
विश्वनाथने बाळ्याला भंडावून सोडणे हे घटित
बाळ्याचे रेल्वेस्थानकावर स्वागत करण्याचे ठरवणे ही कल्पना
बाळ्याचे अनपेक्षितपणे आधीच पोहोचणे हे घटित
अभ्यासासाठी सजविलेली स्वतंत्र खोली ही कल्पना
त्या खोलीत शकूच्या आईने ठाण मांडणे हे घटित

ह्याशिवाय ह्या नाटकात लक्ष वेधून घेणारी एक विसंगती म्हणजे 'आगरकर व मन्रो'. मंगेशने बाळ्याला स्फूर्ती मिळावी म्हणून माळ्यावरून आगरकरांची तसबीर काढून ती अभ्यासाच्या खोलीत लावणे, आणि बाळ्याला चुकून मर्लिन मन्रोची तसबीर दाखवणे, चूक लक्षात आल्यावर ती तसबीर पाठमोरी करणे ह्या प्रसंगातील 'आगरकर व मन्रो' ह्या विसंगतीतही एक सूक्ष्म प्रतीकात्मकता आहे. 'आगरकर' (माळ्यावर धूळ खात पडलेला मध्यमवर्गीय बुद्धिजीवींसमोरील ध्येयप्रवणतेचा आदर्श) व 'मन्रो' (त्यांच्या अंतर्मनात दडपलेली लैंगिक प्रेरणा) ह्या प्रतीकांतून तेंडुलकरांनी मध्यमवर्गीय महाराष्ट्रीयांच्या जीवनातील एका अंतर्विरोधाविषयी सूचक विधान केलेले दिसते.

**'कावळ्यांची शाळा' : पात्ररचना व पात्रचित्रण**

ह्या नाटकात पंधरा पात्रे व चाळीसेक शाळकरी मुले रंगमंचावर येतात. ह्यांपैकी 'बाळ्या डफळापूरकर' हे प्रमुख पात्र आहे. 'मंगेश भेंडे, शांता' ही बाळ्याच्या उद्दिष्टपूर्तीत त्याला मदत करू पाहणारी दोन सहकारी पात्रे आहेत. 'विश्वनाथ, मामा, शकू, अरुंधतीबाई' हे मंगेशचे दूरचे नातेवाईक; 'काटदरे, तिडके' हे मंगेशचे शेजारी; 'तोफखानेमास्तर व चाळीस मुले' (अरुंधतीबाईंशी संबंधित); 'भावकवी, चँपियन ॲथलीट रतनकुमार' (शकूशी संबंधित); 'तीन बैरागी' (महायागाचे प्रतिनिधी) हे मंगेश किंवा बाळ्याशी प्रत्यक्षतः संबंधित नसलेले काही लोक, अशी बाळ्याच्या अभ्यासात कळत–नकळत अडथळे आणणाऱ्या पूरक व दुय्यम पात्रांची प्रचंड गर्दी ह्या नाटकात आहे. मात्र ही गर्दी नाटकातील कथानकाशी सुसंगत रीतीने आलेली आहे. किंबहुना, नाटकाच्या सुरुवातीस दोन–तीन पात्रांमुळे निवांत वाटणारा अवकाश 'कावळ्यांच्या शाळे'त परिवर्तित होतो, हे उत्तरोत्तर वाढत गेलेल्या ह्या पात्रांच्या गर्दीमुळेच अधोरेखित झाले आहे. रंगमंचावर न येणारे, पण बाळ्यासाठी सजविलेली स्वतंत्र खोली बळकावून बसलेले 'शकूच्या आई'चे पात्रही लक्षणीय आहे.

ही सर्व पात्रे मध्यमवर्गातील असून, 'नायक–खलनायक' ह्या वर्गीकरणात बसणारी नाहीत. 'बाळ्या डफळापूरकर'चे नाव, त्याचा संकोची, आत्मविश्वासरहित, भिडस्त स्वभाव, त्याची सामान्य स्वप्ने, मनातून पराभूत असल्यामुळे त्याचे अडचणींपुढे चटकन गलितगात्र होणे, हे काहीच 'नायका'च्या पारंपरिक, आदर्शस्वरूपी संकल्पनेशी नाते सांगणारे नाही. त्याचे चित्रण पाहताना गडकऱ्यांच्या 'मूकनायका'ची वारंवार आठवण होते. बाळ्याच्या अभ्यासात व्यत्यय आणणारी पात्रे ही त्याला त्रास द्यायचा म्हणून तसे

जाणीवपूर्वक / दुष्टाव्याने वागत नसल्यामुळे, तीही 'खलपात्र' ह्या श्रेणीतील नव्हेत. ह्या सर्वच पात्रांची आपापली अशी उद्दिष्टे आहेत (मामा – घराण्याच्या अब्रूचे रक्षण; शकू – जोडीदार मिळवणे; काटदरे – मेव्हणीसाठी स्थळसंशोधन, इत्यादी इत्यादी). बाळ्याचे उद्दिष्ट व ह्या पात्रांची उद्दिष्टे ह्यांच्यात विसंवाद घडत राहतो, आणि त्यातून बाळ्यासमोर विघ्ने उभी राहतात.

ह्या नाटकातील 'मंगेश, शांता, विश्वनाथ, शकू' ही पात्रे विशेष लक्ष वेधून घेतात. अन्य बरीचशी पात्रे अर्कचित्रात्मक नमुन्यांच्या स्वरूपाची आहेत. आपल्या मित्राला, चुलतचुलतभावाला मार्गी लावू पाहणारा, भिडस्तपणामुळे आल्यागेल्यांच्या आदरातिथ्यात आपल्या घरातील शांतता हरवून बसणारा, हाताबाहेरच्या अडचणींतून मार्ग काढण्यासाठी, आपल्या मित्राचे मनोबल उंचावण्यासाठी धडपडत राहणारा 'मंगेश' हा सामान्य मध्यमवर्गीय गृहस्थ तेंडुलकरांनी उठावदारपणे चित्रिलेला आहे. 'मंगेश' ह्या मध्यमवर्गीय गृहस्थाच्या पैपाहुण्यांच्या आदरातिथ्याची जबाबदारी पेलतापेलता भरडून निघणारी, त्याच्याशी व पाहुण्यांशीही काहीवेळा परखडपणे, स्पष्टवक्तेपणाने बोलणारी, पण ह्या परिस्थितीतून स्वतः ची सुटका करून न घेऊ शकणारी, त्यामुळे तिसऱ्या अंकाच्या सुरुवातीस मनातल्या भावनांचा स्फोट होऊन 'आपल्याला वेड लागणार आहे' असे म्हणणारी 'शांता' ही त्याची पत्नीही लक्ष वेधून घेते. हे स्त्री–पात्र तेंडुलकरांच्या अन्य नाटकांतील स्त्री–पात्रांप्रमाणे स्त्रीची कोंडी, घुसमट व्यक्त करणारे आहे.

'विश्वनाथ' व 'शकू' या पात्रांनाही नाटकात महत्त्वाचे स्थान आहे. परीक्षा उत्तीर्ण होता येत नाही म्हणून लग्न न करता आलेल्या मंगेशच्या मनातील दडपलेल्या लैंगिक इच्छांना 'शकू' चेतवते; तर 'परीक्षा, मग नोकरी, मग लग्न–संसार, मग पुढे काय ?' ह्या बाळ्याच्या मनातही अधूनमधून डोकावणाऱ्या पण दडपल्या गेलेल्या आयुष्याच्या निष्प्रयोजनतेविषयीच्या प्रश्नांना विश्वनाथ खतपाणी घालतो.

एकंदरीत पाहता, ह्या नाटकातील पात्रांचा अनेकवर्तुळात्मक असा व्यूह जाणवतो. मधोमध एका छोट्या वर्तुळात 'बाळ्या व त्याचे परीक्षा उत्तीर्ण होण्याचे उद्दिष्ट' ह्या गोष्टी आहेत. त्याच्या भोवती 'मंगेश व शांता' यांचे संरक्षक कवच ह्या स्वरूपाचे वर्तुळ आहे. ह्या कवचाच्या भोवती विघ्नकारी पात्रांची वर्तुळे वाढत जातात, त्यांच्या भारापुढे संरक्षक कवच दुबळे ठरते, आणि त्या वर्तुळांतील हे विघ्नकारी घटक मुख्य पात्राच्या भौतिक व मानसिक अवकाशावर अतिक्रमण करण्यात यशस्वी होतात. विघ्नकारी पात्रांपैकी काही पात्रे ही बाह्यस्तरावरची विघ्ने आणणारी आहेत; तर 'शकू, विश्वनाथ'सारखी काही पात्रे ही बाळ्याच्या मनात खोलवर दडून असलेल्या काही प्रेरणांचा, प्रश्नांचा आविष्कार करणारी आहेत. सामान्य माणसांना पात्रस्थानी आणणे; पात्रांचे काळ्या–पांढऱ्या रंगांत चित्रण न करता वास्तवदर्शी संमिश्र चित्रण करणे; मानवी मनात खोलवर दडून राहणाऱ्या लैंगिक प्रेरणा, नानाविध भीती, असुरक्षितता ह्यांचा सूक्ष्म वेध घेणे, ही तेंडुलकरांच्या नाटकांतील पात्रचित्रणाची वैशिष्ट्ये त्यांच्या ह्या नाटकातील पात्रचित्रणातही दिसून येतात.

**'कावळ्यांची शाळा' : भाषिक घटक**

मराठी नाट्यपरंपरेत नाटककाराचे भाषाप्रभुत्व, त्यातून पेरली जाणारी टाळ्यांची वाक्ये ह्यांचा वरचष्मा असताना, तेंडुलकरांनी मात्र आपल्या नाटकांत पात्रांच्या अभिव्यक्तीस अनुरूप अशी सहजस्वाभाविक, वास्तवदर्शी संवादभाषा योजिण्यास सुरुवात केली. हे त्यांचे वैशिष्ट्य 'कावळ्यांची शाळा' ह्या नाटकातही प्रत्ययास येते. ह्या नाटकाच्या सुरुवातीस आलेला मंगेश व काटदरेंमधील संवादप्रसंग, नाटकात बाळ्या व विश्वनाथ ह्यांच्यांत दाखविलेले संवादप्रसंग ह्यांतील तुटक, अर्धीमुर्धी वाक्ये, विरामांच्या रिकाम्या जागा पाहता, ह्या नाटकातील संवाद खूप बोलत नाहीत, पण खूप सुचवतात.

ह्या नाटकातील मंगेश–शांता ह्या मध्यमवर्गीय नवरा–बायकोच्या वादावादीतील भाषा ही त्या पात्रांची स्वाभाविक भाषा वाटते. मंगेशच्या तोंडी सहजपणे अधूनमधून इंग्रजी शब्द, वाक्ये येतात. शब्दभांडार व कल्पनासृष्टी मर्यादित असलेला सामान्य माणूस आपल्या भावना, विचार, कल्पना ह्यांच्या उत्कट अभिव्यक्तीसाठी तेच तेच शब्द कसे वापरतो, कल्पनांची, शब्दांची कशी पुनरावृत्ती करतो, हे पहिल्या अंकातील मंगेश आणि बाळ्या ह्यांच्यातील संवादांत दिसून येते. ह्या नाटकात वेगवेगळ्या ठिकाणी मंगेश, शांता व बाळ्या ह्या तीन पात्रांचा उद्रेक दाखविणारे संवादप्रसंग आले आहेत. त्यात सामान्य माणसाला आपली घुसमटही कशी पूर्णपणे व्यक्त करता येत नाही, ह्याचेच तेंडुलकर दर्शन घडवतात. शेवटचा बाळ्याचा खामोषचा उद्रेक तर आवाजांमध्ये वाहूनच जातो.

भावकवी, रतनकुमार, शकू, मामा आदी पात्रांची संवादभाषा त्यांच्या अर्कचित्रात्मक शैलीतील चित्रणास अनुरूप आहे. ह्या पात्रांचे अर्कपण त्यांच्या भाषिक लकबींतून अधिक उठावदार केलेले दिसते. हे नाटक वाचताना 'मूकनायक'ची ह्यासाठीही आठवण होते की, ह्या नाटकात, बाळ्याच्या आगमनाचा प्रसंग व शेवटचा खामोष वगळता; बाकीच्या पात्रांच्या गलक्यात, गदारोळात अडकलेल्या 'बाळ्या' ह्या प्रमुख पात्राचा जवळपास 'मूकनायक' होत गेलेला दिसतो. त्याला सर्वांत कमी व सर्वांत तुटक संवाद दिलेले दिसतात.

ह्या नाटकातील रंगसूचना ह्या तेंडुलकरांच्या 'कंसां'विषयीच्या लौकिकाची आठवण करून देणाऱ्या आहेत. तिन्ही अंकांच्या सुरुवातीस मंगेशचे घर, बाळ्याला अभ्यासासाठी उपलब्ध अवकाश ह्यांत होत गेलेल्या बदलांविषयी विस्तृत रंगसूचना आल्या आहेत. ह्या नाटकात सर्वात लक्ष वेधून घेतात, त्या बाळ्यासाठी मंगेशने निम ण केलेल्या अवकाशात घुसखोरी करीत गेलेल्या आवाजांविषयीच्या रंगसूचना. त्यामुळे नाटक वाचताना ते ध्वनिपरिणामांसहित अनुभवतो आहोत, असे वाटू लागते. संवादांतून व्यक्त होणाऱ्या कल्पना / अपेक्षा व रंगसूचनांतून लक्षात येणारी वस्तुस्थिती ह्यांच्यातील

जुगलबंदी काही प्रसंगांत गंमत निर्माण करते. उदाहरणार्थ, पहिल्या अंकाच्या शेवटच्या भागातील मंगेश बाळ्याला धीर देतो तो प्रसंग पाहता येईल :

मंगेश - मी सांगतो, तुझा अभ्यास व्यवस्थित - (पोरांचा ओरडा.) व्यवस्थित होणार. काही काळजी म्हणजे नेहमीच काही हे घडणार नाही- क्वचित - (रेडियो.) क्वचित केव्हां तरी- त्याचं इतकं मानून घ्यायला नको - मी - सांगतो - काटदऱ्याला - (कुत्र्याची भुंक.) आणि तिडक्याला पण. तू येण्याच्या मुहूर्तावर सकाळी कोकीळ ओरडत होता बाहेर - ॲक्चुअल कोकीळ ! - तेव्हांच मी समजलो की हा शुभशकुन आहे! पोरं, रेडियो, कुत्रा. सगळे एका वेळी. काही वेळ बाळ्या आणि मंगेश गप्प.

ह्या संवादप्रसंगात, ह्या नाटकातील संवादभाषा, आवाजविषयक रंगसूचना, विरामविषयक रंगसूचना ह्या तिन्हींचे उदाहरण पाहता येते.

**'कावळ्यांची शाळा' : विशेष**

'कावळ्यांची शाळा' ह्या नाटकातील 'बाळ्या' ह्या प्रमुख पात्राचे नाव, त्याचा स्वभाव, त्याचे ध्येय, त्या ध्येयप्राप्तीच्या मार्गातील अडचणी ह्या सगळ्या गोष्टींचे सर्वसामान्यपण; आणि सामान्यांच्या जगण्यातील, त्यांच्या धडपडींतील हास्यास्पदता व करुणास्पदता एकाच वेळी अधोरेखित करणारी तेंडुलकरांची नाट्यशैली, ही वैशिष्ट्ये आधीच्या मराठी नाट्यपरंपरेच्या तुलनेत वेगळ्या वळणाची वाटतात. तेंडुलकरांच्या एकंदर गंभीर, शोकात्म लेखनाच्या तुलनेत 'कावळ्यांची शाळा' हे विनोदी प्रकृतीचे नाटक वेगळे वाटते. पण त्यातही हलक्याफुलक्या शैलीआडून अस्वस्थ करणारा सूक्ष्म ताण पेरणे, मानवी मनातील अलक्षित लैंगिक प्रेरणांसारखे कोपरे धुंडाळणे ही तेंडुलकरांच्या लेखनप्रकृतीची वैशिष्ट्ये दिसतात. विश्वनाथचा 'पुढे काय?' हा निरुत्तर करणारा, अर्थहीनता अधोरेखित करणारा प्रश्न, 'आगरकर व मन्रो'सारखी द्वंद्वात्मक प्रतीके ह्यांमुळे हे नाटक 'नुसते हसवणारे' राहत नाही. रघुनाथ तेंडुलकर ह्या तेंडुलकरांच्या वडीलभावाच्या शब्दांत सांगायचे तर, 'देअर इज समथिंग इन इट!' सदर लेखाच्या माध्यमातून, हे 'समथिंग' ह्या नाट्यसंहितेतील नेमक्या कोणत्या विशेषांतून प्रत्ययास येते, हे शोधण्याचा व मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**तेंडुलकरांचे पहिले नाटक : हरवलेली ठेव**

'गृहस्थ' हे तेंडुलकरांचे पहिले, फारसे न गाजलेले, (तेंडुलकरांच्या मते,) सुरुवातीच्या लेखनात फसलेले नाटक, एवढीच माहिती उपलब्ध आहे. त्याची संहिताच उपलब्ध नसल्यामुळे, मराठी नाट्यपरंपरेतील ह्या अत्यंत महत्त्वाच्या नाटककाराच्या पहिल्या नाट्यलेखनाविषयीच्या अभ्यासास पुरेसा वाव न मिळणे ही दुर्दैवी बाब होय. 'कावळ्यांची शाळा' हे 'गृहस्थ'चे पुनर्लेखन असले, तरी ते 'पुनर्लेखन' आहे; आणि तेही १९६३ सालातील तेंडुलकरांनी केलेले पुनर्लेखन आहे, हे विसरता येणार नाही. संहिता उपलब्ध नसल्यामुळे, 'गृहस्थ' आणि तेंडुलकरांची पहिल्या टप्प्यावरची गाजलेली नाटके ('श्रीमंत', 'माणूस नावाचे बेट') ह्यांची तुलना, तेंडुलकरांच्या एकंदर नाट्यलेखनातील पहिला टप्पा म्हणून 'गृहस्थ'च्या विशेषांचा आणि मर्यादांचा विचार, अशा तौलनिक अभ्यासांना वाव मिळू शकत नाही. तसेच मूळ नाटकाचे 'गृहस्थ' हे नाव पाहता, त्यात 'मंगेश' ह्या गृहस्थ-पात्राचे स्थान तुलनेने अधिक केंद्रवर्ती होते असावे की काय, 'गृहस्थ' ह्या नाटकात तेंडुलकरांना नेमक्या कोणत्या त्रुटी जाणवत होत्या आणि 'कावळ्यांची शाळा' मध्ये त्यांबाबत तेंडुलकरांनी कोणते बदल केले, अशा प्रकारच्या प्रश्नांची, (लेखकाने पुरविलेल्या माहितीवर अवलंबून न राहता) प्रत्यक्ष संहितांतून उत्तरे शोधण्याची वाटही चोखाळता येत नाही. 'गृहस्थ' आणि 'कावळ्यांची शाळा' ह्या दोन्हींची प्रयोगरूपेही उपलब्ध नाहीत. 'कावळ्यांची शाळा' ह्या नाटकाच्या प्रयोगातील विजया खोटे (मेहता) ह्या दिग्दर्शकाने कल्पिलेला शेवट हा ह्या नाटकाच्या संहितेतील शेवटाहून वेगळा होता, हे तेंडुलकरांनी 'कावळ्यांची शाळा'च्या प्रस्तावनेत नमूद केले आहे. प्रयोगरूप उपलब्ध नसल्यामुळे, ह्याबाबतीत व अन्य बाबतींतही संहिता आणि प्रयोग ह्यांचा तुलनात्मक अभ्यासही सध्या शक्य नाही. ह्या वर्षी विजय तेंडुलकर ह्यांच्या स्मृत्यर्थ अनेक कार्यक्रम होत आहेत आणि होतील. तेंडुलकरांचे पहिले नाटक 'गृहस्थ' ही तर जवळपास हरवलेली ठेव आहे; किमान 'कावळ्यांची शाळा' ह्या तेंडुलकरांच्या पहिल्या नाटकाच्या पुनर्लेखनास त्या नाटकाच्या दिग्दर्शक विजया मेहता ह्यांच्या मार्गदर्शनाखाली रंगमंचावर पुन्हा यथामूल साकारण्यासाठी प्रयत्न झाले, तर नाटककार विजय तेंडुलकरांचा आणि मराठी नाटकांचा अभ्यास करणाऱ्या अनेकांसाठी एक महत्त्वाचे साधन उपलब्ध होईल; जी तेंडुलकरांना दिलेली एक सार्थ मानवंदना ठरू शकेल.

**- डॉ. अनघा मांडवकर**
anagha.mandavkarpossible@gmail.com

संदर्भ :

तेंडुलकर, विजय; २००५ (दु. आ.) : कावळ्यांची शाळा, मुंबई, पॉप्युलर प्रकाशन.
तेंडुलकर, विजय; १९९७ : नाटक आणि मी, ठाणे, डिंपल पब्लिकेशन.

(सदर लेख, महर्षी दयानंद महाविद्यालय, मुंबई आणि मुंबई विद्यापीठाचे मराठी-अभ्यासमंडळ ह्यांनी आयोजित केलेल्या 'मराठी विषयाच्या पुनर्रचित अभ्यासक्रमासंबंधीच्या मार्गदर्शक कार्यशाळे'त (२६, २७ जून, २०१५) लेखिकेने सादर केलेल्या ''कावळ्यांची शाळा' व 'राहिले दूर घर माझे' ह्या नाटकांचे अध्यापनाकरिता आकलन' ह्या निबंधाच्या आधारे लिहिला आहे.)



# ‘न्यूड’ चित्रपटाच्या निमित्ताने... चित्रपटाबद्दल नाही!

**रघुवीर कुल**

**जे.जे. स्कूल ऑफ आर्ट म्हणजे कलावंताच्या सृजनाला फुलण्यासाठी पर्वणीच! ‘न्यूड स्टडी’ हा त्यातलाच एक महत्त्वाचा टप्पा. नग्नतेकडे निसर्गाचा आविष्कार म्हणून पाहणाऱ्या कलावंताची नजर व्यक्त करणारा हा लेख. अशी निकोप नजर समाजाला मिळावी. निमित्त : नुकत्याच प्रदर्शित झालेल्या, रवी जाधव यांच्या ‘न्यूड’या चित्रपटाचे!**

१९७४-७५ साल! ‘जे. जे. इन्स्टिट्यूट ऑफ अफ्लाईड आर्ट’मधील आमचे शेवटचे वर्ष.

मी कॉलेजचा (जी.एस.) जनलर सेक्रेटरी म्हणून निवडून आलेलो. यावर्षी बाहेरची कामे करीत कुठल्यातरी जाहिरात कंपनीमध्ये रुजू व्हायचं आणि मार्गाला लागायचं हे ठरलेलं, पण शेवटच्या वर्षाची आणखी एक खासियत होती, ‘न्यूड स्टडी’.


आतापर्यंत युरोपियन पेंटिंग बघून ॲनॉटॉमीच्या पुस्तकातील हाडाचे सापळे आणि चेहऱ्याच्या कवट्या बघून किंवा सोललेल्या कोंबडीसारखे दिसणारे स्नायूचे नमुने बघून झाले होते, पण प्रत्यक्ष न्यूड मेल, फिमेल मॉडेल वरून ड्राईंग काढणे झाले नव्हते. हे म्हणजे नकाशात दिसणारा रस्ता बघणे आणि त्या रस्त्यावरून स्वत: पायी चालत जाणे इतके टोकाचे वेगळे अनुभव होते.

एरवी सताड उघड्या असणाऱ्या पाचव्या मजल्यावरील हॉलचे दरवाजे पार्टिशन लावून बंद केलेले. तसेच एक पार्टिशन मॉडेलला कपडे उतरवण्यासाठी आडोसा म्हणून ठेवलेले. हॉलच्या मधोमध एक फिरता प्लॅटफॉर्म. त्यावर एक स्टूल. या प्लॅटफॉर्मभोवती मुलासाठी बसण्यासाठी आणि ड्राईंग बोर्ड वर्गात एकूण चाळीस-पन्नास मुलंमुली. (या क्लासला सर्वजण आवर्जून हजर, सर्व शिक्षकही) मुलंमुली एकत्र असण्याचा संकोच कधीच नाहीसा झा-लेला. उलट काही वेळा हास्यविनोदही होत असत. या क्लासमध्ये आम्हाला फास्ट स्केचिंग करण्यात सांगितले होते. कमीत कमी वेळेमध्ये जास्तीत जास्त स्केचेस करावयाची, पंधरा मिनिटामध्ये पंचवीस, तीस, समोरच्या मॉडेल बसलेल्या रोटेरींग प्लॅटफॉर्मचं हळूहळू फिरणे, ह्यामुळे वेगवेगळ्या कोनातून मॉडेल बघता येत असे. तरी काही मुले त्यांच्या उपजत संथपणामुळे आणि जास्तीत जास्त तपशील भरण्याच्या वृत्तीमुळे. भुवईचा केसन्‌केस कोरून काढण्याच्या तंद्रीत लागलेले. (इथे भुवया प्रातिनिधिक आहेत) अशा आमच्या एका भाऊ जयतापकर नावाच्या मित्राच्या मागे करंडेबाई उभ्या राहून बघत होत्या. शेवटी न राहून त्या भाऊला म्हणाल्या, ‘‘भाऊ, सरका पुढे!’’ संपूर्ण क्लासमध्ये हास्याची कारंजी उडाली आणि पुढील पूर्ण वर्ष भाऊला नवीन आडनाव मिळाले ‘भाऊ सरका पुढे!’

अशा कामासाठी येणाऱ्या बायका बऱ्याचदा रेडलाईट एरियामधून आलेल्या असत. वयाची चाळिशी पार केलेल्या, रात्रीची जागरणं आणि हाती काही पैसे न मिळालेल्या. एकूणच तारुण्याचा भर ओसरलेल्या. आम्ही काही मुलांनी तक्रार केल्यावर. सरांनी केबिनमध्ये बोलावले आणि म्हणाले, ‘‘तू जी.एस. ना? मग कुलाब्याला, रीगल थिएटरच्या बाजूला जा आणि बघून आण एखादी तरणी.’’ आयला! ही नवीनच सामाजिक जबाबदारी आली. खांद्यावर आली. मॉडेलला मोबदला किती देणार होतो तर दीडशे रुपये, दोन तासासाठी (शासकीय बजेट तेवढेच होते.)

ती संध्याकाळ कुलाब्यात फिरून, अमिताभच्या ‘दिवार’-मधील परवीन बाबीसारखी दिसणारी, रोज आपलं नावं बदलणारी, एक कन्या गाठून तिला फक्त ‘बसायचं’ आहे सांगून कॉलेजचा पत्ता दिला. (आजकाल ‘बसायचं याचा अर्थ वेगळा होतो)

दुसऱ्या दिवशी मोबाईलचा जमाना नसताना सुद्धा आली बाई. हा क्लासमध्ये फारच चैतन्यदायी प्रकार होता. दोनचार पोझेजस झाल्यावर तिरोडकरसरांनी तिला हाती झाडू दिला आणि डॉन्कींच्या आतील भागात केर काढण्यास सांगितले. बाई म्हणाली मी नाही करणार ‘‘मैं सिर्फ बैठूंगी!’’ शेवटी ये क्लास है बच्चे स्टडी करते है. बॉडीलाईन समजनी चाहिये वगैरे प्रवचन देऊन तिला तयार केले. वर मोबदलाही वाढवून दिला. वर्गातल्या मुलींनीही तिला समजावले की देह हा भगवंताने निर्माण केलेला सर्वात सुंदर आकार आहे. माथ्यापासून पायाच्या अंगठ्यापर्यंत वाहात जाणारी गोलाकार वळणं घेत जाणारी अल्लड नदी असावी तशी रेषा फिरत जाते. कुठेही अणुकुचीदार टोके नाहीत, हाडांचे बोचणारे पिंजरे नाहीत. काटकोनात वाकणारे कोपरे नाहीत. अशी आकृती हालचाल



करू लागली की मृदू मुलायम रेषा नाचू लागते. के.के. हेब्बरांची नृत्यांगनांची चित्रे यांची साक्ष देण्यात पुरेशी आहेत.


याउलट पुरुष सरळ रेषांनी, घट्ट स्नायूंनी कॉलर बोनच्या खळग्यांनी भरलेला, चौकोनी ठोकळा वाटू लागतो.

शतकानुशतके चित्रकार, शिल्पकार स्त्री देहाच्या प्रेमात पडलेले आपणास दिसून येतील. मग ते भारतातील लेण्यांमधून, सारनाथच्या यक्षीच्या वक्षातून, युरोपियन मास्टर्सच्या तैलचित्रातून वारंवार भेटत जातात, मोहजोंदाडोमधील 'नर्तकी'. या न्यूड मॉडेलची आदिमाया म्हणावी लागेल.

युरोपमधील विविध 'व्हिनस' युगानेयुगे स्त्री सौंदर्याचे गीत गात आहेत. आपल्याकडे कोणार्कचे सूर्यमंदिर या सर्वांवर कळस आहे. सूर्य प्रकाशाखालील सर्व काही (UNDER THE SUN) या म्हणीप्रमाणे सूर्याखालील सर्व कार्ये इथे कोरली गेली आहेत. नृत्य, वादन, स्वयंपाक, शिकार, शिक्षण, व्यायाम, युद्ध या समवेत मैथुन ही आपलं अस्तित्व दाखवत आहे. पण हे लॉजिक विसरून आपण भारतीय फक्त आणि फक्त नग्नतेच्या नावाने बोटं मोडत असतो.

आपली परंपरा, संस्कृतीच्या नावाने घोषणा देणारे 'भगवे'. या सौंदर्यमूर्तींवर पडदे टाकण्यास पुढे असतात. अशाने अत्यंत पुढारलेली संस्कृती मागे-मागे गर्तेत जात आहे यांचे भान या संस्कृती रक्षकांना येईल तो दिवस भाग्याचा म्हणावा लागेल.

खरं तर खास करून मध्यमवर्गीयांना हे नग्नतेचे वावडे



कधीपासून लागले हे शोधावे लागेल. झोपडपट्टीमधील वास्तव आणि उच्चवर्गीय समाजातील व्यवहार आपण सोडून देऊ.

मध्यमवर्गीयांमधल्या या झाकून ठेवण्याच्या वृत्तीमुळे चित्रकार ठाकुरांची पाठमोरी 'ओलेती' निषिद्ध ठरू लागली आणि हळदणकरांची समयीच्या वाती पुढे हाताचा पंजा धरणारी स्त्री संस्कृतीरक्षक ठरली. हाताच्या बोटांतील रक्तही कौतुकाचा विषय होत होता पण ठाकुरांच्या ओलेतीच्या अंगाला बिलगून बसणारी वस्त्रे दिसेनाशी झाली.

रेल्वेमधील नोकरीमुळे माझ्या वडिलांना फर्स्ट क्लासचे पासेस मिळत. आम्ही सहकुटुंब अख्खा भारत पाहिला पण, कोणार्कला मात्र मी माझ्या मित्राबरोबर जावे असा आग्रह झाला. माझ्या घरी अमृता शेरगीलचे एक सुंदर न्यूड पेंटिंग मी लावले आहे.




'तू काय बुवा चित्रकार' म्हणून कोणी बोलत नाहीत पण त्याकडे पाहण्याचेही टाळतात.

अशाच तथाकथित संस्कृती रक्षकांच्या गोतावळ्यात मी सेन्सॉरचा मेंबर म्हणून एकदा सापडलो होतो. आणि चारपाच सिनेमा परीक्षणात त्यातून मुक्त झालो.

'सखाराम बाइंडर'ची जीवनपद्धती. त्याचे बोलणे, वागणे किंवा 'गिधाडे' नाटकामधील 'लाल' रंगा ऐवजी 'निळा' रंगाचा डाग करावयास लावणारी मानसिकता. हे सर्व खरोखरीच मागच्या पिढीत ठेवून 'न्यूड' चित्रपटामध्ये काम करणारी कल्याणी मुळे किंवा राधिका आपटेसारख्या अभिनेत्री चाकोरी तोडणाऱ्या नवतारका ठरणार आहेत.

भारतभरामध्ये नग्नतेच्या कल्पनाही प्रदेश सापेक्ष आहेत. उत्तरेत वेगळ्या तर दक्षिणेत वेगळ्या. दक्षिणेत चित्रपटामध्ये नायकाची उघडी पाठ दाखवणे अधिक उत्तेजक मानले जाते. ('एक दुजे के लिये'मधील कमल हसनचा उघड्या पाठीवर लिहिण्याचा प्रसंग) दक्षिणेमध्ये पदर, पल्लू आदी संकल्पना नाहीत तर उत्तरेमध्ये सतत पल्लू सांभाळणे किंवा डोक्यावरून घेऊन चेहरा झाकून घेण्यापर्यंत गोषा पद्धती.

भारतात नग्नतेची व्याख्या करणे सुद्धा कठीण आहे. राजस्थानसारख्या प्रदेशात डोक्यावरील पदर खांद्यावर येणे असभ्यतेचे लक्षण आहे तर हिंदी सिनेमामध्ये दक्षिणी वक्षबहुला नट्या आणि पंजाबी उंच नायक हवे असतात. माझ्या आईला रोमन हॉलिडेमधील ऑड्री हेपबर्न ही हॉलीवूडची सुंदरी आहे सांगितले तर 'ही कसली सुंदर. अंगावर काही मांस आहे का?' म्हणून एका झटक्यात तिने बाद केले होते.

सौंदर्य, सेक्स आणि नग्नता या अनेक पैलू असणाऱ्या एकाच भावनेची रूपे आहेत. वेगवेगळी करूनही बघता येणारी! शेवटी हे बघणाऱ्यावर अवलंबून आहे.

Beauty lies in beholder's eyes.

हे झाकून ठेवणे, सिनेमातील सीन कट् करणे प्रभावी साधन नव्हेच. उलट नेमका उलटा परिणाम करणारे आहे. नाहीतरी आज मीड्यिामध्ये, व्हॉट्सअपमध्ये नग्नतेचा पूर आलेला दिसतोय. आणि तोही सौंदर्यहीन, ओंगळवाणा. आपल्याकडे दुर्दैवाने साक्षरता मुळातच कमी आहे. त्या पुढे जाऊन त्यामधील सौंदर्यग्रहण वगैरे बाबी दूरच उरतात. अशा परिस्थितीमध्ये 'न्यूड' चित्रपट काढणे. त्यामधील स्त्रीची वैयक्तिक गोष्ट सांगणे. हे सर्व ठीक असले तरी चित्रपटाचे शीर्षक 'न्यूड' ठेवून बॉक्स ऑफिसवर डोळा ठेवलेला नसेलच असेही म्हणता येत नाही कारण चित्रपटकर्ता माझ्यासारखाच कलाशिक्षण घेऊन जाहिरात कंपनीमध्ये प्रॉडक्ट विकणाराच होता, आणि आपल्याकडील मध्यमवर्गीय मानसिकता माहीत असल्याने टारगेट ऑडियन्सही बरोबर हेरून 'प्रॉडक्ट प्लेसमेन्ट' व्यवस्थित करणारा आहे.

'नथिंग रॉंग इन इट'

बट डेफिनेटली समथिंग इज रॉंग इन अवर आऊटलुक!

यावर समाजशास्त्रज्ञ आणि विविध विद्यवान चर्चा करून निष्कर्ष काढतील तेव्हा काढू देत. आपण आपल्या निकोप दृष्टीने नग्नता एन्जॉय करूया.

**– रघुवीर कुल**
भ्रमणध्वनी : ९९३००२३२९९
raghuvirkul@gmail.com

# कविता



## वठत चाललीय ही बाभूळ...

वठत चाललीय ही रस्त्याकडेची बाभूळ
कशाच्या लागलीय ती झुरणीला
काही कळतच नाहीये, पायातळीच्या धरणीला.
आताशा पळत, वळत नाहीत तिच्याकडे
मेंढपाळाच्या शेळ्या-मेंढ्या...
फलांग मारून हिरवा हिरवा काट्यांमधला
लुसलुशीत पाला अन् शेंगा खायला,
येत नाही एखादी परकरी पोर तिच्या सावलीत
वाळल्या शेंगांची पैंजण बांधुन थिरकायला.
किती दिवसापासून आलेलं नाहिये
जवळच्याच रानात काबाड कष्टणारं शेतकरी जोडपं
दुपारचा घास कुटका खायला, जाळीदार सावलीत.
कुणीच बांधत नाही, तिच्या भुईभार फांदीला
धुडक्यानं लहानग्याची झोळी,
कसल्या-कसल्या आठवणीनं बाभूळ होत आहे
आणखीनच काळी काळी.
नुसतेच येताहेत आवाज तिला रस्त्यावरच्या वाहनांचे
ती भोगत राहते भर उन्हात डांबरी श्रृंगार,
खोदून काढलाय दगडांसाठी कोणी जवळचाच डोंगर.
पूर्वी तिथचं साचायचं पावसाळ्यातलं चार म्हैने पाणी ,
ती ऐकतेय ठेकेदारांची धादांत मतलबी सौदेबाजी जीवघेणी
जी चाललीय बुंध्यालगतच्या खडीकट्ट्यावर बसून.
तिने सोसलीय भट्टीतल्या डांबराची झळ ताजी,
सळसळीला तिच्या तजेला देण्यासाठी
पहाटवाराही नसतो राजी.
हरेक क्षण असतो तिच्यासाठी जीवघेण्या धुळीचा
अंधारात चाचपडणाऱ्या तिच्या खालच्या दारूड्यांचा,
कधी सोसते ती घुसमटणारा वास मळीचा.
कधी ऐकू येते काळ्या बुंध्याचाच आधार घेऊन चाललेली
लघळ चोरट्या प्रियकरांची कृतक कुजबुज
तर कधी अंगावर येतो, अंधार चिरणारा प्रकाश झोत
त्याने काळे दगडही वाटू लागतात जिवंत
अन् होतात दगडी आभास जिवंतपणात.
आताशा लागत नाहीत तिला पिवळी फुलं आणि  छमछमत्या शेंगांचे घोस,
वठत चाललीय बाभूळ, आवरून सारे सारे सोस.
आजुबाजुच्या पळस, पांगीरा अन् कडुनिंबाला
जेव्हा येत असतो बहर
कोणत्या दुःखाचे ही बाभूळ भोगत असते अनाम जहर!
नाही म्हणायला अजूनही एक पाखरू बसतं शेंड्यावर
रोज सकाळी नित्यनेमानं क्षणभर. ..
त्याच्यासाठीच जपलीयत तिनं चार सहा पानं माथ्यावर
दिसतात तिला रोजच टोळीने जाणारे शिकारी सबळ
वठत चाललीय ही रस्त्याकडेची बाभूळ.

- **डॉ. कैलास रायभान दौंड**
भ्रमणध्वनी : ९८५०६०८६११
kailasdaund@gmail.com

# प्रसारमाध्यमे व लोकशाहीचे भवितव्य
# परिसंवाद

**'वी नीड यू सोसायटी' या संस्थेतर्फे पहिला 'प्रबोधन' पुरस्कार 'परिवर्तनाचा वाटसरू' या पाक्षिकास नुकताच देण्यात आला. यानिमित्ताने आयोजित केलेल्या 'प्रसारमाध्यमे व लोकशाहीचे भवितव्य' या परिसंवादात खासदार कुमार केतकर, पत्रकार दीप्ती राऊत वक्ते म्हणून सहभागी झाले तर अध्यक्षपदी डॉ. गोपाळ गुरू होते. या परिसंवादाचा हा संक्षिप्त आढावा...**

**कुमार केतकर –** दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झालेल्या देशांपैकी भारत हा असा एकमेव देश आहे जिथे लौकिक अर्थाने लोकशाही टिकून आहे. इतरत्र ती लौकिक अर्थानेही टिकलेली नाही. आपल्याबरोबर एकाच वेळी फाळणीनंतर स्वतंत्र झालेल्या पाकिस्तानात जेमतेम दहा वर्षं लोकशाही टिकून राहिली आहे.

दुसरे महायुद्ध, चीनक्रांती, सांस्कृतिक क्रांतीच्या काळात लोकशाही म्हणजे काय? या विषयीच्या चर्चेला आंतरराष्ट्रीय संदर्भ प्राप्त झाले. विशेषत: अमेरिकेत तिथल्या लोकशाही संस्थांविषयी तिथे तरुणांनी प्रश्न उपस्थित केले.

वेगवेगळ्या ठिकाणी वृत्तपत्रांचे एकूण काय स्थान आहे हे पहायचे तर पाकिस्तानात वर्तमानपत्रांची किंमत किमान २०–२५ रुपये आहे. लोकांच्या खरेदीवरच तिथली वर्तमानपत्रं चालतात. हुकूमशाहीतही लोकांनी तिथली वर्तमानपत्र टिकवून ठेवली आहेत. इंग्लंडसारख्या लोकशाही देशाचं उदाहरण घ्यायचं तर तिथले बीबीसी हे संपूर्णपणे लोकांच्या वर्गणीवर चालणारे चॅनल आहे. सरकारी जाहिरातींवर चालणारं वा कॉर्पोरेट कंपन्यांवर चालणारं नाही. चीनमध्ये १९८९ मध्ये कम्युनिस्ट पक्षाच्या अधिकृत हुकुमशाही राजवटीत लाखो तरुणांनी त्यांच्या सरकारविरोधात भूमिका घेतली. इंटरनेटचा विस्तार झाल्यावर तिथे वेगळ्या इंटरनेटचा विस्तार झाल्यावर तिथे वेगळ्या प्रकारचे पर्यायी आणि समांतर विचार मोठ्या प्रमाणावर प्रसृत झाले आहेत. लोकशाही असलेल्या वा नसलेल्या वेगवेगळ्या ठिकाणी प्रसारमाध्यमे समाजावर काय संस्कार करत होती याची ही उदाहरणे आहेत. तिथल्या प्रस्थापितांना तिथल्या सामान्य माणसांकडून आव्हान मिळायला लागलेलं होतं.

आपल्याकडे कधी सरकारची, कधी लोकसंघटनांची बंधने लक्षात घेऊनही आपण वृत्तपत्र स्वातंत्र्य बऱ्यापैकी टिकवून ठेवलंय. याचा अर्थ ते कायम टिकून राहीलच असं नाही किंवा आताही ते टिकून आहे असं म्हणण्याची माझी हिंमत नसली तरी जे टिकून आहे त्याचं आपण स्वागत केलं पाहिजे. अलीकडे संपादकांना, अँन्कर्सना राजीनामा द्यायला सांगितल्याची, दुसरीकडे जावं लागल्याची उदाहरणे आपण पाहतो आहोत. (उदा. बरखा दत्त, राजदीप सरदेसाई इ.) पण तरीही अजून संपूर्ण इमारत कोसळलेली नाही. ती पोखरली गेली आहे, ती गेल्या ४–५ वर्षांतच! म्हणूनच असं बोललं जातं की प्रसारमाध्यमांवर फार मोठ्या प्रमाणा–वर दबाव आहे त्यांना मोकळेपणाने बोलता–लिहिता दाखवता येत नाही हे बऱ्याच अंशी खरं आहे.


**दीप्ती राऊत –** सर्वात महत्त्वाचं म्हणजे 'सेल्फ इंम्पोझ्ड सेन्सॉरशिप' आज वाढली आहे आणि हे अत्यंत घातक आहे.

'अँन्टी एस्टॅब्लिशमेंट'चे काम पत्रकार, सत्ताधारी आणि समाज सगळेच विसरलेत. पत्रकार 'पब्लिक रिलेशन'चे काम करू लागलेत. 'पीपल कनेक्ट', 'ग्राउंड कनेक्ट' हा पत्रकारितेचा आत्मा आज मारला गेलाय. चार तज्ज्ञ घेऊन या आणि एकमेकांविरुद्ध झुंजवा असे चित्र आज व्हिज्युअल माध्यमांमध्ये दिसते. माध्यमांमधला सामान्य माणूस हरवला आहे. व्हॉट्सअॅपवरून जे येत ते लोकांना खरं वाटत. सत्यता कॉलॅप्स झालीय. मिडियामधून आज व्हर्च्युअल रिअॅलिटी उभी केली जातेय. व्हर्च्युअल स्टुडिओ तयार केले जाताहेत. राष्ट्रवादावर चर्चा झडतात पण शहिदांच्या विधवा आपल्या हक्कांकरता–न्यायाकरता दारोदार फिरतात, त्याची बातमी होत नाही. रिअल इश्यूज आज समोर येत नाहीत. ती स्पेसच कमी झाली आहे. हा लोकशाही समोरचा सर्वात मोठा धोका आहे.

**कुमार केतकर –** उत्तर प्रदेश, बंगाल... क्रमाक्रमाने पत्रकार ठार मारले जाण्याचे प्रमाण वाढतेय. आपला प्रवास अफगाणिस्तानाकडे चाललाय. मालकशाही आणि दडपशाहीच्या विरोधात माध्यमांचा वापर वाढायला हवाय. बातमी आणण्यापासून ती छापण्यापर्यंत पत्रकारांवर दडपणे, बंधने आहेत. साठ ते सत्तर टक्के पत्रकारांची आयडॉलॉजी प्रतिगामी, सनातनी आहे. त्यांनी खुले असले पाहिजे. एक प्रकारची अंतर्गत हुकुमशाही वाढतेय. आपल्याकडे 'इको



'वी नीड यू सोसायटी' या संस्थेतर्फे पहिला प्रबोधन पुरस्कार 'वाटसरू'तर्फे स्वीकारताना अभय कांता...




चेंबर्स' निर्माण होताहेत आणि फारच सफाईने माध्यमांवरचा दबाव वाढत चाललाय.

**डॉ. गोपाळ गुरू –** वृत्तपत्रांतले सामाजिक भान हरवत चाललेय. खरं तर समाजातील विवेकाला जागृत करण्याचे काम वृत्तपत्रांनी केले पाहिजे. आपण वृत्तपत्र घेतो म्हणजे बातमी एका अर्थी विकत घेतो पण का विकत घेतो? आपल्याला काय खरं, काय खोटं हे पडताळून पाहण्याची संधी मिळायला हवी. व्हिज्युअल माध्यमांमध्ये वास्तव, सहजगत्या लपवलं जातं अशी स्थिति आहे. 'फेस टु फेस' हा एलिमेंट कमी झाला नि आपण फेसबुकमध्ये अडकलो. पूर्वी 'फेस टु फेस'ला महत्त्व होते.

**कुमार केतकर –** लोक स्वत:च आज 'इकोचेंबर्स' तयार करतात आणि त्यात बसतात. 'ऑफ सीन', 'अब्युसिव्ह', 'उचित', 'अनुचित' वगैरे अटी घातल्या जातात. आपल्या सर्वांचा 'मॅन्युफॅक्चर कन्सेन्ट' तयार केला जातो. बांधलेला पत्रकार ही संकल्पना आज पुढे आलीय. आज आपल्याला केवळ एक चतुर्थांश सत्य सांगितलं जातंय. टीव्हीवरच्या बातम्या पाहण्यात काहीच अर्थ नाही. 'यू आर द पार्ट ऑफ सिस्टिम नाऊ.' कोणत्या बातमीला कोणता कलर दिला जातो हे आधी ठरवलं जातं. कोणत्या बातम्या छापायच्या, कोणत्या ट्विस्ट करायच्या हे ठरवलं जातं. मग मांडणी कशी व्हायची, रचना कशी करायची हे ठरवले जाते. दीप्ती म्हणाली ते बरोबर आहे, चर्चांमध्ये माणसं बोलवायची आणि ती गुंतवून ठेवायची. 'स्पॅक्टॅकल ऑफ ट्रॅजिडी'च्या मार्फत आपल्याला अनेक प्रश्नांपासून दूर ठेवले जाते.

आयडॉलॉजी ही जीवनाचा महत्त्वाचा घटक आहे असं आज आपण मानत नाही. समाजवादी विचाराबद्दल एके काळी मध्यमवर्गाला आस्था होती, ती आज संपलेली आहे.

कामगारवर्ग, गिरणीकामगार, आदिवासींचे प्रश्न, कारखाने बंद पडणे या सगळ्या गोष्टींशी आज समाज किती जोडलेला आहे? तो मध्यमवर्ग, जो एके काळी चळवळींशी जोडलेला होता तो कुठे आहे? १९७४ च्या काळात मुंबईत दूध-पाव मिळत नव्हते. मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर यांनी गणपती-दिवाळीत तरी रेशनवर २०० ग्रॅम रवा, साखर मिळावी म्हणून मोर्चे काढले. गरिबीत वाढलेला मध्यमवर्ग आज सुस्थितीत आहे, हे त्याच्या डिसेन्सटाईज होण्याचे एक कारण आहे. गिरण्या बंद पडल्या आणि जणू गिरणीकामगारांचा वर्गच संपला. एच् वन व्हिसा नसला तर किती सॉफ्टवेअर इंजिनिअर बेकार होतील याची लगेच बातमी होते पण कष्टकरी माणसाशी संबंधित प्रश्नांचे काय होते? 'स्पॅक्टॅकल ऑफ ट्रॅजेडी'मध्ये शेतकऱ्यांच्या बातम्या बसतात म्हणून त्या येतात.

आझाद मैदानातल्या लढ्यांकरता-आंदोलनांकरता पूर्वी लोक लोकल्समधून पोळ्या घेऊन जायचे. आज समाजाचा प्रत्यक्ष संपर्क तुटला. आता तो माध्यमांमार्फत होतो. 'वी फिल वी आर कनेक्टेड' पण वास्तविक आपण कोरडे झालोत. एकेकाळी इंडियन एक्सप्रेसमध्ये 'टुडेज डेथ' अशी मालिका यायची. लोकल अपघातांविषयी, मृत्यूविषयी ती असायची. आज या अपघातां-विषयी, मृत्यूंविषयी काही वाटेनासे झालेय. डिसेन्सटाईज झालोय आपण...! मध्यमवर्गाने आयडॉलॉजी सोडून दिली आहे. विचारसरणींची गरज जगण्याला असते हा विचार गेला. आज मध्यमवर्गीय माणूस वर्तुळात राहतो व त्या वर्गातले पुरोगामी व्हॉट्सअॅप ग्रुप्स बनवतो. दीडशे लोकांना मॅसेज फॉरवर्ड करतो. टेक्नॉलॉजीने असा 'सोशल कॉन्टॅक्ट' तयार केला. आपला खरा सोशल कॉन्टॅक्ट ह्या टेक्नॉलॉजीने कमी करायला लावला आहे. वी फील वी आर कनेक्टेड. वीर आर टोटली डिस्कनेक्टेड.

**दीप्ती राऊत –** व्हॉट्सअॅप हा काही बातमीचा अधिकृत सोर्स नाही. विध्वसंक, प्रतिगामी शक्ती या माध्यमाचा अधिक उपयोग करू लागल्या आहेत. वंचित, उपेक्षित घटकांच्या बाजूने येणारे-पसरणारे मेसेज खूप कमी आहेत. लोकांनी आज आपली सजगता वाढविणे गरजेचे आहे. पायाला फोड येईस्तोवर शेतकरी गावांतून चालत येतात, एखाद्या धर्मा पाटीलचा जीव जातो तेव्हा आम्ही जागे होतो.

**डॉ. गोपाळ गुरू –** लोक वाचत नाहीत. लोकांना बातम्यांच्या गाभ्यापर्यंत न्यावे लागते; हे माध्यमांचे काम आहे. 'बहिष्कृत भारत'च्या काळात हे जाणीवपूर्वक केलं गेलं. लोक शेजारच्या घरात बसून आज ट्विट करतात. 'कॉंप्रेशन ऑफ माईंड'चा पेच वाढत चाललाय. थिजलेलं, रिजिड झालेलं एक्सप्लोअर करायचे हे खरे तर लोकशाहीचे मर्म! कुकरची शिट्टी वाजते तसं जे जे थिजलंय, गोठलंय ते बाहेर यायला हवं. सोशल डेथची बातमी होत नाही. भूतकाळाचा गरिबीचा इतिहास विसरला जातोय. आपण स्वत:ला प्रश्न विचारत नाही दुसऱ्याला आरोपी ठरवतो.

●

## प्रतिभेचे चांदणे


# गुस्ताव फ्लोबर्टची मादाम बोव्हेरी

**धनंजय गांगल**


**दीड शतकानंतरही एखादी कादंबरी जगभरातील वाचकांवर गारुड करते. सतत एका स्वप्नवत् जगाच्या मृगजळामागे धावणारी या कादंबरीची नायिका आणि तिचा सुन्न करणारा मृत्यू. हा सबंध प्रवास खिळवून ठेवणारा, अंतर्मुख करणारा.....**

'**मा**दाम बोव्हेरी' ही गुस्ताव फ्लोबर्ट या फ्रेंच लेखकाची कादंबरी. १८५६ मध्ये 'रिव्यू दि पॅरिस' या मासिकात ती त्याने क्रमशः लिहिली. त्या कादंबरीतील तथाकथित व्यभिचार अश्लीलतेवरून त्यावर खटला भरला गेला. अर्थात त्यातून गुस्तावची पुढे निर्दोष सुटका झाली. मग १८५७ साली ती स्वतंत्र कादंबरी म्हणून दोन भागात प्रसिद्ध झाली. अश्लीलता आणि व्यभिचाराचे चित्रण या वरून झालेल्या आरोपांमुळे कुतूहलापोटी ती अनेकांनी विकत घेतली, वाचली आणि अल्पावधीत ती अत्यंत लोकप्रिय-बेस्टसेलर ठरली, पण ते कारण सोडलं तरी दीड शतकानंतर आजही वास्तववादी साहित्यात ती मैलाचा दगड समजली जाते. जगभर अनेक भाषांत तिची भाषांतरे झाली आहेत. १८८० मधे, वयाच्या ५८ व्या वर्षी गुस्ताव फ्लोबर्टचा मृत्यू झाला. त्यानंतर जवळ-जवळ सहा वर्षांनी म्हणजे १८८६ साली एलेनॉर मार्क्स अव्हेलिंग हिने 'मादाम बोव्हेरी' ह्या फ्रेंच कादंबरीचे इंग्लिशमध्ये भाषांतर केले आणि ती ब्रिटिश लोकांना आणि पर्यायाने जगाला वाचता आली. एलेनॉर मार्क्स अव्हेलिंग ही कार्ल मार्क्स याची मुलगी. यानंतर गेल्या दीड शतकात वेगवेगळ्या पंधरा ते वीस लेखकांनी या कादंबरीची इंग्लिशमध्ये भाषांतरे केली आहेत. गुस्ताव फ्लोबर्टच्या कादंबरीतील एखाद्या साध्याशा वाटणाऱ्या वाक्याचे पण वेगवेगळे पंधरा आविष्कार पाहायला मिळतात आणि त्यावर अनेक समीक्षकांनी भाष्य केले आहे. या कादंबरीच्या इंग्लिश अनुवादावर एक मोठे समीक्षणात्मक पुस्तक होऊ शकते. शिवाय इंग्लिश सोडून वेगवेगळ्या भाषेत तर शेकडो भाषांतरे झाली





आहेत. या कादंबरीवर आधारित सिनेमे आणि टीव्ही मालिका जगभर झाल्या आहेत आणि जगभरच्या चित्रपटकर्मींना आजही ही कादंबरी खुणावते. १९९३ साली केतन मेहता दिग्दर्शित 'माया मेमसाब' नावाने या कादंबरीवर आधारित हिंदी चित्रपट आला होता. त्यात दीपा साही, शाहरुख खान, फारूक शेख, परेश रावल आणि राज बब्बर यांनी प्रमुख भूमिका केल्या होत्या.




चार्ल्स बोवेरी हा फ्रान्स-मधील नॉर्मनडी परगण्यातील रोईन शहराजवळील गावात राहणारा एक गरिबी विद्यार्थी. तो वैद्यकीय शिक्षण घेत असतो आणि पुढे सार्वजनिक आरोग्यव्यवस्थेत सर्वसाधारण डॉक्टर म्हणून रुजू होतो. त्याच्या शिक्षणावर झालेला खर्च आणि एकूणच आर्थिक स्थिती बघून त्याची आई त्याचे लग्न त्याच्याहून बऱ्याच मोठ्या पण श्रीमंत अशा हेलॉईस नावाच्या विधवेशी करून देते. लग्नानंतर नोकरीनिमित्त दोघेही मुक्काम टोट्स येथे हलवतात. चार्ल्स हा 'आपण बरं की आपलं काम बरं' असा नाकासमोर चालणारा सर्वसाधारण डॉक्टर असतो तर त्याची बायको हेलॉईस ही कटकटी आणि सतत संशय व्यक्त करणारी असते. तिच्या या स्वभावामुळे चार्ल्स गांजून गेलेला असतो. एके दिवशी रौओल्ट या तालेवार शेतकऱ्याचा पाय मोडल्याने त्यावर उपचार करण्यासाठी त्याच्या शेतावर चार्ल्सला जावे लागते. तिथे त्याची भेट रौओल्टची तरुण मुलगी एम्मा हीच्याशी होते. एम्मा दिसायला सुरेख, फ्रेंच कॉन्व्हेंट मध्ये शिक्षण घेतलेली पण चंचल आणि स्वप्नाळू असते. तिने शहरातील प्रणयी युगुलांवर आधारित अनेक कथा-कादंबऱ्या वाचलेल्या असतात आणि गावातील साधेसे जीवन जगण्यापेक्षा आणि असे विलासी, स्वप्नरंजित, रम्य, शाही जीवन जगण्यासाठी ती अधीर असते. कळत-नकळत चार्ल्स एम्माच्या प्रेमात पडतो आणि एम्मालाही चार्ल्स आवडू लागतो. मग मुद्दामच रौओल्टचा पाय पाहण्याच्या निमित्ताने चार्ल्सच्या भेटी वाढू लागतात. इकडे आधीच संशयी असलेल्या हेलॉईसला अंदाज येऊ लागतो तिचा संशय वाढून, त्याचे त्यांच्या भांडणात पर्यवसान होते आणि हेलॉईस चार्ल्सला, रौओल्टच्या शेतावर न जाण्याची तंबी देते. तोही तशी शपथ घेतो. त्याच सुमारास थोड्याशा अनपेक्षितपणे हेलॉईसला, जी तिची संपत्ती म्हणून वाटत होती ती प्रत्यक्षात अस्तित्वातच नाही हे कळते. ते चार्ल्सच्या आईलाही कळते आणि ज्यासाठी चार्ल्सचे लग्न तिच्याशी लावले ते कारणच संपल्यामुळे त्यांच्यात प्रचंड भांडण होते आणि त्यातच हेलॉईसचे एका जुन्या आजारामुळे अचानक निधन होते. हेलॉईसच्या मृत्यूला कुठेतरी आपणही कारणीभूत ठरलो ही अपराधीपणाची भावना चार्ल्सला बोचत असते. या काळात एम्माचा विषय त्याच्या मनातून मागे पडलेला असतो आणि अचानक परत रौओल्टच्या घरून रौओल्टचा मोडलेला पाय बघून जाण्याबद्दल बोलावणे येते. चार्ल्स परत रौओल्टच्या घरी जातो, परत एम्माची भेट होते आणि तिच्या प्रेमात पडतो. आत्तापर्यंत रौओल्टलाही हे लक्षात आलेले असते. पारंपरिकदृष्ट्या चार्ल्स हा पती म्हणून योग्य आहे असे रौओल्टचे मत असते. एम्माचीही संमती आहे बघून तो चार्ल्सशी एम्माचे लग्न लावून देतो. एम्माची आता मादाम बोव्हेरी होते. तिचा व कादंबरीचा पुढील प्रवास सुरू होतो.

मादाम बोव्हेरी काही काळ लग्नाच्या नव्या नवलाईत रमते. पण काहीच काळात तिची मूळची सतत नाविन्य शोधणारी स्वप्नाळू वृत्ती उफाळून येते. सामान्य जीवन जगणारा, कसलीही विशेष आवड नसणारा चार्ल्स तिला हळूहळू कंटाळवाणा वाटू लागतो. याच दरम्यान एका संध्याकाळी चार्ल्सने उपचार केलेला एक शाही रुग्ण उमराव मार्क्विस याच्याकडून एका बॉल-पार्टीमध्ये उपस्थित राहण्याचे दोघांना आमंत्रण येते. तिथली उच्च अभिरुची असलेलं वातावरण, श्रीमंती, विपुलता, सभ्यता, सुसंस्कृत वातावरण बघून ती चकित होते. ती शॅम्पेन पिते, अनेकांबरोबर नृत्य करते. तिच्या सौंदर्याची बहुतेक जण स्तुती करतात. अचानक घडलेल्या या घटनेमुळे मादाम बोव्हेरी हरखून जाते. आपण जे स्वप्न बघत होतो ते हेच जीवन आहे हेच तिच्या लक्षात येते. तर दुसरीकडे चार्ल्सबरोबरचे हे कंटाळवाणे जीवन. छान परफ्युम लावून गुलाबाचे फूल देणाऱ्या नवऱ्याचे ती स्वप्नं बघत असते आणि प्रत्यक्षात औषधांचा वास तिच्या नशिबी येतो. त्यातून ती कुढत राहते आणि वारंवार आजारी पडते. तिच्या आजाराचे मूळ कारण चार्ल्सच्या बुद्धीच्या पलीकडचे असते. तिला हवा-बदलाची गरज आहे समजून चार्ल्स आपले घर योंव्हिलला हलवतो आणि आपल्या नविन प्रॅक्टिसमधे गुंतून जातो.

इथेच योंव्हिलला त्यांना मुलगी होते. ह्या मुलीतही एम्माचा जीव गुंतत नाही. ह्या छोट्या मुलीला अंगावर पाजणाऱ्या दाईकडे वारंवार न्यावे लागते. इथेच अचानक तिची भेट लेओन दुपोईस या कोर्टात काम करणाऱ्या कारकून तरुणाशी होते. लेओन दुपोईस हा होमाईस नावाच्या श्रीमंत औषध विक्रेत्याच्या कुटुंबासह रहात

असतो. तो साहित्य-संगीताचा रसिक असतो आणि तिच्या मनातल्या रोमँटिक प्रतिमेशी मिळता जुळता असतो. लेओन आणि एम्मा चोरून चोरून भेटत राहतात. एकमेकांवर भाळतात, फिदा होतात. पण एका टप्प्यापलीकडे लेओन एम्माचे नाते पुढे जात नाही. मादाम आणि एका मुलीची आई म्हणून समाजात असलेली प्रतिमा एकीकडे तिला सोडवत नाही तर दुसरीकडे लेओनशी असलेलं रोमँटिक नातं! त्यामुळे ती कुठलाच निर्णय घेऊ शकत नाही. शेवटी निराश होऊन तो पॅरिसला पुढच्या शिक्षणासाठी निघून जातो आणि एम्मा पुन्हा एकदा निराशेच्या गर्तेत सापडते, पण ही अवस्था फार काळ रहात नाही.

एकदा रुडाल्फ बोलिंजर हा एक श्रीमंत जमीनदार चार्ल्सच्या दवाखान्यात आपल्या नोकराच्या उपचारानिमित्त येतो. इथे त्याची भेट एम्माशी होते. तो अविवाहित असतो आणि अनेक स्त्रियांशी संबंध ठेवून असतो. त्याच्या चाणाक्ष नजरेला एम्मात आपली पुढची शिकार दिसते. तिची प्रकृती सुधारण्यासाठी आपल्याबरोबर रोज सकाळी घोड्यावरून रपेट मारण्याचे तो आमंत्रण देतो. सतत आपल्या पत्नीच्या प्रकृतीच्या काळजीत असणारा चार्ल्सही त्याला होकार देतो. अशा श्रीमंती आणि शाही गोष्टींचे एम्माला आकर्षण असतेच आणि एका नवीन नात्याला सुरवात होते. ती रुडाल्फला वारंवार चोरून भेटते, प्रेमपत्र लिहिते आणि या रोमँटिक नात्यात रमून जाते. हा काळ तिचा स्वप्नांतला, रोमँटिक काळ असतो. ती श्रीमंतीच्या हव्यासापायी विविध उंची वस्तू, कपडे, फर्निचर विकत घेण्याचा सपाटा लावते. त्यासाठी ती वेळोवेळी प्रचंड कर्जही घेते. कर्जासाठी ती आपले घरही गहाण ठेवते. काही काळात ती पळून जाऊन नवीन संसार थाटण्याच्या कल्पनेला रुडाल्फची संमत्ती मिळवते. पळून जाण्याचा दिवसही ठरतो. प्रत्येक्षात रुडाल्फ तिला खेळवत असतो. पळून जाऊन नवीन संसार थाटण्याच्या तिच्या उत्साहात त्याला काहीही रस नसतो. आता त्याला एम्माची कटकट वाटू लागते आणि तिचा कंटाळाही येतो. तिला आवडतं तसं एक पत्र लिहून ॲप्रिकॉट फळांच्या करंडीसोबत भेट म्हणून पाठवतो. त्यात तो या पळून जाण्याच्या कल्पनेतून अंग काढून घेत आहोत याची जाणीव तिला करून देतो. तसेच आपल्यामधलं नातं संपल्याची जाणीव तिला करून देतो आणि काही काळ आपण परगावी जात आहोत तेव्हा भेटण्याचा प्रयत्न करू नये हेही सांगायला विसरत नाही. याचा अर्थातच एम्माला प्रचंड धक्का बसतो आणि ती पुन्हा एकदा नैराश्यात जाते. तिच्या नैराश्याच्या मूळ कारणाशी अनभिज्ञ चार्ल्स तिला वेगवेगळ्या प्रकारच्या गोळ्या आणि औषधे देत राहतो. याच दरम्यान एम्मानी पूर्वी घेतलेली कर्ज आणि औषधोपचारासाठी होणारा खर्च भागवता भागवता चार्ल्सची दमछाक होते आणि दोघांमधली दरी अजूनच वाढते. यावर थोडा उतारा म्हणून मूड बदलण्यासाठी त्यांचा मित्र -औषधविक्रेता होमाईस त्यांना रोईन शहरात जाऊन एक ऑपेरा बघण्याचा सल्ला देतात. त्याच्या सल्यानुसार ते हा ऑपेरा बघायला जातात. या ऑपेरात त्यांची भेट योगायोगाने परत लेओनशी होते. तो आता वकील झाला असून एक वेगळाच आत्मविश्वास त्याच्यात आलेला असतो. एम्माच्या त्याच्याबद्दलच्या स्वप्नांना परत पालवी फुटते आणि तोही त्याला साद देतो.

आता ती परत-परत कारणे काढून रोईन शहराला भेट देत राहते. त्यांचे उत्कट प्रेमप्रकरण परत सुरू होते. दरम्यान एम्माला कळून चुकते की तिचे कर्जप्रकरण नाकापर्यंत पोचले आहे. आपल्या घरावर जप्ती येणार आहे आणि कुठूनतरी पैश्याची सोय केल्याशिवाय जगणे अशक्य आहे. हे सर्व चार्ल्सला सांगायला ती घाबरत असते. ती पैशाच्या मदतीची याचना लेओनकडे, रुडाल्फकडे (आता तो परत आलेला असतो) आणि शेवटी होमाईस यांच्याकडे करते पण सगळ्यांकडून तिच्या वाट्याला निराशाच येते. विफलतेने घेरलेली ती कुठलाच मार्ग न सापडल्याने शेवटी विष पिऊन मृत्यूला कवटाळते. इथे कादंबरी संपत नाही.

एम्माच्या दुर्दैवी मृत्यूनंतर कर्जदार चार्ल्सच्या मागे लागतात. एम्माने वेळोवेळी घेतलेल्या उंची वस्तू विकून खरे तर त्या कर्जाची काही प्रमाणात परतफेड होऊ शकते, पण तिची आठवण म्हणून तो तिने खरेदी केलेली एकही वस्तू विकण्यास नकार देतो. या परिस्थितीत प्रकृती खालावून चार्ल्सचाही मृत्यू होतो. त्यांच्या लहानग्या मुलीची - बर्थ हिची रवानगी तिच्या आजीकडे होते अल्पावधीत तिची आजीचेही निधन होते. आता तिची रवानगी दूरच्या एका गरीब नातेवाईकांकडे होते. इथे आर्थिक परिस्थितीमुळे नाईलाजाने तिला बालमजूर म्हणून एका सूट-गिरणीत काम करावे लागते. इथे कादंबरी संपते!

कुठली पात्रं चांगली किंवा वाईट? काय पाप आणि काय पुण्य? असे न रंगवता घेता आणि कोणाचीही बाजू न घेता हा कथापट अलगद गुस्ताव फ्लोबर्ट उलगडून दाखवतो. कादंबरी कधी चार्ल्सच्या दृष्टिकोनातून तर बराच काळ एम्माच्या दृष्टिकोनातून तर कधी लेखकाच्या दृष्टिकोनातून कथा सांगत पुढे सरकते. ही दृष्टिकोनाची सरमिसळ कादंबरीची खरी ताकद आहे. कादंबरीत एम्मा जशीजशी तिच्या कौटुंबिक सीमा-रेषा ओलांडून लेओन आणि रुडॉल्फ या पर-पुरुषांशी संबंध जोडते तसे तिचे देखणेपण अधिकच मोहक दिसू लागते. एका आंधळ्या भिकाऱ्याचा कादंबरीत वारंवार उल्लेख आहे. तिच्या दुर्दैवी मृत्यूसमयी त्याचे अस्तित्व एक वेगळेच गूढ परिमाण देते.

आठवणी पुसल्या गेलेल्या असतात.

अद्भुतरम्य, कल्पित, स्वप्नरंजित, गूढ अनाकलनीय रहस्य आठवणी!

**- धनंजय गांगल**
भ्रमणध्वनी : ९८२१०३२८३०
dhananjay.gangal@gmail.com

# ८० व्या वाढदिवसानिमित्त आयोजित सन्मान सोहळ्यातील डॉ. पी. एस. रामाणी यांचे भाषण (१२ मे २०१८)

**आ**ज जेव्हा मी समोर नजर फिरवतो, तेव्हा मला सगळीकडे माझ्या कारकिर्दीत काही ना काही काळ माझ्या सोबत घालवलेले चेहरे दिसत आहेत. ज्यामुळे मी पुन्हा एकदा त्या काळात पोहोचलो आणि मला तो प्रत्येक प्रसंग आठवतो की जेव्हा-जेव्हा आपण इतर सहप्रवासी मनुष्यांच्या हितासाठी एकत्र आलो. कदाचित आपण यापुढे पुन्हा एकत्र या मार्गावर जाऊ शकणार नाही किंवा काही वैज्ञानिक वा सामाजिक कामांसाठी काम करू शकणार नाही, परंतु आपल्या या सहयोगाच्या मौल्यवान आठवणी माझ्यासोबत कायम राहतील.

आज, वयाच्या ऐंशीव्या वर्षी मी माझ्या आयुष्यात अत्यंत समाधानी आहे. माझी ही समाधानाची भावना भौतिक सुखाशी संबंधित अजिबात नाही, कारण मी स्वत:ला भौतिक संपत्तीनुसार श्रीमंत समजत नाही परंतु एक वैद्यकीय व्यावसायिक आणि सर्जन म्हणून मी माझ्या इतक्या वर्षाच्या प्रवासात शब्दश: सांगायचे झाले तर अनेक रत्नं आणि हिरे गोळा केले आहेत आणि तेच माझा सन्मान आहेत. खरं तर, माझ्या वैद्यकीय प्रवासात, मी उच्च आणि चांगल्या हेतूने जे प्रयत्न करत राहिलो याचे कारणही तेच आहेत.

यापैकी काही रत्नं म्हणजे माझे लाखो रुग्ण आहेत, ज्यांना बरे करण्याचे भाग्य मला मिळाले. ही त्यांचीच प्रेरणा होती की जिने माझ्या संशोधनासाठी असलेल्या प्रेमामध्ये उत्प्रेरकाचे काम केले आणि ज्यामुळे माझी एक शिक्षणतज्ज्ञ म्हणून ओळख बनू शकली. माझ्या पन्नास वर्षांच्या वैद्यकीय कारकिर्दीतील बऱ्याचशा केसेसमध्ये मला कुटुंबातील तीन पिढ्यांवर उपचार करण्याची संधी मिळाली. त्यांचा माझ्यावरील विश्वास हेच माझ्यासाठी मोठे पारितोषिक आहे.

शैक्षणिकदृष्ट्या, माझे समाधान, पाठीच्या कण्याचे आजार आणि त्यावरील उपचारांकरिता, मी अनेक वर्षांपासून उभारणी केलेल्या विविध आस्थापनांमध्ये आहे. मी स्थापना केलेली 'न्यूरोट्रोमा सोसायटी' आज जवळजवळ तीस वर्षांची झाली आहे आणि अठरा वर्षांपूर्वी स्थापना केलेल्या 'न्यूरोस्पायनल सर्जन्स असोसिएशन'ला आज संपूर्ण जगात ओळखले जाते. माझे सहकारी- यशबीर दिवाण, जेकेबीसी पार्थिबन, सुशील पाटकर, प्रकाश मोढा, श्रद्धा महेश्वरी, अँटोनियो फिगरेडो, राजेंद्र सेल्व्हन आणि सुमीत पवार यांच्या सहकार्याशिवाय मी हे करूच शकलो नसतो. माझे हे सहकारी माझ्याबरोबर अथक परिश्रम करत आहेत आणि मला पूर्ण खात्री आहे की ते 'एनएसएसए'चा संदेश पुढे घेऊन जातील व माझ्या वारशाची देखभाल करतील. एखाद्या प्रकल्पाच्या यशासाठी त्याला उत्कृष्टतेकडे घेऊन जाण्याची भावना फार महत्त्वाची असते. मला जगभरातील तरुण डॉक्टरांना मृतदेहांवर पाठीच्या कण्याची शस्त्रक्रिया करण्याचे प्रात्यक्षिक दाखविण्याचा सन्मान मिळाला आहे. या डॉक्टरांनी माझ्याबद्दल दाखवलेला आदर आणि प्रेम यामुळे मला माझी स्वत:शीच कार्यक्षमता वाढवणाऱ्या नवनवीन पद्धती शोधण्याचं प्रोत्साहन मिळतं.

मी एकत्रितपणे आतापर्यंत माझ्या ५८ पुस्तकांचे प्रकाशन करणाऱ्या आणि जी पुस्तके जगभर वाचली जातात अशा माझ्या 'जेपी पब्लिशिंग हाऊस', 'सीबीएस पब्लिशर्स', 'ग्रंथाली' आणि 'इंकिंग इनोव्हेशन्स' या सर्व प्रकाशनगृहांचा आभारी आहे. माझ्या क्षेत्रात त्यांची मदत मला आधार देणारी आहे.

स्पायनल सर्जरीमध्ये, नवनवीन साधने आणि पद्धतींचा शोध लावण्याची आवड जोपासण्याचे काम भारतातील 'जेस्को सर्जिकल फर्म', स्वित्झर्लंडमधील 'सिंथेस' आणि जर्मनीतील 'पॅराडिगम स्पाईन' यांच्या सहकार्याशिवाय पूर्णच होऊ शकले नसते.

एक गोष्ट स्पष्ट आहे की, शैक्षणिक संशोधनासाठी नेहमीच निधीची गरज असते. जगातील बहुतेक विद्यापीठे आणि संस्थादेखील या मागण्या पूर्ण करण्यासाठी असमर्थ असतात, ज्यामुळे औषध कंपन्या हा पुढील व्यवहार्य पर्याय ठरतो आणि मी या पर्यायाचा पारदर्शकतेने आणि नैतिकतेने मोठ्या प्रमाणात उपयोग केला आहे. मी, श्री. जागरूप सिंग यांचा अतिशय आभारी आहे की ज्यांनी मला वैद्यकीय संशोधन करताना पुढे जाण्यास प्रोत्साहन दिले.

माझे विद्यार्थी मला त्यांचे पूर्ण सहकार्य देण्यात कधीच मागे राहात नाहीत. मी ज्या काही कल्पना किंवा प्रस्ताव मांडतो, त्याला हे सगळे ज्या काही उत्साहाने उचलून धरतात आणि पार पाडतात, त्याला खरंच तोड नाही.

मला खात्री आहे की, जर विज्ञानाने अजून प्रगती करावी असे वाटत असेल तर, आपण तरुण पिढीने मांडलेल्या कल्पनांचा सविस्तर विचार करायला हवा. पात्र आणि अनुभवी वैद्यकीय व्यावसायिकांनी या तरुण पिढीतील रत्नांचा शोध घेऊन त्यांना मानवतेच्या उन्नतीसाठी, नवीन आणि अभिनव वैज्ञानिक स्वरूपात तयार करणे आवश्यक आहे.

आपण एकत्रितपणे, वैद्यकीय व्यवसायाचा सदुपयोग




**डॉ. प्रेमानंद रामाणींसह 'ग्रंथाली' परिवार**

करण्याचे सर्व प्रयत्न करणे आवश्यक आहे. सध्या एक नि:पक्षपाती 'वॉचडॉग कमिटी' नेमणे, ही एक संकल्पना मांडण्यात आली आहे ज्यामुळे वैद्यकीय व्यवसायातील गैरप्रकारांना आळा घालता येईल. या व्यवसायातील नैतिक मूल्ये पुन्हा मिळवण्याकरिता संबंधित अधिकारी महत्त्वाचे आहेत.

मी भारतातील, तसेच इतर देश, विशेषत: इंडोनेशिया, जपान, दक्षिण कोरिया, इजिप्त, बांगलादेश, नेपाळ, मलेशिया, आफ्रिका, चीन, रशिया, फिलिपाईन्स, तुर्की, मेक्सिको आणि अमेरिका तसेच अरब देशांमधील तरुण पिढी बरोबरच जागतिक आरोग्य संघटना, वर्ल्ड न्यूरोसर्जरी, एशिया पॅसिफिक, साऊथ इस्ट एशिया न्यूरोसर्जरी यांच्या रूपाने माझा वारसा मागे ठेवलेला आहे.

इको सुबॅजिओ, रुलि डहलान, मोटोई शोडा, नासिरू इस्माईल, मोहम्मद होसेन, नाबि अली खान, जर्मन बॅलेस्टरॉस, क्रिश्ना शर्मा, डोनी लुईस, साबरी इब्राहिम, से हून किम, अहमद रडवान, अली मझियाद आणि इतर अनेक न्यूरोसर्जननी माझ्या शिकवणुकीपासून प्रेरणा घेतली आहे हे ऐकल्यावर मला खरंच खूप गहिवरून आले आहे. मोहम्मद मझियाद, बेनि वरजोमर्तानि, बँगबँग दारवानो, कांग टेक लिम, मार्कस आईफ, हाफीद बजामल, पांडुरंग कुलकर्णी, रडवान नुबी, कनक कांति बरुआ, अबुल खैर, जुंग कुन सूह, योशिटाका हिरानो, डेव्हिड सन आणि माझे सारे सहकारी व शुभचिंतक ज्यांनी माझ्या या क्षेत्रातील योगदानापासून प्रेरणा घेतली आहे त्या सगळ्यांनी आज येथे येऊन मला मोठा सन्मान दिला आहे.

माझ्या कारकिर्दीच्या अगदी सुरुवातीपासून, मला माझ्या भारतीय सहकाऱ्यांनी आणि मुंबई व महाराष्ट्रातील न्यूरोसर्जननी मला त्यांच्यात सामील करून घेतले आणि आदर दिला. आज त्यांची उपस्थिती ही आमच्या इतक्या वर्षांच्या परस्पर सामंजस्याची साक्षीदार आहे.

मी अतुल गोएल, बी.के. मिश्रा, दिपू बॅनर्जी, सुरेश सांखला, केतन देसाई, राजन शहा, चंद्रशेखर देवपुजारी आणि राम चड्ढा यांचा आभारी आहे.

वैद्यकशास्त्रातील मी जमविलेल्या रत्नांव्यतिरिक्त अन्य क्षेत्रातील व्यक्तींनीही मला इतर पिढ्यांमधील लोकांना प्रेरणा देण्यास मदत केलेली आहे.

मी जुन्या पिढीशी संबंधित आहे, जेथे आम्हाला समाजात एकरूप व्हायला फार कमी पर्याय उपलब्ध होते. आम्ही आमचे जीवन विज्ञान आणि वैद्यकीय व्यवसायाला समर्पित केले. अगदी माझ्या कुटुंबालाही मी दुय्यम स्थान दिले, त्यामुळे मी माझ्या कुटुंबाला सांभाळण्याचं सगळं श्रेय माझी पत्नी प्रतिमाला देतो. जिने केवळ आमच्या कुटुंबाला एकत्र ठेवलेलं नाही तर मी जेव्हा तासन्तास रुग्णालय आणि संशोधनात व्यग्र असे, अशा वेळी आमची मुलं अंजली आणि अनुप या दोघांनाही खऱ्या हिंदू परंपरेनुसार एकट्यानेच वाढवलेलं आहे. तिने आमच्या कुटुंबातील सदस्यांमध्ये सुसंवाद आणि आदर राखताना सर्वांमध्ये एक घट्ट वीण तयार केली आहे. आज माझी मुले मुंबईत प्रतिष्ठित पदांवर काम करताना पाहून मला फार अभिमान वाटतो आहे. प्रतिमाने माझे नातेवाईक आणि समाजाबरोबर देखील उत्कृष्ट संबंध निर्माण केलेले आहेत. आम्ही जीवनात चांगल्या किंवा वाईट कोणत्याही गोष्टीसाठी एकत्र यायचे ठरवले त्या दिवशी आमच्यात जे प्रेम आणि आदर होता तो आज ४८ वर्षांनंतर देखील तेवढाच ताजा आहे. मी कबूल

करतो की, एक पत्नी, आई, सून, सासू, घरातील कर्ती व्यक्ती आणि आजी या सर्व रूपातील तिची जबाबदारी सगळ्यात कठीण होती, पण तिने या सगळ्या भूमिका अत्यंत सोशिकपणे आणि आत्मविश्वासाने पार पाडल्या. मला तिचा फार अभिमान वाटतो.

पी.ओ. शेठ माझे चार्टर्ड अकाउंटंट ज्यांची माझ्याशी चाळीस वर्षांपूर्वी गाठ पडली. आज ते आणि त्यांच्या पूर्ण टीमने पैशांचा हिशोब राखण्याची संपूर्ण जबाबदारी उचललेली आहे. त्यांची नैतिकतेच्या बाबतीत कोणतीही तडजोड न करता पारदर्शकतेने सर्व बाबींचा सामना करण्याची वृत्ती आणि परिश्रमाने त्यांनी आमच्या कुटुंबात मानाचे स्थान मिळवले आहे. ज्या समाजात मी जन्मला आणि राहतो, त्या समाजाला परत देण्याची संधी मिळाल्याबद्दल मी कृतज्ञ आहे. गोव्यामध्ये माझे नाव दिलेला रस्ता आणि पाच पुरस्कार यांनी मला सन्मानित करण्यात आलेले आहे. माझ्या सन्मानात हंगेरीतील पोस्ट कार्यालयाने एक टपाल तिकीट जारी केले आहे तसेच, इंडोनेशियातील एका रुग्णालयाच्या ऑपरेशन थिएटरचे नाव देखील माझ्या नावाने ठेवण्यात आले हा मी माझा मोठा सन्मान समजतो.

ब्ल्यू क्रॉस लेबोरेटरीजचे संस्थापक आणि अध्यक्ष, एन.एच. इसरानी, यांनी मला अनेक वर्षांपासून सामाजिक कार्यात प्रगती करण्यास मदत केली आहे. अलिकडेच त्यांच्या योगदानामुळे मला गोव्यामध्ये ब्ल्यू क्रॉस डॉ. रामाणी क्रिडांगण बांधण्यास मोलाची मदत केलेली आहे.

सारस्वत बँकेचे अध्यक्ष गौतम ठाकूर, एनकेजीएसबी बँकेचे अध्यक्ष किशोर कुलकर्णी यांनी देखील माझ्या सामाजिक उपक्रमांमार्फत पुढाकार घेतला आहे. गोवा सरकारमधील दुसरे कॅबिनेट मंत्री माननीय रामकृष्ण ढवळीकर हे देखील माझ्या सामाजिक कार्यात सतत प्रोत्साहन देत असतात. आज ते येथे उपस्थित राहिल्याने मी त्यांचे आभार मानतो.

आज मी ज्या स्थानावर आहे त्या स्थानावर पोहोचण्यास मला माझ्या भूतकाळातील शैक्षणिक संस्थांनी मदत केली आणि आज मी ज्या संस्थेत काम करीत आहे ते मुंबईतील लीलावती रुग्णालय एक उत्कृष्ट खाजगी विश्वस्त संस्था आहे ज्याला, नुकतीच सर्वोत्कृष्ट शिक्षण संस्था म्हणून तिला मान्यता मिळाली आहे.

लिलावती रुग्णालयाचे सीओओ आदरणीय डॉ. व्ही. रविशंकर यांचा माझी शैक्षणिक भूक भागवण्यात मोठा वाटा आहे. ते सैन्यामध्ये प्राध्यापक आणि कार्डिओथोरॅसिक सर्जिकल विभागाचे मुख्याधिकारी होते आणि ले. जनरल या सर्वोच्च पदावर निवृत झाले आहेत. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी अंगीकारलेली शिस्त ही प्रत्येक पिढीसाठी आदर्श निर्माण करणारी आहे. आजदेखील लिलावतीमधील प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे सहकार्य मला माझ्या शास्त्रीय संशोधनात पुढे जाण्यासाठी प्रोत्साहित करते. त्यापैकी आमचे वैद्यकीय संचालक डॉ. कोनराड वाझ येथे प्रेक्षकांमध्ये बसले आहेत.

या वयातही माझी तब्येत स्थिर आहे. याचे श्रेय मी दिपक लोंढे, मुंबईतील स्ट्रायडर्स जॉगिंग क्लबचे अध्यक्ष आणि ईशा टुर्सचे अध्यक्ष व हायकिंग तज्ज्ञ आत्माराम परब यांना देईन, जे मला त्यांच्या क्षेत्रात तंदुरुस्त राहण्यासाठी मदत करतात. मी शिवाजी पार्क शाखेच्या स्ट्रायडर्स आणि धावकांचा अत्यंत ऋणी आहे. दररोज सकाळी जॉगिंगसाठी जाताना मी नेहमी त्यांच्या 'गुड मॉर्निंग डॉक्टर' या अत्यंत उत्साही आवाजातल्या शुभेच्छांची वाट बघत असतो.

तात्पर्य, मला सगळ्यांना हे सांगायचं आहे की, तुम्ही आता जाणले असेलच की माझं जीवनातील समाधान आणि आनंद तुमच्यामुळे आहे, जे आता येथे माझ्यासाठी एकत्रित झाले आहेत. तुम्ही माझी खरी रत्नं आणि हिरे आहात!

तुम्ही मला दिलेल्या या सुंदर भेटीसाठी मी तुमचे आभार मानतो आणि अत्यंत नम्रतेने आणि आदराने स्वीकार करतो.

तुम्हाला निरोप देणं आज माझ्यासाठी खूपच जड जात आहे.

परंतु, तत्पूर्वी या परिस्थितीशी साम्य दर्शवणारं ब्रायन क्लाझचं एक गाणं तुम्ही माझ्यासोबत गावं अशी माझी इच्छा आहे. तर तुम्ही माझ्याबरोबर सामील होऊन जमेल तेवढ्या मोठ्या आवाजात मला साथ द्यावी.

ज्येष्ठ न्युरोस्पायनल सर्जन डॉ. पी. एस. रामाणी यांनी ८०व्या वर्षात पदार्पण केल्यामुळे त्यांच्या जगभरातील विद्यार्थ्यांनी डॉक्टर यांना अनोखी मानवंदना दिली. हा गुरुवंदनेचा सोहळा मुंबईत नुकताच संपन्न झाला. यावेळी कमी अंतराची मॅरेथॉन आयोजित केली होती. यावेळी मेक्सिको, इंग्लंड, अमेरिका, दक्षिण कोरिया, आफ्रिका, जपान, टर्की, फिलिपाईन्स, इजिप्त, नेपाळ, इंडोनेशियामधील त्यांचे मित्र आणि हितचिंतक उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ६ वाजता वरळी सी लिंक येथे ५ आणि १० किमी मॅरेथॉन स्पर्धेने झाली. यात शिवाजी पार्क, स्ट्रायडरर्स जॉगिंग क्लब, डॉ. रामाणी यांच्यासह विद्यार्थी अशा ४५० स्पर्धकांनी सहभाग घेतला. त्यानंतर दुपारी १ ते सायंकाळी ७ पर्यंत 'पाठीचा कणा आणि आधुनिक शस्त्रक्रिया' या विषयावर व्याख्यान झाले. या सोहळ्यात डॉ. रामाणींच्या 'ताठ कणा' आत्मचरित्रावर आधारित चित्रपटाचा प्रोमो दाखविण्यात आला. तसेच, त्यांचे ५८ वे पुस्तक 'केसबुक' याचेही प्रकाशन पार पडले. यावेळी डॉ. रामाणी यांना त्यांचे संगमरवरी अर्धशिल्प भेट म्हणून देण्यात आले. बॉलीवूड नृत्यांगना मेघा संपत दिग्दर्शित भारतीय नृत्य सांस्कृतिक कार्यक्रमाने सर्वांचे मनोरंजन केले. संगीतकार ॲलेयशिअस यांनी संगीतबद्ध केलेले डॉ. रामाणीच्या जीवनावर आधारित गाणे रॉकस्टार सिद्धार्थ आणि रोझ यांनी सादर केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे रामकृष्ण ढवळीकर, कॅबिनेट मंत्री सार्वजनिक बांधकाम विभाग गोवा यांच्या हस्ते डॉ. रामाणी यांचा सत्कार करण्यात आला.

# मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या वतीने घेण्यात आलेल्या बैठकीतील चर्चा



मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या वतीने 'वाचक जागर' या उद्दिष्टासाठी मराठीतील ज्येष्ठ प्रकाशक आणि पदाधिकारी यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. ही बैठक मंगळवार दिनांक २२ मे २०१८ रोजी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, नायगाव, दादर येथे सकाळी ११ ते २ या वेळात पार पडली. या बैठकीस ग्रंथालयाचे पदाधिकारी, वाचक, प्रकाशक आणि लेखक आदींचा सहभाग होता.

प्रारंभी विश्वास मोकाशी यांनी बैठकीच्या आयोजनामागचा हेतू स्पष्ट केला.

**विश्वास मोकाशी :** मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या ४४ शाखा असून त्यापैकी ३२ शाखा कार्यरत आहेत. त्या शाखांमध्ये १४,००० वाचक असून या संख्येत वाढ होणे गरजेचे आहे. त्यासाठी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय प्रकाशकांकरता काय करू शकते आणि प्रकाशकांना ग्रंथालयाकडून काय अपेक्षित आहे याची चर्चा व्हावी. ग्रंथालयाकडे साधारण साडेसहा लाख ग्रंथ आहेत आणि त्यांना वाचकांपर्यंत कसे पोहचवावे या दृष्टीने चर्चा व्हावी.

**शीतल करदेकर :** प्रकाशकांनी आपल्या ग्रंथाच्या काही प्रती ग्रंथालयाला भेट स्वरुपात द्याव्यात, ज्यामुळे वाचकांपर्यंत पुस्तके पोहोचतील. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून वाचक येथे येत असतात. म्हणून इथे ग्रंथ असले तर ते लोकांपर्यंत पोहोचतील. तसेच 'लेखक आपल्या भेटीला' 'प्रकाशक आपल्या भेटीला' असे काही उपक्रम ग्रंथालयात राबवले असता त्याचा चांगलाच उपयोग होईल. अशा उपक्रमांमुळे माणसे ग्रंथालयाशी अधिक जोडली जातील. वाचकांना प्रत्यक्ष लेखक आणि प्रकाशकांशी संवाद साधता येईल आणि चर्चाही करता येईल.

**लता गुठे :** ग्रंथविक्री ही एक समस्या आहे आणि त्यावर आपण काय करू शकतो कारण कितीही दर्जेदार पुस्तके असली तरीही त्याची विक्री तशी होत नाही आणि त्यातील एक कारण म्हणजे भेट स्वरुपात दिली जाणारी पुस्तके. पुस्तकाची विक्री जास्तीत जास्त कशी होईल हे प्रकाशक तसेच ग्रंथालय यांनी सुचवले पाहिजे.

**विकास परांजपे :** वाचन संस्कृती मुळात काय आहे हे समजून घेतले पाहिजे. वाचन, ग्रंथव्यवहार, ग्रंथविक्री, एखाद्या ग्रंथालयातील किंवा प्रकाशाकाकडील पुस्तके कशी विकली जातील हा विषयच वेगळा आहे. याला वाचन संस्कृती म्हणता येणार नाही. आपल्याला वाचन संस्कृती वाढवायची असेल तर आपल्याला ग्रंथालयाच्या परिसरात अनेकविध कार्यक्रम राबवता येतील त्यासाठी अभिवाचनाचे कार्यक्रम घेता येतील. 'वाचक जागर' कार्यक्रम घेता येईल. लोकांना आवड असलेल्या विषयांची पुस्तके ग्रंथालयात असणे आवश्यक आहे. आताची पिढी कथा, ललित, कादंबरी वाचत नाही तर चरित्र, स्वास्थसंबंधित, अध्यात्म आणि इतर असेही वाचन लोक आवडीने करतात आणि अशा काही पुस्तकांनी प्रकाशकांना आर्थिक स्थैर्य मिळते. कथा, कादंबरीमधील आवड निर्माण करणारे कार्यक्रम राबवावेत. त्यातील आनंद जोवर लोकांना कळणार नाही तोवर त्यांना पुस्तकांची आवड निर्माण होणार नाही. तसेच पालकांना वाचनासंबंधी जागृत करण्यात यावे.

**सुदेश हिंगलासपूरकर :** प्रकाशकांनी गेली ४० वर्ष ग्रंथविक्री आणि व्यवहार ह्या दृष्टीने विचार केला आहे. ग्रंथवाचक कसे निर्माण होतील याचा प्रयत्न कुणीही केला नाही, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही म्हणून ह्या कार्यक्रमाच्या माध्यमातून वाचकवर्ग कसा वाढवता येईल याकडे आपण विशेष लक्ष देऊन ती संख्या वाढवण्याचा विचार करायला हवा. त्यासाठी ग्रंथप्रदर्शन, चर्चा व अभिवाचन कार्यक्रम व्हावे आणि त्यासाठी आपल्याकडे संधी सुद्धा उपलब्ध आहे. ह्या जागेचा वापर अनेक उपक्रमांसाठी करू शकतो. हे कार्यक्रम सातत्याने सुरू राहिल्यास वाचकांचा प्रतिसाद वाढेल. तसेच ग्रंथांची जाहिरात होणेही गरजेचे आहे. यासाठी 'ग्रंथाली'च्या 'शब्द रुची' अंकात दोन पाने प्रसिद्धीसाठी देत आहोत.

**माधव शिरवळकर :** OCR या तंत्राचा वापर करण्यात यावा. याचा वापर करून वाचक वर्गाला यात ओढून घेऊ शकतो. त्याच बरोबर किंडल साधनांचा वापर करून पुस्तके असावीत, ज्यामुळे वाचक आकर्षित होतील. तसेच ई-बुक यंत्रणेचा प्रकाशनात समावेश

करण्यात यावा. पुस्तकविक्रीसाठी उपलब्ध संकेतस्थळांचा वापर करण्यात यावा.

**संतोष बाईंग :** पत्रकार लेखन संमेलन भरवावे, विविध वयोगटासाठी स्वतंत्र ग्रंथप्रदर्शन असावे व त्यात प्रकाशकांचा सहभाग असावा. त्यात साहित्य वाचनाचा एक भाग घेण्यात यावा.

**अस्मिता मोहिते :**पूर्वापार असे होते की, विद्यार्थी पुस्तकांचे नाव सांगत व त्यांना ती पुस्तके आणून दिली जात. वाचकास पुस्तकांपर्यंत जाण्याची मुभा असावी. त्याने स्वतः निवडलेल्या पुस्तकाचे तो आवडीने वाचन करील आणि त्याची रुची वाढेल आणि त्यामुळे विद्यार्थी कायमस्वरूपी ग्रंथालयाशी जोडला जाऊ शकतो.

वाचकाला हवा असलेला मुद्दा किंवा वाचकांस हवा असल्यास त्यांना त्याची झेरोक्स प्रत मिळण्याची सोय ग्रंथालयातच असावी. त्यासाठी एखादी रक्कम आकारली गेली तरी चालेल.

ग्रंथालयाकडून वाचकांसाठी उपयुक्त साधने उपलब्ध करून देण्यात यावी. दरमहा वेगवेगळ्या प्रकाशनांकडून एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे. पुस्तकांसंबंधी आलेल्या प्रतिक्रिया त्या पुस्तकाशी जोडल्यामुळे वाचकाची तो ग्रंथ वाचण्याची चिकित्सा वाढेल. प्रकाशनाकडून त्यांची नियतकालिके पाठवण्यात यावीत.

**हेमंत जोशी :** वाचकांकरता झेरॉक्सची सेवा आजही संदर्भ विभागाकडून देण्यात येते. त्यासाठी लेखी अर्ज व छायांकित प्रत का हवी आहे, याचा उल्लेख असणे आवश्यक आहे. त्यानंतर या अर्जाची वैधता लक्षात घेऊन निर्णय घेण्यात येतो.

**अमोल नाले :** लेखक, वाचक, प्रकाशक आणि ग्रंथालय यांनी एकत्र येऊन ग्रंथ चळवळीत सहभागी व्हावे व आतापर्यंत झालेल्या सूचनेप्रमाणे आगामी काळात असे कार्यक्रम व्हावेत. त्यासाठी हवी असलेली मदत आम्ही करू.

**दत्ता बाळसराफ** यांनी संपूर्ण बैठकीचे समालोचन करून वर्षभराचे उपक्रम उपस्थितांना अवगत करून दिले. त्यांनी संशोधक परिषद, मराठी वाङ्मय मंडळ बैठक, वाचक परिषद, अधिकारी साहित्यसंमेलन, मराठीतील रहस्य कथा, बाल झुंबड, म हाविद्यालयीन नियतकालिके, दिवाळी अंक, पत्रकारांचे संमेलन. महाराष्ट्रातील वाचकांचे सर्वेक्षण याबाबत माहिती दिली.

बैठकीच्या शेवटी झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार आणि ठरलेल्या कार्यक्रमानुसार सहा महिन्यांचा आढावा घेऊ, वाचकांचा प्रतिसाद बघून एखादी परिषद घेण्यात येईल. 'वाचक जागर' या नावाने प्रत्येक महिन्यात एक याप्रमाणे कार्यक्रम आयोजित करावेत. त्यसाठी एक 'ग्रुप' तयार करावा. त्यांनी आयोजनाची जबाबदारी पार पाडावी.

विश्वास मोकाशी यांनी मा. सुप्रिया सुळे, मा. प्रताप आसबे, सर्व उपस्थित प्रकाशक व मान्यवरांचे आभार मानले.

**या बैठकीस मा. सुप्रिया सुळे, मा. प्रताप आसबे यांच्यासह पुढील साहित्यप्रेमींची उपस्थिती लाभली.**

रवींद्र मोहोड, धनश्री धारप, सुदेश हिंगलासपूरकर, संतोष बाईंग, श्रीधर ठोंबरे, सुरेंद्र शिंदे, विकास परांजपे, विवेक मेहेत्रे, अमोल नाले, अरविंद जोशी, अस्मिता मोहिते, डॉ. सुनील सावंत, विश्वनाथ खंदारे, चंद्रकांत माळगावे, मुकुंद कर्णिक, मिलिंद चोडगे, कन्हैया क्षेमकल्याणी, युवराज भट्ट, विद्या फडके, अरुण म्हात्रे, कदम सोनसुरकर, लता गुठे, दत्ता बाळसराफ, सुरेश पाटील, विश्वास मोकाशी, बबन झरेकर, हेमंत जोशी, दुर्गाप्रसाद खांडाळेकर, सूर्यकांत गायकवाड, अरविंद तांबोळी, प्रताप आसबे, सुरेंद्र करंबे, ॲड. योगेश गायकवाड, डॉ. कृष्णा नाईक, शीतल करदेकर, प्रदीप कर्णिक.

**सुरुल ट्रॅव्हल्स टूरिझम, कल्याण**

**आनंदवन , रामदेगी आणि ताडोबा भटकंती / तारीख १५, १६, १७ जुन २०१८**

**आणि**



## 'गझलगाथा'

गेल्या वर्षी रत्नागिरी एक्सप्रेस या रत्नागिरीतील वृत्तपत्राने आपला मराठी गझल विशेषांक म्हणून 'रत्नागिरी एक्सप्रेस' दिवाळी अंक प्रसिद्ध केला.

कालच्या नि आजच्या जुन्या-नव्या अशा जवळपास १२० कवींच्या गझला यात प्रकाशित करण्यात आल्या. शिवाय गझलविषयीचे लेख, टिपणे, नोंदी असाही उपयुक्त मजकूर या अंकात आहे. प्रत्येक गझलकाराच्या प्रत्येकी ३ ते ४ गझलांचा अंकात समावेश करण्यात आला आहे. महाराष्ट्रातल्या कानाकोपऱ्यातले गझलकार या अंकात एकत्र आले आहेत.

या विशेषाकांचे संदर्भमूल्य लक्षात घेऊन त्यांचे ग्रंथात रूपांतर करण्याचा निर्णय घेण्यात आला. चारशेपेक्षा अधिक पानांचा हा बृहद् गझलग्रंथ 'ग्रंथाली' प्रकाशनाने अत्यंत सुबक असा छापून दिला. गझलगाथा या नावाने तो आता रसिकांसमोर येत आहे.

नमिता कीर व रमेश कीर यांच्या उत्साहाने व पुढाकारानेच या गझलगाथा ग्रंथाचा प्रकाशन सोहळा गेल्या १३ मे रोजी रत्नागिरीत पार पडला. कवी अशोक नायगावकर यांच्या अध्यक्षीय उपस्थितीत बुजुर्ग पत्रकार मधुकर भावे, अरुणोदय भाटकर आणि नमिता व रमेश कीर यांच्यासोबत या ग्रंथाचे प्रकाशन झाले. रत्नागिरीतले पहिले गझलकार देवीदास पाटील यांना अशोक नायगावकर यांच्या हस्ते 'गझलगाथा'ची पहिली प्रत प्रदान करण्यात आली.

या प्रकाशनानंतर एक गझल मैफलही सादर करण्यात आली. या गझल मैफलीला रत्नागिरीकर रसिकांनी खूप उत्साही, भरभरून दाद दिली. गोविंद नाईक, वैभव देशमुख, कैलास गांधी, वैशाली शेंबेकर-मोडक, क्षितिजा आरती व चंद्रशेखर सानेकर या कवी-कवयित्रींनी या मैफलीत भाग घेतला होता. गोविंद नाईक व सानेकरांनी तर आपली एकेक मालवणी गझलही सादर केली.

कीर प्रकाशन, कोकण मराठी साहित्य परिषद व ग्रंथाली यांच्या सहकार्याने हा सोहळा गोगटे-जोगळेकर महाविद्यालयाच्या सभागृहात सपन्न झाला.

रत्नागिरी एक्सप्रेसचा 'दिवाळी गझल विशेषांक' व त्या अंकाचे नंतर 'गझलगाथा' या ग्रंथात रूपांतर अशा दोहोच्या संपादनाची जबाबदारी मराठी गझलचे एकमेव मर्मज्ञ जाणकार अरुणोदय भाटकर यांनी अत्यंत यशस्वीपणे पार पाडली. रत्नागिरीत गझल चळवळ रुजवण्याच्या नमिता कीर यांच्या प्रयत्नातून हे सर्व उपक्रम साकार झाले.

---

## भटक्या विमुक्तांच्या वेदनांची जीवनगाथा : विलास माने यांची 'कत्ती'

'कत्ती' ही केवळ विलास माने यांची आत्मकथा नसून भटक्या-विमुक्तांच्या वेदनांची व प्रश्नांची जीवनगाथा आहे. भटक्या-विमुक्त चळवळीचा अनमोल ठेवा असणारी 'कत्ती' साहित्यसंस्कृतीतील वास्तव जीवनावर आधारित अत्यंत विद्रोही व संवेदनशील आत्मकथा असल्याचे प्रतिपादन अखिल भारतीय साहित्यसंमेलनाचे माजी अध्यक्ष प्रा.डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.

भटक्या-विमुक्त व दलित चळवळीतील कार्यकर्ते विलास माने लिखित 'कत्ती' या 'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेल्या आत्मकथनाच्या लातूर येथे आयोजित प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी 'उपरा'कार लक्ष्मण माने होते. व्यासपीठावर ज्येष्ठ विचारवंत डॉ. जे. एम. वाघमारे, माजी आ. कॉ. माणिक जाधव, प्रा. श्रीपाल सबनीस, प्राचार्य नागोराव कुंभार, प्राचार्य मधुकर सलगरे, प्रा. फ.म. शहाजिंदे, प्रा. भगवान इंगळे, लेखक विलास माने, 'ग्रंथाली'चे सुदेश हिंगलासपूरकर, धनश्री धारप यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. श्रीपाल सबनीस म्हणाले, ''प्रबोधनाची व क्रांतीची सूत्रे पेरणारी ही आत्मकथा वास्तव घटनांवर आधारित आहे. भटक्या-विमुक्तांच्या जीवनातील विदारक सत्य व त्यांचे प्रश्न कत्तीच्या पानापानांतून दिसून येतात. समाजातील अंधश्रद्धा, जातिव्यवस्था, स्त्री-पुरुष असमानता, सामाजिक, आर्थिक व राजकीय विषमता यांवर मात करण्यासाठी विवेकवादी व्यक्तींनी एकत्र काम करणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले.

यावेळी बोलताना डॉ. जे.एम. वाघमारे म्हणाले, ''आज ग्लोबलायझेशनमुळे भांडवलशाही व्यवस्था अधिक बळकट होते. ही व्यवस्था उलथवून टाकण्यासाठी परिवर्तनवादी कार्यकर्त्यांनी संघर्ष करणे आवश्यक आहे. त्याशिवाय समाजातील तळागाळातील व्यक्तींपर्यंत खरे स्वातंत्र्य पोहोचणार नाही. 'कत्ती' ही आत्मकथा नव्हे तर यातनाकथा आहे. यात विद्रोह व मानवजातीचे दुःख आहे. ही आत्मकथा समाजाला अंतर्मुख करायला लावणारी आहे.''

'उपरा'कार लक्ष्मण माने म्हणाले, ''भटक्या-विमुक्तांना अद्यापही स्वातंत्र्य मिळाले नाही. स्वातंत्र्याचे नेमके काय झाले हा सवाल स्वातंत्र्याच्या ६० वर्षांनंतरही उपस्थित केला जात आहे. भटक्या-विमुक्तांचे प्रश्न अद्यापही सुटले नाहीत. जातीयवादी व्यवस्था आणि भांडवलशाहीने शैक्षणिक क्षेत्र काबीज केल्याने सर्वसामान्यांना शिक्षण मिळणे अवघड झाले आहे. त्यामुळे मूलभूत हक्क आणि अधिकारापासून वंचित असलेल्या भटक्या-विमुक्तांची भटकंती अद्यापही थांबलेली नाही.''


कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुदेश हिंगलासपूरकर यांनी केले. सूत्रसंचालन सतीश हानेगावे यांनी केले तर आभारप्रदर्शन श्रीशैल बिराजदार यांनी केले.

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**कारवारी माती**
**वसंत नरहर फेणे**




**माती, माणसे आणि काळ**

'खरोखरीची विरक्ती ज्याला येते त्यानं संन्यास स्वीकारणे, हे त्याचे कर्तव्यच! संसारात पराभूत झालेल्यांसाठी संन्यास ही सन्माननीय पळवाट! या दोन्ही गोष्टी स्वतःला लागू पडत नाहीत, हे गणा जाणत होता. त्यामुळे ज्यात आपला जीव नाही, त्या आताच्या संतपणाच्या सोंगात आपण अधिक काळ रमाणार नाही, हे तो जाणत होता. लौकिक जगातच नाव कमवावं, इतरांपेक्षा श्रेष्ठ ठरावं, ही त्याच्या जिवाची आस!'

आकाराने प्रचंड म्हणावी अशी ही कादंबरी ६२० पृष्ठांची आणि तिचा कालखंड आहे सत्तेचाळीस वर्षांचा, म्हणजे १९०१ ते १९४७ च्या स्वातंत्र्यदिनापर्यंतचा. यातील प्रमुख व्यक्तिरेखा आहेत गणा, त्याची पत्नी गंगाबाय, मुलगी मथी आणि मुलगा विद्याधर. गणा त्याकाळचा व्ह.फा. आपण इतरांहून काही वेगळे करून नाव कमवावे ही ओढ. स्वाभिमानी. त्यापायी त्याचा सततचा प्रवास. शिक्षक, शेतकरी, हरदास, वैद्य. घरदार सोडल्याने मागे गंगाबायची परवड. ती धीराने उभी राहते. कुटुंब सांभाळते. मुलगी मथीचे लग्न तिच्या वडिलांसमान बिजवराशी होते. पार्वतीबाय म्हणून तिचा संसार सुरू होतो. तो मध्येच खुंटतो पण आयुष्य आणि जबाबदाऱ्या कायम आहेत. विद्याधर हुशार, एकपाठी. त्यालाही शिकून वेगळे काही करून नाव कमवायचे आहे. अशा चार व्यक्तिरेखा या कादंबरीचा सगळा तोल सांभाळतात. त्यांच्या जोडीला इतर अनेक व्यक्तिरेखा आहेत. गंगाबायचा भाऊ गजा, पार्वती झालेल्या मथीची काशा, दुर्गा ही सावत्र मुले. तिचा स्वतःचा दिगंबर. शिवाय गणाच्या आयुष्यात येणारी लक्ष्मी. या सगळ्यांचा वावर हिचकड, होन्नेकरी, धारवाड, अर्वशा, मुंबई, कलकत्ता, विलायत येथे आहे. त्यांच्या आयुष्याच्या दिशा त्यांच्या-त्यांच्या ध्येयानुसार ठरतात, काही परिस्थितीला सामोरी जातात तर काही भिरभिरत राहतात.

वसंत नरहर फेणे आपणास परिचित आहेत ते एक कसदार लेखक म्हणून. जवळपास तीस पुस्तकांची संपदा त्यांच्या नावावर आहे. 'कारवारी माती' ही त्यांची शेवटची कादंबरी. वयाच्या ९२ व्या वर्षी प्रकाशित झालेली. विशेष म्हणजे या कादंबरीच्या प्रकाशनाला, तिच्यावर झालेल्या चर्चासत्राला उपस्थित राहून त्यांनी या कादंबरीमागील प्रेरणा, कालखंड, तिच्याशी असलेले नाते स्वतः व्यक्त केले होते. योगायोग असा 'सेंट्रल बसस्थानक' ही पहिली कादंबरी प्रकाशित करण्याचा मान 'ग्रंथाली'कडे गेला तसा त्यांची 'कारवारची माती' ही शेवटची कादंबरी प्रकाशित करण्याचा मान 'ग्रंथाली'कडेच आहे. आजही आपल्या स्मरणात त्यांची पहिली कादंबरी, 'सेंट्रल बसस्थानक' आहे. स्मरणात राहण्याचे कारण विषयातले वेगळेपण, विषयाकडे पाहण्याची वेगळी दृष्टी, कथानकाला बांधीव स्वरूपात आकार देण्याची शैली, व्यक्तिरेखांची वैशिष्ट्ये ठाशीवपणे रेखाटण्यातले कसब आणि सतत काळाचे राखलेले भान. हे गुण केवळ 'सेंट्रल बसस्थानक'पुरते मर्यादित आहे असे नव्हे, तर त्यांच्या एकूण सर्वच साहित्यातून ते प्रत्ययाला येतात. 'कारवारी माती' ही या सगळ्या गुणांनी संपन्न असलेली कादंबरी म्हणता येईल. लेखनात महत्त्व असते ते कथानकाची गुंफण कशी केली याला. त्यादृष्टीनेही ही कादंबरी श्रेष्ठ ठरते. गणा घर सोडतो त्याचे कारण भूक. घरात शिजवायला अन्नच नाही असे पत्नी गंगाबाय त्याला सांगते. ही घटना कादंबरीच्या सुरुवातीला येते आणि कादंबरीच्या अखेरीस विद्याधर, गणाचा मुलगा घर सोडतो, त्यालाही कारण भूक असते. विद्याधरचा हा घर सोडण्याचा प्रसंग वाचताना वाचक थेट गणाच्या प्रसंगाशी येऊन-येऊन थांबतो. लेखकाचा कसदारपणा हा त्याच्या चिंतन, ध्यासातून व्यक्त होतो. त्याचीही उदाहरणे आपणास जागोजागी प्रत्ययास येतात. उदा. 'बाई गं, तू धीर सोडायचा नाही. पुरुष चेवानं पराक्रम करतोही आणि अपेशानं खचतोही, पण धीर सोडते ती बाईच नाही.' 'जात ही एकच गोष्ट या समाजात आहे, जी अनेक अंगांनी अनेक प्रकारे एकाचवेळी कार्यरत असते.'

ही कादंबरी इतिहासाचा मागोवा घेते. समकालीन होत असलेल्या घटनांचा उल्लेख करते. ब्रिटिशांची सत्ता आणि तिच्या विरोधात उभी राहिलेली चळवळ दाखवताना मोजक्याच घटनांचा उल्लेख केलेला आहे परंतु त्या सनावळीसह दिलेल्या आहेत. यात बंगालच्या फाळणीपासून ते स्वातंत्र्यापर्यंतच्या घटना आहेत. गांधी, टिळक, जीना, डांगे, वसंतदादा पाटील, काँग्रेस, कम्युनिस्ट, भूमिगत चळवळ आणि या सगळ्याकडे तिऱ्हाईतासारखे पाहत लाभ उठवणारी मंडळी रेखाटलेली आहेत.

फेणे हे लेखनावर निष्ठा असलेले असे एक लेखक. वाचकाला कथानकाशी खिळवून ठेवण्याची ताकद असलेले लेखक. त्यांची ही कांदबरी म्हणजे त्यांच्या आजवरच्या लेखनातली सर्वात उजवी अशी ही वृत्ती म्हणावी लागेल. आपल्या मातीची, मातीतल्या माणसांची, समाजभानाची, स्वातंत्र्याची पार्श्वभूमी लाभलेली, तो काळ प्रादेशिकतेसह नजरेसमोर साकार करणारी, वाचण्याचा समग्र आनंद देणारी ही कादंबरी आहे.

या पुस्तकाचे मुखपृठ सजवले आहे चित्रकार मनोज आचार्य यांनी. या पुस्तकातील लेखनाचा काळ, कारवार – धारवाड भागाची पार्श्वभूमी, त्याकाळाचे राहणीमान, घरे यांची ओळख आणि कथानक ज्या व्यक्तित्वाभोवती गुंफलेले आहे त्याची प्रतिकृती मुखपृष्ठावर छानपणे साकारलेली आहे. मातीचा लालसरपणा आणि त्यावर कृष्णधवल रंगातली विरक्त व्यक्ती हा समन्वय खिळवून ठेवणारा आहे.

**मूल्य ६०० रुपये सवलतीत ४०० रुपये**

# ग्रंथपान

**नोबेल साहित्यिक**
**संजीवनी खेर**




## ज्ञानाचा 'नोबेल' कुंभ

''तसं पाहिलं तर नोबेल मिळालेल्या प्रतिभावंतांची प्रतिभा समजून, त्या-त्या काळातील, त्या त्या देशांतील समाजमनाचा कानोसा घेताना आपल्या जाणिवांना बंद खिडक्यांप्रमाणे खाडखाड धक्के देऊन उघडत जातं. स्थल, काल, संस्कृती यांचे भेद भाषांतरित वाङ्मयातून आपल्यापर्यंत पोहोचून आपल्याला आनंद देतात. खऱ्या अर्थाने विश्वमानवाची स्पंदनं आपल्याला जाणवतात. अशा साहित्यिकांच्या लेखनातून निखळ नग्न मानवी जीवन आपण अनुभवू शकतो.''

आल्फ्रेड नोबेल यांच्या नावे देण्यात येणारा साहित्याचा नोबेल पुरस्कार हा नेहमीच औत्सुक्याचा आणि अभिमानाचा विषय असतो. १९०१ पासून म्हणजे ११७ वर्षांची परंपरा असलेला जगातील सर्वोच्च आणि श्रेष्ठ असा हा सन्माननीय पुरस्कार आहे. हा पुरस्कार मिळणे म्हणजे साहित्य आणि साहित्यिक यांची जागतिक पातळीवर दखल घेतली जाणे, त्यांचा सन्मान केला जाणे, यासारखा दुसरा सन्मान तो काय! हा सन्मान साहित्याचा असतो तसा त्याच्या लेखकाचा असतो. खरे तर इतकाच मर्यादित हा सन्मान राहत नाही, तो त्याच्या देशाचा, खंडाचा सन्मान ठरतो. लेखिकेने नमूद केल्याप्रमाणे तेथील लोक, संस्कृती, जनजीवन यांचा सन्मान असतो. हा सन्मान काही वेगळाच आनंद अभिमानासोबत घेऊन येतो. अशा जागतिक पातळीवर दखल घेतेलेल्या साहित्याविषयी रसिक, वाचक-अभ्यासकांच्या मनात नेहमीच कुतूहल असते, वाचनाची तीव्र इच्छा अनावर होते. साहित्यकृतीसोबत त्या लेखकाविषयीची माहिती मिळविण्याचे कुतूहल त्यातूनच येते. हे कुतूहल काही प्रमाणात शांत व्हावे, असे निवडक सव्वीस साहित्याचे नोबेल पुरस्कारप्राप्त साहित्यिक'नोबेल साहित्यिक' या पुस्तकात आहेत.

रवींद्रनाथ टागोर यांना साहित्याचे नोबेल मिळाले ते १९१३ साली. रवींद्रनाथ हे एकमेव भारतीय आहेत ज्यांना 'गीतांजली' या महाकाव्यासाठी साहित्याचे नोबेल मिळाले. त्यांचे साहित्य हे तत्त्वज्ञान, सौंदर्याच्या कोमल भावना आणि काव्यातील प्रासादिकता यांचा सुंदर संगम आहे, या लेखांत रवींद्रनाथ आणि त्यांचे साहित्य, इतकाच तपशील येत नाही, तर त्यांचे समकालीन लेखक, राजकारणी, त्यावेळचे सामाजिक, राजकीय वातावरण, जगाचा भारताकडे पाहण्याचा दृष्टिकोन, शांतिनिकेतन, यांवरही लेखिकेने प्रकाश टाकलेला आहे. रूडयार्ड किपलिंग हे तर मुंबईत जन्मलेले ब्रिटिश लेखक. त्यांना १९०७ साली हा सन्मान मिळाला. त्यांच्या लेखनातून भारतीय मातीचा सुगंध येतो असे म्हटले गेले. त्यांच्याविषयी लेखिका लिहितात, 'आपल्या भारतीय चेहऱ्याच्या लेखनानं इंग्लिश साम्राज्य जवळ आणलं असं म्हटलं जातं. सुवेझ कालव्यानंही भारत इंग्लंडच्या जितका जवळ गेल नव्हता, तितका रुडयार्ड किपलिंगच्या लेखनानं जवळ गेला.' विद्याधर नायपॉल हे आणखी एक पुरस्कार प्राप्त लेखक, ज्यांची नाळ भारताशी जोडली गेलेली आहे. यांना हा सन्मान २००१ साली प्राप्त झाला. माणसाच्या अथांग महासमुद्रात व्यक्तींचा अस्तित्वासाठी चाललेला संघर्ष लेखनाला प्रवृत्त करतो, असे सांगणारे चिनी लेखक गॅओ झिंगजिॲन; शब्दासोबत शिल्प व चित्रांतून व्यक्त होणारे आणि भारत हा पांगुळगाड्यावर उभा असलेला शक्तिशाली देश आहे असे सांगणारे गुंथर ग्रास; 'ग्लास बीड्स गेम' आणि 'सिद्धार्थ'चे लेखक हरमन हेस; असे जागतिक पातळीवर मान्यता मिळालेले सव्वीस साहित्यिक या पुस्तकात आहेत.

'नोबेल साहित्यिक' हा लेखसंग्रह आहे. या पुरस्काराविषयीचे कुतूहल वाचकांच्या मनात नेहमीच असते हे लक्षात घेऊन त्याची माहिती लेखिकेने मनोगतात करून दिलेली आहे. लेखकाच्या कोणत्या साहित्यकृतीने या पुरस्कारासाठी निवड समितीवर प्रभाव टाकला, त्याच्या कोणत्या साहित्यकृतींनी वाचकांवर प्रभाव टाकलेला, त्याची अन्य दखल घ्यावी अशी कोणती साहित्यसंपदा आहे, त्यांची वैशिष्ट्ये, विषय कोणते आहेत, या विषयी लेखिकेने दिलेले तपशील त्यांच्या संशोधनातल्या बारकाव्यांची साक्ष देणारे ठरतात. वाचकांना वाचनाची आवड असते. उत्तम वाचण्याकडे त्यांचा नेहमीच कल असतो, परंतु अडचण असते ती नेमक्या संदर्भांची. त्यांची माहिती सहजपणे मिळते, असे कधी होत नाही. ती सोय या पुस्तकाने करून दिलेली आहे. नोबेलप्राप्त साहित्यिकांचे साहित्य ही तर वाचकासाठी पर्वणीच. त्यादृष्टीने वाचकांच्या हाती हा सदर्भ ग्रंथ मिळाला असे म्हणता येईल. लेखक आणि त्याच्या निवडक पुस्तकांचे फोटो पुस्तकाच्या मांडणीत भर घालतात तसे वाचकांना पुस्तक निवडीसाठी मदत करण्यात उपयुक्त ठरतील, असे आहेत. प्रत्येक लेखाच्या शेवटी त्या साहित्यिकाच्या साहित्याची यादी देखील मुद्दाम दिलेली आहे. लेखिकेने संपादक, पत्रकार, लघुपटकार, टीव्ही कार्यक्रम संचालक अशा वेगवेगळ्या भूमिकेतून लेखन केलेले आहे. कादंबरी, लेखसंग्रह, इतिहास, अनुवाद अशी मिळून प्रकाशित झालेल्या एकवीस पुस्तकांची संपदा त्यांच्या नावावर आहे. विषयातला नेमकेपणा हा विशेष गुण या लेखनात दिसून येतो. मोजक्या शब्दात आशयाला न्याय देण्यामुळे लेखांचा आटोपशीरपणा लक्षात घेऊनही खूप काही वाचकाच्या हाती शक्य झाले आहे. भाषेतला गोडवाही सहजपणे भावणारा आहे. साहित्यिक निवडण्यात डावेउजवे असे नाही, तरी भारताशी, आशियाशी नाते असलेल्यांची नोंद विशेषत्वाने जाणवते. खरे तर सगळ्याच नोबेलप्राप्त लेखकांचा परिचय करून देण्याचा उपक्रम लेखिकेने हाती घ्यायला हवा. वाचक त्याचे उत्स्फूर्त स्वागत करतील.

या पुस्तकाचे समर्पक मुखपृष्ठ सजवले आहे चित्रकार सतीश खानविलकर यांनी. पुस्तकांनी भरलेला कुंभ त्यांनी मुखपृष्ठावर साकारलेला आहे. ज्ञानामृताचा काठोकाठ भरलेला कुंभ आहे, असेच त्याच्याकडे पाहून वाटत राहते. आणि त्यावर नोबेलची प्रतिकृती भासावी असे शीर्षक याजलेले आहे. अतिशय तरल अशी ही कल्पना आहे.

**मूल्य २५० रुपये सवलतीत १५० रुपये**




# ग्रंथपान

**परीघ**

**सचिन जगदाळे**




**पत्रकाराची शोधपत्रकारिता**

'दादासाहेब! या सोडून देण्याच्या स्वभावामुळे तुम्ही सुखच सोडून दिलंय, असं नाही वाटत तुम्हाला? आपण एका परिघावर उभे आहोत. फिरून परत त्याच जागेवर यायचंय. तुम्ही कितीही टाळलं तरी आपला सामना होतंच राहणार. यातून सुटका नाही. हा कोश तुमहीच स्वतःभोवती गुंफून घेतलाय. तो आत्ताच तोडा, नाहीतर आणखी गुरफटत जाल. इतकं की नतंर यातून पूर्ण शरीराने बाहेर पडणं अवघड होऊन जाईल. एक एक अवयव वेगळा करून बाहेर काढावं लागेल. मन, बुद्धी ...सगळं भ्रमिष्ट होऊन जाईल. चांगला वाईटातला तुम्हाला अजूनही कळत असलेला फरक हळूहळू कळणं बंद होऊन जाईल.'

सचिन जगदाळे यांची 'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेली 'परीघ' ही दुसरी कादंबरी आहे. परीघ हा काही माणसे स्वतः निर्माण करतात, कोशासारखा. त्या कोशाला ते आपले जग समजतात. काही जण या भ्रमात राहतात, आपल्याभोवती हे सुरक्षेचे कवच आहे. त्याच्या आत आपली सत्ता आहे, तिला कुणी हात लावू शकणार नाही. काहींना त्या कोशात ओढले जाते, काहींना या कोशाच्या फसवेपणाची कल्पनाच येत नाही. येते तेव्हा फार उशीर झालेला असतो. एका अर्थाने हा परीघ म्हणजे जाळे असते आकर्षक वाटावे असे, कधीतरी त्यात आपलाच बळी जाईल याची कल्पना नसलेले. जगदाळे यांनी अशाच एका परिघात असलेल्या वास्तवाचे चिवट धागे अलगदपणे वेगवेगळे करून दाखवण्याचा प्रयत्न केलेला आहे. नव्हे एक परीघ भेदण्याचा प्रयत्नकेलेला आहे, भूमितीतील प्रमेय सोडवावे तसा.

ही एक गूढकथा आहे. जुन्नर तालुक्यातील वडगाव येथे गौरा लामखेडे आणि रूपाली विधाते या ऊस तोडणी कामगारांच्या मुलींचं हत्याकांड, हे या कथेचे आशयसूत्र आहे. याचा उलगडा करण्याच्या जबाबदारी पत्रकार अनिरुद्ध याच्याकडे आहे. त्यासाठी तो शहरातून या वडगावला येतो. तिथे मुक्कामाला राहतो. आणि तपासाच्या दिशेने पावले उचलतो. ग्रामीण भाग असल्याने तिथला बागायईतदार दादासाहेब, त्यांचा मगरूर आणि प्रतापी मुलगा प्रतापराव, सुशिक्षित, प्रेमळ मुलगी सुमन, प्रतापचा पाठीराखा आणि सतत त्याच्यासोबत सावलीसारखा राहणारा पहिलवान आप्पा, या यातल्या प्रमुख व्यक्तिरेखा आहेत. पालावरची अनेक कष्टकरी माणसं आहेत, जी सतत दहशतीच्या वातावरणात वावरताना दिसतात. त्यातली एक वेगळी व्यक्तिरेखा आहे सरू. जीवावर उदार होणे म्हणजे काय, याची महती सांगणारी सरू. अनिरुद्ध हा खुनाचा तपास करायला आलेला दुसरा पत्रकार आहे. अगोदरचा पत्रकार याच उद्देशाने आला होता आणि हाती काही लागण्यपूर्वी गौरा व रूपाली यांच्या मार्गानेच निघून गेला होता. अनिरुद्धसाठी देखील हाच मार्ग वाट पाहत त्याच्यासमोर उभा असतो. आपल्या उद्दिष्टापर्यंत पोहोचताना या मार्गाला कसे भेदायचे हे आव्हान अनिरुद्ध समोर सदैव आहे. यातच सुमन त्याच्यावर आपली प्रीती दाखवते. प्रतापराव आणि आप्पा हे त्याला आपल्या मार्गातला काटा समजून दूर करण्यासाठी तयारी करतात. या सगळ्यात महत्त्वाचे असते ते दादासाहेब यांनी स्वतः चा काही निर्णय घेणे. असे हे एक मोठा पट असलेले कथानक आहे.


सचिन जगदाळे यांचे हे लेखन वाचत असताना सारखा प्रश्न पडत होता, 'गुलाबराव पारनेरकर' लिहिणारे हेच का ते जगदाळे? त्यांचे गुलाबराव हे विनोदी अंगाने जाणारे खुशखुशीत असे लेखन होते. तर 'परीघ' हे लेखन अगदी विरोधी टोकाचे. गंभीर म्हणावे असे. शोध पत्रकारितेचा आदर्श दाखविणारे. स्वतः पत्रकार आहेत, हा भाग जरी लक्षात ठेवला, तरी लेखनात पत्रकार डोकावणार नाही, याची त्यांनी पुरेपूर काळजी घेतलेली दिसते. नाही म्हणायला सुरुवातीच्या भागात पत्रकारितेचे वातावरण आहे. तिथे कशाप्रकारे बोलले जाते याचा नमुना वाचायला मिळतो. परंतु आपण एक ललितकृती वाचकांच्या हाती देत आहोत, तेव्हा तिच्यातले लालित्य जपले पाहिजे, याचे भान त्यांनी ठेवलेले आहे. प्रसंगांतील नेमकेपणा कायम ठेवून त्यांचे वर्णन केलेले आहे. संवादात वातावरणाला अनुरूप ठरेल अशी चपखल भाषा, मर्मावर अचूक टोक ठेवण्यातले कसब, ही लेखकाची ताकद दाखवते. कथानकासोबत असलेले ग्रामीण वातावरण, त्यातली सुबत्ता, यांची वर्णने लेखकाने सूचकपणे केलेली आहेत. शेतातून पाणी रस्त्यावर वाहत आहे, याचा अर्थ इथे पाणी मुबलक असून सुबत्ता आहे. बेफिकीरपणे जाणारी मोटारसायकल ही तरुण आणि मगरूरपणाची प्रतीक आहे. शेताभोवती ऊसतोडणीसाठी पडलेली पाले, त्यांच्याभोवती असलेला पोलिसांचा पहारा, हे गावच्या राजकारणासोबतच दहशतीचे प्रतीक असल्याचे स्पष्ट होते. लेखकाने या सगळ्याच गोष्टींकडे बारकाईने लक्ष दिलेले आहे. त्यासाठी स्वतः मेहनत घेतल्याची, तयारी केल्याची नोंद त्यांच्या मनोगतात दिलेली आहे. यात विशेष बाब म्हणजे प्रस्तावना. ही प्रस्तावना लिहिली आहे वडगावचे सरपंच, संजय विठ्ठल खेडकर यांनी. ज्या गावाचा उल्लेख लेखनात आलेला आहे, त्याच गावचे हे सरपंच आहेत. हे औचित्य नावीन्यपूर्ण आहेच, शिवाय ते एकमेव असावे असे वाटते. त्यांनीही लेखकाच्या लेखनाचे मनापासून कौतुक केलेले आहे.

उत्कंठावर्धक आणि मनाची पकड घेणारे असे हे पुस्तक आहे. लेखनाला गती आहे. विषयावर पकड आहे. शेवटपर्यंत वाचकाला आपल्याशी खिळवून ठेवण्याची त्यांत ताकद आहे. आणि हेच या लेखनाचे, लेखकाचे यश आहे, असे म्हणावेसे वाटते.

ग्रामीण भागाचे मनाला भावणारे सुपीक वातावरण डोळ्यांना आल्हाददायक असते. त्यात बागडणारे अल्लडपणाचे प्रेम तर विलोभनीय म्हणावे असे. परंतु या प्रेमाला छेद देऊ पाहणारा त्रिकोण नेहमीच जणू परीक्षा पाहण्यासाठीच निर्माण झाला आहे असे वाटते. आणि त्यात असणारी विहीर ही जीवन संपन्न करणारी की जीवन संपवणारी, असाही प्रश्न उपस्थित होतो. यात येणारे गावचे राजकारण वेगळेच. असा सगळा आशय मुखपृष्ठावर सजीवपणे साकारणे अवघडच. परंतु सतीश भावसार यांनी हा सगळा तोल अतिशय उत्तम रीतीने सांभाळलेला आहे. त्यामुळे पुस्तकाचे मुखपृष्ठ पट्कन नजरेत भरते.

**मूल्य १५० रुपये सवलतीत ९० रुपये**

# ग्रंथपान




## अस्तित्व आणि अगतिक

'कविताच ... माझी कबर' हा 'ग्रंथाली'ने नुकताच प्रकाशित केलेला काहीसा आडवळणाचे शीर्षक असलेला कवितेचा संग्रह हाती आला. मृत्यू, कबर, विरह, विलाप असे शब्द प्रेमाच्या विफलतेतून जन्माला येतात. गझलेचे सजीवपण ज्या खांबांवर टांगलेले दिसते त्याचे हे शब्द म्हणजे प्राण. त्यामुळे संजय चौधरी यांचा हा संग्रह कवितेचा आहे की गझलचा, असा काहीसा संभ्रम मनात डोकावला. परंतु संग्रह वाचायला सुरूवात केली तेव्हा लक्षात आले, ही गझल नाही, परंतु गझलेच्या कुळात जन्म घेतलेली मुक्त कविता आहे.

माणूस शहराकडे धाव घेतो, त्याला कारण त्या शहाराचे आकर्षण कारणीभूत नसते, कारणीभूत असते ती पोटातली आग. शहरांची सूज ही काही त्याच्या पौष्टिकतेची साक्ष नाही, तर ती आहे अशा आगीने पोळलेल्या माणसांच्या अगतिक आगमनाने ताणली गेलेली शहराच्या अवयवांची लांबीरुंदी. ही एक गुहा आहे. इथे आलेला माणूस पुन्हा परतण्याची ग्वाही सोबत घेऊन येतो, ती ग्वाही त्याला सतत परतीचे दिवे दाखवीत राहते. परंतु ते परतणे होत नाही. माणूस तिथेच चिकटून राहतो. मग हरवते जन्म देणारी माय आणि आयुष्यभर पोसणारी माती. अखंड पोटाची आग विझवण्यासाठी धडपडत राहतो. त्यासाठी अनेक तडजोडी करीत राहतो. स्वतःचे परकेपण मिरवित राहतो. स्वतःचा चेहरा हरवून बसतो. हा हरवलेला चेहरा शोधण्यासाठी पुन्हा धडपडत राहतो. घर इथली मूलभूत गरज. परंतु माणूस दिवसभर घराबाहेर राहतो. खरंतर घरानेच त्याला बेघर केलेले असते. त्यावर कवी म्हणतात, माणसाने घराचे व्यसन लावून घेऊ नये. इथे माणसाचे मूल्य म्हणजे व्यवहारातून बाद झालेल्या राणीच्या रुपयासारखे आहे. आपल्या हयातीच माणूस आऊडेटेड होत जातो. शहरातील माणसांची परवड या कवितांमधून व्यक्त झाली आहे.

माणसे उद्याचा दिवस चांगला असेल या आशेवर जगत राहतात. हे जगणे म्हणजे सावलीला झाड नाही, पायाखाली तापलेली सडक आणि न संपणारी लांबलचक जळती दुपार. आडोसा नाही, झरा नाही, फक्त व्यवहाराने भरलेले मृगजळ असे. स्वतःच्या जगण्याकडे कवी अतिशय तटस्थेने पाहत आहे. हे जगणे म्हणजे लादलेले जगणे आहे. जन्माला घालण्यापूर्वी कुणीही आपली आवड विचारलेली नाही. निवडीचा अधिकारच जणू हिरावून घेतलेला. जगण्यातही प्रत्येक टप्प्यावर केवळ लादणेच सहन करावे लागत आहे. पर्याय नाही अशी जगण्यासाठी सक्ती आणि ती सांभाळताना अगतिकताही. जीवनाच्या कोपऱ्यात शरीराचे मुटकुळे करून आतल्या आत पडून राहतो. हे शरीर म्हणजे एक शववाहिका आहे आणि त्याच्या आत जन्मापासून होऊ घातलेले शव वाहून आणतो आहे. आणि हे एकाकीपण तर इतके टोकाचे की, शेवटी सरणावर स्वतःला ठेवताना त्याला अग्नीही स्वतःलाच द्यावा लागणार असे खात्रीने वाटते. देवाचे असणे वा नसणे हे प्रश्न नेहमीच वादाचे पण याच देवाची माणसाला जशी गरज आहे तशी त्याला देखील माणसाची गरज आहे, हे सत्य लक्षात घेण्यासारखे आहे. त्याचप्रमाणे माणसाला माणसाची गरज आहे हे कधी समजून घेणार? मरणानंतरच सुतकी चेहरे करून माणसे भेटायला येणार का? शुद्ध, निरपेक्ष भावनेची माणसे आहेत कुठे? कवीने आपल्यासगळ्यांसमोर हे जगण्याच्या वास्तवाशी जोडलेले प्रश्न ठेवले आहेत. 'स्मशानाकडे जाणारा रस्ता म्हणजे बिन पावलांचा डेड एंड. इथेच तुटते रस्त्याशी पावलांचे अखेरचे नाते.'


असे स्वतःकडे त्रयस्थासारखे पाहणे, स्वतःच्या मनाचा, बुद्धीचा कस पाहणे, स्वतःच्या क्षमता, असमर्थता यांचा शोध घेणे, हे सारे कवी शांतपणे सोलत जातो, एकेक पापुद्रा काढावा तसा. थेट तळाचा ठाव घेतो तसा काळजाचाही थरकाप व्हावा असे सुन्न करणारे चित्र उभे करतो, काळोखातल्या गर्भाचा शोध घेतल्यासारखा. .

कवितांना अनुक्रम देण्याच्या पारंपरिक पद्धतीला इथे छेद दिलेला आहे. सगळ्या कवितांची संख्या जवळपास एकशेदोन इतकी आहे. त्यांची विभागणी बारा आयाममध्ये केलेली आहे. या प्रत्येक आयामाला स्वतंत्र शीर्षक आहे. ते शीर्षक हे त्या आयामाच्या कवितांचा एक गुच्छ घेऊन येतो. या आयामाला रेखाटनांची जोड दिलेली आहे. कवितांना मात्र शीर्षकाऐवजी अनुक्रमांक दिलेले आहेत. सर्वच कविता मुक्तछंदात आहेत. परंतु त्यांच्यात एक वाहता गतीचा प्रवाह आहे. हा प्रवाह वाचकाला त्याच्या तालावर सोबत घेऊन भन्नाट वेगाने पुढे जातो. कधी आड आलेल्या उंच खडकावर आदळतो, लगेच पुढे खोल झेप घेतो. अशा प्रसंगी वाचकाची अवस्था भोवंडून गेलेल्या ओंडक्यासारखी होते. सुटसुटीत असा आशय घेतलेली, रूपक, प्रतीके, अनुप्रासाच्या जाळ्यात फार न अडकात थेट विषयाला आपल्या कवेत घेणारी ही कविता आहे. कुठेही उपमा, उत्प्रेक्षा यांची गल्लत नाही की पुनरावृत्ती नाही. जे सांगायचे ते काळजाला हात घालून, काळजाला हेलावून टाकणारे. वरवर सहजसोपी वाटणारी, परंतु आतला गाभा खोल खोल असलेली ही कविता वेगळेच पाणी घेऊन आलेली आहे. कवीची कवितेकडे पाहण्याची दृष्टी आणि त्याचा पल्ला पाहता, या कवीकडे सांगण्यासारखे खूप आहे. ते त्याचे स्वतःचे आहे. आणि तो हे दालन नक्की स्वतःच्या नावे निश्चित करील असा विश्वास ही कविता देते. जीवनाकडे अंतर्मुख होऊन पाहणारा चिंतनशील असा आश्वासक कवी म्हणून संजय चौधरी या नावाची नोंद आवर्जून घ्यावे लागेल. वसंत आबाजी डहाके यांनी पुस्तकाच्या मलपृष्ठावर या कवितेविषयी आपले निरीक्षण नोंदविलेले अकाहे. त्यांनीही नमूद केले आहे की, 'समकालीन कवितेत स्वतःची अशी वेगळी मुद्रा उमटवणारी ही कविता आहे.' खूप दिवसांनी 'कविताच.... माझी कबर'च्या रूपात आशयसंपन्न अशी चांगली कविता वाचायला मिळाली.

सुभाष अवचट यांचे मुखपृष्ठ आणि रेखाटने कवितेचा आशय अधिक गहिरा करतात.

**मूल्य १५० रुपये सवलतीत ९० रुपये**

# पुस्तकप्रकाशन क्षणचित्रे



'चला हवा येऊ द्या' या कार्यक्रमात 'पत्रास कारण की...' या पुस्तकाच्या दहाव्या आवृत्तीचे प्रकाशन.
डॉ. निलेश साबळे,
अमृता देवेंद्र फडणवीस,
प्रेमा किरण,
लेखक अरविंद जगताप,
सुदेश हिंगलासपूरकर
आणि बालकलाकार

सागर कारंडे पत्रवाचन करताना.





मुंबई महानगरपालिका २०० शाळांना झी प्रस्तुत 'खाली डोकं वर पाय' अंकाचे वितरण. हस्ते महापौर विश्वनाथ महाडेश्वर. डावीकडून धनश्री धारप, डॉ. लतिका भानुशाली, सुदेश हिंगलासपूरकर, अनिकेत जोशी, निलेश मयेकर, त्रिवेदी, सलिल वाघमारे, प्रियांका म्हात्रे, महापौर विश्वनाथ महाडेश्वर, मिलिंद सातमकर आणि शिक्षणाधिकारी महेश पालकर

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/2016 -2018
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.